# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

# पुणे जिल्ह्यातील मांग गारुडी समाजाच्या सामाजिक-आर्थिक व शैक्षणिक मागासलेल्या स्थितीचा अभ्यास

अहवाल


**प्रमुख मार्गदर्शक**

**श्री. राजेश ढाबरे**, IRS

महासंचालक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे


**संशोधन विभाग**


**सप्टेंबर २०१६**

# पुणे जिल्ह्यातील मांग गारुडी समाजाच्या सामाजिक-आर्थिक व शैक्षणिक मागासलेल्या स्थितीचा अभ्यास

---

**अहवाल**


**संशोधक**

श्री. राजू अडागळे, सहायक प्राध्यापक
श्रीमती. प्रमोदिनी नाईक, संशोधन अधिकारी

**विशेष सहकार्य**

श्री. एस. वाय. कापसे, प्रकल्प संचालक

**संशोधन सहाय्य**

श्री. तुलसीदास सुळे, संशोधन अधिकारी
श्रीमती. मोना फासगे, प्रकल्प अधिकारी

---

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

# प्रास्ताविक

भारतीय संविधान हे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत आपण अर्पण केले आहे. त्यामध्ये सर्व भारतीयांस न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता यांचे आश्वासन देण्यात आले आहे. खास करून राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांतील ४६ व्या कलमानुसार, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे शैक्षणिक व आर्थिक संवर्धन करून त्यांचे सामाजिक अन्याय व सर्व प्रकारच्या पिळवणूकीपासून 'राज्य' संरक्षण करीन अशी हमी देण्यात आली आहे. कायद्याने 'अस्पृश्यता' नष्ट केली आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांचे कल्याण होण्याच्या दृष्टीने शासन अनेक विधायक योजना, उपक्रम राबवित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांची स्वायत्त संस्था असून विशेषतः अनुसूचित जातींच्या विकासासाठी अनेक विधायक उपक्रम राबविण्यासाठी कटिबद्ध आहे.

समाजातील विविध क्षेत्रातील सामाजिक समतेशी संबंधित विषयांवर संशोधन करणे, हे बार्टीच्या प्रमुख उद्दिष्टांपैकी एक आहे. त्याआधारे बार्टीमार्फत महाराष्ट्रातील विविध जातींचे संशोधन करून दस्तावेज तयार करण्यात येतात. संशोधनाचा उपयोग शासकीय धोरणे व योजना यांमध्ये आवश्यक बदल करण्यासाठी होत असतो. महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या यादीमध्ये एकूण ५९ जातींचा समावेश आहे. त्यांपैकी अनुक्रमांक ४७ वर असणाऱ्या मांग गारुडी या जातीच्या सामाजिक-आर्थिक व शैक्षणिक मागासलेल्या स्थितीचा अभ्यास करण्यात आला. मांग गारुडी समाजातील लोकांकडे जातीचे प्रमाणपत्र उपलब्ध नाही असे दिसून आले. त्यामुळे त्यांना जात प्रमाणपत्र पडताळणी करणे सुद्धा अवघड जाते. जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आवश्यक ते पुरावे सादर करण्यास या समाजातील लोक असमर्थ असतात. त्याशिवाय, मांग गारुडी समाजाविषयी फारसे संशोधनही झाले नसल्याने त्यांची आवश्यक तेवढी माहिती उपलब्ध नाही.

त्यामुळे 'पुणे जिल्ह्यातील मांग गारुडी समाजाच्या सामाजिक-आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास' बार्टीच्या संशोधन विभागाकडून करण्यात आला आहे. हा संशोधन अहवाल सामाजिक न्याय विभागातील प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी, विविध जिल्ह्यातील जात पडताळणी समिती आणि इतर अभ्यासक यांच्यासाठी उपयुक्त ठरेल याची मला पूर्ण खात्री आहे.

**श्री. राजेश ढाबरे,** IRS
महासंचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व
प्रशिक्षण संस्था, पुणे.

Scanned with CamScanner

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| तक्ते, आकृत्या व नकाशे यांचा तपशील | | I-IV |
| अभ्यासाचा गोषवारा | | १ - ३ |
| प्रकरण १: | प्रस्तावना, संशोधन पद्धती आणि अभ्यासाचे क्षेत्र | ४-१९ |
| प्रकरण २: | मांग गारुडी आणि मुलभूत सेवासुविधा | २०-२९ |
| प्रकरण ३: | मांग गारुडी समाजाची सामाजिक-सांस्कृतिक स्थिती | ३०-६७ |
| प्रकरण ४: | मांग गारुडी समाजाचा आर्थिक स्तर | ६८-८० |
| प्रकरण ५: | निष्कर्ष आणि शिफारशी | ८१-८८ |
| | संदर्भ सूची | ८९ |

परिशिष्ट १: महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातींची यादी

परिशिष्ट २: मांग गारुडी समाजासाठी कुटुंब प्रश्नावली , गट चर्चा मार्गदर्शिका व निरीक्षण मार्गदर्शिका

परिशिष्ट ३: मांग गारुडी समाजाच्या भेट दिलेल्या वस्ती व गावांची यादी

परिशिष्ट ४: अन्वेषकांच्या नावांची यादी

# तक्ते, आकृत्या व नकाशे यांचा तपशील


तक्ता क्र. १: उत्तरदात्याचे वयनिहाय प्रमाण

तक्ता क्र. २: उत्तरदात्यांची वैवाहिक स्थिती

तक्ता क्र. ३: कुटुंबातील सदस्य संख्या व त्याचे प्रमाण

तक्ता क्र. ४: कुटुंबांचे व्यवसायाचे प्रमाण

तक्ता क्र. ५: कुटुंबाचे मासिक उत्पनाचे प्रमाण

तक्ता क्र. ६: विभागनिहाय पाण्याची सुविधा असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ७: विभागनिहाय वीज सुविधा असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ८: विभागनिहाय वाहतूक व्यवस्था असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ९: विभागनिहाय पक्के रस्ते व्यवस्था असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. १०: विभागनिहाय दवाखाना उपलब्ध असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ११: विभागनिहाय सांडपाणी व्यवस्था असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. १२: विभागनिहाय शौचालय व्यवस्था असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. १३: विभागनिहाय आधार कार्ड असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. १४: विभागनिहाय मतदान कार्ड असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. १५: विभागनिहाय प्राथमिक शाळा व्यवस्था असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. १६: विभागनिहाय आजारीपणात उपचार ठिकाणाचे

तक्ता क्र. १७: विभागनिहाय कुटुंबातील सदस्यांना दीर्घकालीन आजार असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. १८: विभागनिहाय पूर्वजांचे राहण्याचे स्वरूप व त्याचे प्रमाण

तक्ता क्र. १९: विभागनिहाय स्थायिक होण्याचा कालावधीचे प्रमाण

तक्ता क्र. २०: विभागनिहाय विशिष्ट ठिकाणी वास्तव्याच्या कालावधीचे प्रमाण

तक्ता क्र. २१: विभागनिहाय बोलीभाषेचे प्रमाण

तक्ता क्र. २२: विभागनिहाय कुलदैवतांचे प्रमाण

तक्ता क्र. २३: विभागनिहाय बाळ जन्मल्यानंतरचे विधी (पाचवी व बारावी)

तक्ता क्र. २४:   विभागनिहाय बाळाच्या जन्माआधीच्या विधी

तक्ता क्र. २५:   विभागनिहायअंत्य संस्काराचा प्रकारव त्याचे प्रमाण

तक्ता क्र. २६:   विभागनिहाय दशक्रिया विधीचा दिवस व त्याचे प्रमाण

तक्ता क्र. २७:   विभागनिहाय मांसाहाराचे प्रमाण

तक्ता क्र. २८:   विभागनिहाय चिकन खाण्याचे प्रमाण

तक्ता क्र. २९:   विभागनिहाय गायी-म्हशीचे मांस खाण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ३०:   विभागनिहाय डुक्कर खाण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ३१:   विभागनिहाय इतर मांसाहार करण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ३२:   विभागनिहाय जोगवा/परडीची प्रथा व त्याचे प्रमाण

तक्ता क्र. ३३:   विभागनिहाय बाबा बुआ यांना मानण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ३४:   विभागनिहाय धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी प्राण्यांचा बळी यांचे प्रमाण

तक्ता क्र. ३५:   विभागनिहाय  जादूटोणाचे प्रमाण

तक्ता क्र. ३६:   विभागनिहाय  कुटुंबातील सदस्यांच्या अंगात येणे याचे प्रमाण

तक्ता क्र. ३७:   विभागनिहाय पोतराज प्रथा व त्याचे प्रमाण

तक्ता क्र. ३८:   विभागनिहाय सूर्य ग्रहण /चंद्र ग्रहण मागण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ३९:   विभागनिहाय पोटजाती मध्ये विवाह करण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ४०:   विभागनिहाय कुटुंबांतील मुलींचे लग्नाच्या वयाचे प्रमाण

तक्ता क्र. ४१:   विभागनिहाय कुटुंबात पत्रिका जुळवून विवाह करण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ४२:   विभागनिहाय मुलाने मुलीस हुंडा देण्याचे पद्धतीचे प्रमाण

तक्ता क्र. ४३ :  विभागनिहाय इतर समाजातील लोकांच्या समारंभात सहभाग घेण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ४४:   विभागनिहाय इतर समाजातील लोकांकडून मिळणारी वागणूक याचे प्रमाण

तक्ता क्र. ४५:   विभागनिहाय कुटुंबात शिक्षित व्यक्तींची संख्या व त्याचे प्रमाण

तक्ता क्र. ४६:   विभागनिहाय शिक्षण घेत असलेल्या मुलांचे प्रमाण

तक्ता क्र. ४७:   विभागनिहाय शिक्षणातून गळती झालेल्या मुलांचे प्रमाण

तक्ता क्र. ४८:   विभागनिहाय शिक्षणासाठी आवश्यक कागदपत्रांची सहज उपलब्धता असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ४९:  विभागनिहाय घटस्फोटीत विधवा महिलांना पुर्नविवाहाची परवानगीचे प्रमाण

तक्ता क्र. ५०: विभागनिहाय महिलांना घटस्पोटानंतर पोटगीचे प्रमाण

तक्ता क्र. ५१:  विभागनिहाय देवदासी/मुरळीची प्रथा यांचे प्रमाण

तक्ता क्र. ५२:  विभागनिहाय प्रथम मासिक पाळी आल्यावर धार्मिक विधीचे प्रमाण

तक्ता क्र. ५३:  विभागनिहाय घरातील बायकांना मासिक पाळी आल्यावर बाजूला बसविणेचे प्रमाण

तक्ता क्र. ५४: विभागनिहाय बायकांना जटा असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ५५: विभागनिहाय बाळंतपणात महिलांना दूर ठेवण्याचे प्रमाण

तक्त क्र. ५६:  विभागनिहाय जात पंचायतीकडून सोडविल्या जाणाऱ्या समस्याचे प्रमाण

तक्ता क्र. ५७:  विभागनिहाय जात पंचायतीकडून दिलेल्या शिक्षेचे स्वरूप यांचे प्रमाण

तक्ता क्र. ५८:  विभागनिहाय जातीचे प्रमाणपत्र असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ५९:  विभागनिहाय जात पडताळणी प्रमाणपत्र असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६०:  विभागनिहाय संघटना करत असलेली मदतीचे प्रमाण

तक्ता क्र: ६१:  विभागनिहाय संघटना मदतीसाठी करत असलेली मागणी याचे प्रमाण

तक्ता क्र. ६२:  विभागनिहाय पूर्वजांच्या चोरी करण्याच्या व्यवसायाचे प्रमाण

तक्ता क्र. ६३:  उत्पन्न गटनिहाय पूर्वजांचा म्हशी भादरण्याचा व्यवसाय करण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६४: उत्पन्न गटनिहाय 'सापाचा खेळ दाखविणे' हा पूर्वजांचा व्यवसाय असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६५: उत्पन्न गटनिहाय पूर्वजांचा भिक मागण्याचा व्यवसाय असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६६: उत्पन्न गटनिहाय पुर्वजांचा गावगुंडी खेळाचा व्यवसाय असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६७: उत्पन्न गटानुसार अजूनही पारंपारिक व्यवसायात असणाऱ्यांचे प्रमाण

तक्ता क्र. ६८:  शहरी व ग्रामीण भागानुसार अजूनही पारंपरीक व्यवसायात असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण

तक्ता क्र. ६९:  उत्पन्न गटनिहाय मालकीची जमीन असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ७०:  उत्पन्न गटनिहाय जनावरांची मालकी असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ७१:  उत्पन्न गटनिहाय घराची मालकी असण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ७२: उत्पन्न गटनिहाय घरांचे स्वरूपाचे प्रमाण

तक्ता क्र. ७३: उत्पन्न गटनिहाय रेशन कार्डाचा प्रकार व त्याचे प्रमाण

तक्ता क्र. ७४: विभाग निहाय शासकीय योजनेचा घेतलेला लाभ घेण्याची कारणे व त्यांचे प्रमाण
तक्ता क्र. ७५: विभाग निहाय शासकीय योजनेचा लाभ  न घेण्याची कारणे व त्यांचे प्रमाण

आकृती क्र. १:   महाराष्ट्र राज्य नकाशा
आकृती क्र. २:   पुणे जिल्हा नकाशा
आकृती क्र. ३:   उत्तरदात्यांचे स्त्री-पुरुष प्रमाण
आकृती क्र. ४:   उत्तरदात्यांचे शिक्षणाचे प्रमाण
आकृती क्र. ५:   ग्रामीण व शहरी भागातील कुटुंब संख्या व त्यांचे प्रमाण

# गोषवारा

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये माणसाच्या जन्माबरोबरच त्याला जातींची वैशिष्ट्ये चिकटतात. जातीव्यवस्थेत उच्च-नीचता असा भेदभाव प्रामुख्याने पाळला जातो. कनिष्ठ जातींत क्षमता असो किंवा नसो त्यांची सामाजिक गतिमानता खुंटवून त्यांना कनिष्ठ स्थानावरच कसे ठेवता येईल हे पाहिले जाते. सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून हे भेदभाव मिटविण्यासाठी राज्यघटनेमध्ये स्वातंत्र्य, समानता, बंधुता या तत्वांचा अंगीकार केला आहे. या उद्देशाने राज्यघटनेत विविध तरतुदी केलेल्या आहेत. राज्यघटनेच्या ४६ व्या कलमानुसार, अनुसूचित जातींचे शैक्षणिक व आर्थिक संवर्धन करून त्यांना सामाजिक अन्यायापासून व सर्व प्रकारच्या पिळवणूकी पासून राज्याने त्यांचे रक्षण करण्याची हमी दिलेली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातींची लोकसंख्या महाराष्ट्रामध्ये ११.८१ % आहे. मांग-गारुडी ही अनुसूचित जाती मधील अतिशय मागासलेली जात आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये या जातीच्या लोकांची लोकसंख्या सुमारे ३९,९९३ एवढी आहे.

अन्त्रोलीकर आयोग १९५० आणि थाडे समिती यांच्या अहवालानुसार नुसार मांग गारुडी समाज भटकी जमात मानण्यात आली. मांग गारुडी जातीचा व्यवसाय हा म्हशी भादरणे हा होता. त्याशिवाय, किरकोळ स्वरूपाच्या चोरी करणे आणि इतर समाजास त्रासदायक असे व्यवसाय करत असत. परंतु, इदाते अभ्यास समितीने (१९९९) मांग गारुडी जात ही भटक्या जमातीमध्ये समविष्ट नसल्याने सदर जातींचा त्यांच्या अभ्यासात समावेश केला नव्हता. परंतु, श्री. रामनाथ चव्हाण यांनी भटक्या व विमुक्त जाती करीता केलेल्या २००४ मधील अभ्यासात मांग गारुडी समाजाच्या जात पंचायतींविषयी अभ्यास करताना असे नोंदविले आहे की, ही जमात गुन्हेगार म्हणून ओळखली जात होती आणि ती मातंग समाजाची पोटजात मानली जाते. परंतु, महाराष्ट्र शासनाच्या अनुसूचित जातींच्या यादीमध्ये मांग गारुडी जातीची स्वतंत्र नोंद क्र. ४७ वर करण्यात आली आहे.

पारंपारिक व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यवसायात असल्याने हा समाज आपली प्रगती करू शकला नाही. या समाजाच्या उन्नतीसाठी, त्यांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी तसेच नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना उपलब्ध आहेत परंतु या योजनांचा लाभ घेण्यासाठी या लोकांना काही कागदपत्रांचा पाठपुरावा करावा लागतो. जसे की जातीचा दाखला, जात पडताळणी दाखला इ. मागासलेल्या व भटक्या स्वरूपामुळे या जातीच्या लोकांकडे अशा कागदपत्रांचा अभाव दिसून येतो. त्यासाठी

“१० ऑगस्ट १९५० वर्षापूर्वीचे वास्तव्याचे पुरावे” मिळविण्यात या लोकांना अडचणी येतात. शिवाय, मांग-गारुडी समजासंबंधी फारसे संशोधन सुद्धा झालेले नाहीत. परिणामी या लोकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीच्या राज्य सरकारच्या योजना असूनही त्यांपासून मांग गारुडी समाज वंचित राहिलेला दिसत आहे. याच पार्श्वभूमीच्या आधारे, बार्टी संस्थेच्या संशोधन विभागामार्फत मांग-गारुडी समाजाच्या सामाजिक-आर्थिक मागासलेल्या स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे.

पथदर्शी अभ्यासावरून मांग गारुडी समाजाची लोकसंख्या महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे, पुणे जिल्ह्याची मांग गारोडी समाजाच्या अभ्यासासाठी निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धतीने (census survey) पुणे जिल्ह्यातील मांग गारोडी समाजातील सर्व कुटुंबांकडून माहिती संकलीत करण्यात आली. यात मुलाखत अनुसूची आणि गटचर्चा मार्गदर्शिका या साधनांद्वारे सांख्यिकीय व गुणात्मक अशा दोन्ही स्वरूपाच्या माहितीचे संकलन करण्यात आले. एकूण १२७३ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. विविध गावे व वस्त्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन निरीक्षणाद्वारे गुणात्मक माहिती मिळवली. यासाठी पुणे जिल्ह्यातील एकूण ९ वस्त्यांमध्ये गट चर्चा घडवून आणल्या. गट चर्चाच्या नोंदी डीजिटल रेकॉर्डर आणि नोंदवहीत घेण्यात आल्या. त्याचबरोबर, मांग गारुडी समाजाच्या वास्तव्याच्या ठिकाणचे छायाचित्रे सुद्धा काढण्यात आली होती. तसेच, दि. १५ सप्टेबर २०१५ ते २९ ऑक्टोबर २०१५ या दरम्यान माहिती संकलनाचे काम करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील प्रामुख्याने ग्रामीण व शहरी भागाचा स्वतंत्र चल म्हणून अभ्यास करण्यात आला. त्याचबरोबर, मांग गारुडी समाजातील कुटुंबांची वर्गवारी ही आर्थिक आधारावर करून त्याचे सुद्धा विश्लेषण करण्यात आले आहे. त्यामध्ये, उच्च, मध्यम आणि अल्प उत्पन्न गटांचा समावेश कण्यात आला आहे. संकलित केलेल्या माहितीचे Statistical Package for Social Sciences (SPSS) मध्ये विश्लेषण करण्यात आले.

या अभ्यासातून असे दिसून आले की, या समाजाचे पूर्वीचे भटके स्वरूप राहिले नसून मागील ६० वर्षापेक्षा जास्त कालावधीमध्ये ते स्थायिक झालेले आहेत. हा समाज हिंदू धर्मीय असून पारोशी किंवा शिबारी ह्या त्यांच्या बोलीभाषा आहेत. मांग गारुडी समाजात १२ कुळे महत्वाची मानली जातात. प्रत्येक कुळाचे समाजात विशिष्ट स्थान आहे. मांग गारुडी कुटुंबाचे कुलदैवत म्हणून म्हसोबा, महालक्ष्मी, खंडोबा, मरीआई, काळूआई, तुळजापूरची लक्ष्मीआई, खंडोबा, मरीआई, काळूआई, महालक्ष्मीआई, फिरस्तीआई, वर्खेडाचीआई

नरसोबा, येडूआई, नवदुर्गा, यलाम्मा इ. देवदेवतांचा समावेश आहे. अलीकडे मृतांचा अंत्य विधी दहन पद्धतीने केला जातो. दशक्रिया विधी हा सातव्या दिवशी केला जातो. शिवाय, त्यांच्या सर्व कुटुंबांमध्ये मांसाहार करण्याचे प्रमाण जास्त दिसून येते. धार्मिक विधीसाठी पशुबळी देणे, पोतराज प्रथा, जोगवा मागणे, समाजातील स्त्रीयांना मुरळी, देवदासी म्हणून देवाला सोडणे इ. प्रथा समाजात दिसून येतात. या समाजात पितृसत्ताक पद्धती पाळली जाते. मांग गारुडी समाजात वधूला वराने हुंडा देण्याची प्रथा होती. ती आजही ग्रामीण आणि शहारी भागात थोड्या अधिक प्रमाणात कायम असल्याचे दिसते. पण, मुलींचा विवाह हा वयाच्या १८ व्या वर्षांच्या आतच केला जातो. त्यासाठी पत्रिका जुळविण्याचे प्रमाण सुद्धा जास्त असल्याचे दिसत आहे. घटस्फोटीत, विधवांना पुर्नविवाहाची परवानगी नसल्याचे दिसत आहे. त्याशिवाय, मासिक पाळीमध्ये महिलांना बाजूला बसविले जाते. जात पंचायती वाद-विवाद मिटविण्याचे काम करतात, शिक्षा म्हणून समज देणे या प्रकारला ते प्राधान्य देतात. या समाजात अशिक्षितांचे प्रमाण कमी असून शिक्षण घेण्याकडे लोकांचा कल दिसून येतो. परंतु, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करणे त्यांना अडचणींचे जाते. जातींचे प्रमाणपत्र या समाजातील बहुतांशी कुटुंबांकडे आढळले नाही. तसेच, जात प्रमाणपत्र पडताळणी केलेल्या व्यक्तींची संख्याही अगदी नगण्य आहे. त्यासाठी या समाजातील संघटना करत असलेले प्रयत्न अल्प आहेत. वीज, रस्ते, पाणी, सांडपाण्याची सुविधा, शौचालय इ. मुलभूत सोयी-सुविधा कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. शिक्षण आणि आरोग्य या सुविधा मिळण्याचे प्रमाण जास्त आहे. परंतु, ग्रामीण भागात या प्रकारच्या सोयी-सूविधांची कमतरता दिसून येते. तेव्हा, शासकीय आणि बिगर शासकीय स्तरावरून त्यासाठी विशेष उपाय योजना आखण्याची आवश्यकता आहे.

प्रकरण १:

# प्रस्तावना व संशोधन पद्धती

## प्रस्तावना

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये माणसाच्या जन्माबरोबरच त्याला जातींची वैशिष्ट्ये चिकटतात. जातींच्या निर्मितीमध्ये व्यवसाय, जातीतच रोटी-बेटी व्यवहार, जातीच्या स्वतंत्र वस्त्या आणि जातपंचायतींनी आखून दिलेल्या नीतीनियमांचे पालन ही महत्वाची वैशिष्टे आढळून येतात (पहा, घुर्ये १९८६). जातीव्यवस्थेत उच्च-नीचता असा भेदभाव प्रामुख्याने पाळला जातो. कनिष्ठ जातींत क्षमता असो किंवा नसो त्यांची सामाजिक गतिमानता खुंटवून त्यांना कनिष्ठ स्थानावरच कसे ठेवता येईल हे पाहिले जाते. दुसऱ्या बाजूला वरिष्ठ स्थानावर विसावलेल्या जातींत क्षमता असो किंवा नसो त्यांचे सामाजिक स्थान हे अबाधितच राहते. हे सामाजिक वास्तव आजही कायम दिसून येते. तसेच, एक जात दुसऱ्या जातीपेक्षा कशी श्रेष्ठ आहे हे नेहमीच दाखविण्याची चढाओढ असलेली दिसते. तसेच, काही समाज शास्त्रज्ञ व मानववंश शास्त्रज्ञ असे मत मांडतात की, भारतीय समाजात पूर्वापार जात अस्तित्वात असली तरीही त्याची जाणीव समाजात नव्हती. उलट, ब्रिटीश काळानंतर 'जात जाणीवा' अधिकाधिक विकसित होत गेल्या. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र 'जातीभेद' नष्ट करण्यात आले, त्यासाठी भारतीय राज्यघटनेत मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्व यांच्याआधारे नागरिकांच्या मानवी अधिकाराला संरक्षण देण्यात आले (पहा, जोधका २०१२). असे असले तरीही, जात ही फक्त ब्रिटीशांच्या कल्पनारचितेचा भाग नसून ही प्राचीन काळापासून भारतीय समाज व्यवस्थेत रुजलेली आहे असे म्हणता येईल. भारतीय राज्यघटना समाजात सामाजिक समता प्रस्थापित करण्यात मुलभूत भूमिका बजावते. त्यात अनुसूचित जातींसाठी पुढील तरतुदी केल्या आहेत.

कलम १५ (१) : राज्य कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करणार नाही.

कलम १६ (२) : कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, निवास या किंवा यापैकी कोणत्याही कारणांवरून राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही सेवायोजन किंवा पद यांच्याकरिता अपात्र असणार नाही, अथवा त्यांच्याबाबतीत त्याला प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही.

कलम १६ (४) : कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नागरिकांच्या ज्या कोणत्याही मागासवर्गाला, राज्याच्या मते, पर्याप्त प्रतिनिधित्व मिळालेले नाही अशा मागास वर्गाकरिता नियुक्त्या किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

कलम १७ : अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिद्ध करण्यात आले आहे. "अस्पृश्यतेतून" उद्भवणारी कोणतीही निःसमर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

कलम ४६ : राज्य, जनतेतील दुर्बल घटक, आणि विषेशत: अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन विशेष काळजीपूर्वक करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यांपासून त्यांचे रक्षण करील.

कलम ३३०: लोकसभेत अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्या करिता जागा राखून ठेवणे

कलम ३३८ : अनुसूचित जाती राष्ट्रीय आयोग स्थापन करणे

कलम ३४१ : राष्ट्रपतींच्या आदेशानुसार भारतीय समाजातील काही जातींना 'अनुसूचित जाती' असे गणले जाते.

कलम ३६६ (२४) : अनुसूचित जाती याचा अर्थ, या संविधानाच्या प्रयोजनार्थ ३४१ अन्वये अनुसूचित जाती असल्याचे मानले गेले आहे अशा जाती, वंश किंवा जमाती अथवा जातीचे, वंशाचे किंवा जमातीचे भाग अथवा त्यातील गट असा आहे.

१९३५ च्या कायद्यानुसार इंग्रजी राजवटीत प्रथम अनुसूचित जाती हा शब्दप्रयोग वापरण्यात आला होता. सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून सामाजिक भेदभाव मिटविण्यासाठी राज्यघटनेमध्ये स्वात त्र्य समानता, बंधुता या तत्वांचा अंगीकार केला आहे. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक दुष्ट्या मागासलेल्या अशा गटातील लोकांची विशेष काळजी घेतली जावी, या उद्देशाने राज्यघटनेत विविध तरतुदी केलेल्या आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये अनुसूचित जातींची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे १६.६०% असून महाराष्ट्रामध्ये तेच प्रमाण ११.८१ % आहे. मांग-गारुडी ही अनुसूचित जाती मधील अतिशय मागासलेली जात आहे. महाराष्ट्रातील कोल्हापूर, पुणे, बारामती, नाशिक, बुलढाणा, नांदेड, सोलापूर, आणि नागपूर या जिल्हयांमधून या समाजाची लोकसंख्या जास्त प्रमाणात आढळून येते. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये या जातीच्या लोकांची लोकसंख्या ३९,९९३ एवढी आहे. महाराष्ट्राची एकूण ५९

अनुसूचित जातींची यादी संविधानाच्या अनुच्छेद ३४१ मधील तरतुदीनुसार मा.राष्ट्रपतींच्या अध्यादेशान्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे. (परिशिष्ट १ मध्ये ती देण्यात आली आहे.) त्यामध्ये निरनिराळया जातींचा समावेश आहे. यादीमध्ये मांग गारुडी ही जात ४७ क्रमांकावर नोंदविण्यात आली आहे. ही जात लोकसंख्येच्या दृष्टीने अल्प प्रमाणात असून अजूनही काही सामाजिक-आर्थिक क्षेत्रात मागासलेल्या अवस्थेत आढळून येते.

पूर्वीच्या मुंबई शासनाने मांग गारुडी जातीला विमोचीत जाती म्हणजेच पूर्वाश्रमीच्या गुन्हेगार जाती असे संबोधले होते (Bombay Castle- 1st November 1950). मि. स्टार्ट समितीच्या शिफारशींच्या आधारे मुंबई इलाखा दि. २९ मे १९३३ च्या शासन निर्णयानुसार मागास जातींची वर्गवारी ३ वेगवेगळ्या गटात करण्यात आली उदा. बहिष्कृत जाती (Depressed Classes), वन्य व मूळ निवासी (Aboriginal Hill Tribes)आणि इतर मागासलेल्या जाती (Other Backward Classes). मांग गारुडी ही बहिष्कृत जातींमध्ये नोंदविलेली आहे (Bombay Castle- 29th May 1933). तत्कालीन मुंबई राज्य सरकारने मा. आमदार डॉ. के.बी. अन्त्रोलीकर यांच्या अध्यक्षतेखाली 'एक्स क्रिमिनल ट्राईब रीहॅबीलीटेशन कमिटी' २५ ऑगस्ट १९४९ रोजी स्थापन केली होती. या समितीने नोहेंबर १९५० मध्ये शासनाला अहवाल सादर केला. या समितीचा उद्देश पूर्वाश्रमीच्या गुन्हेगारी जमातींवर असलेला गुन्हेगारीचा कलंक मिटविण्याच्या दृष्टीने आणि त्यांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नांवर काम करणे हा होता. त्यामध्ये मांग गारुडी समाजाला भटक्या जमाती म्हणून गणण्यात यावे. त्याअनुषंगाने त्यांना शैक्षणिक आणि रोजगाराच्या क्षेत्रात सवलती लागू करण्यात याव्यात असे सूचविण्यात आले. तसेच, या समितीने सुचविलेल्या शिफारशी ह्या भटक्या जमाती म्हणून लागू होण्यास मांग गारुडी समाज पात्र असेल.

समाज कल्याण खात्याने भटक्या-विमुक्तांमधील निरनिराळ्या जमातींची सामायिक यादी करून त्यांच्या कल्याणासाठी सामायिक कार्यक्रम तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत (१९६१-१९६६) राबविण्यासाठी अभ्यास गट स्थापन केला. या अभ्यासासाठी श्री. एल. बी. थाडे यांना विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त केले. हा अभ्यास गट "थाडे समिती" ह्या नावाने ओळखला जातो. थाडे समिती दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळातच 'सामायिक यादी' तयार करण्याचे काम करत होती, जेणे करून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा काळ वाया जाऊ नये. थाडे समितीनुसार मांग गारुडी समाज हा भटक्या स्वरूपाचा असल्याने उपजीविकेसाठी त्यांना गुन्हे करावे लागतात. खासकरून मराठवाड्यामध्ये हा समाज प्रामुख्याने दारू गाळणे, वेश्याव्यवसाय इ. माध्यमातून उपजीविका चालवत असत. थाडे समितीच्या म्हणण्यानुसार, मांग गारुडी ही जात

अस्पृश्य म्हणून गणली गेली असून तिचा समावेश महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जातींच्या यादीमध्ये करण्यात आला आहे.

सिंग (१९९३) आणि थाडे समिती यांच्या मते, मांग गारुडी जातीचा व्यवसाय हा म्हशी भादरणे हा होता. त्याशिवाय, किरकोळ स्वरूपाच्या चोरी करणे आणि वेश्याव्यवसाय सुद्धा करत असत. म्हशी सांभाळायला घेऊन त्या पळवून नेल्या जात होत्या. अत्रे (१९१५) यांनीही मांग गारुडी जातीच्या याप्रकारच्या व्यवसायास दुजोरा दिला होता. त्याचप्रमाणे अन्त्रोलीकार समितीच्या मते, मुंबईतील सैतान चौकी परिसरात राहणारे मांग गारुडी यांच्यापैकी सुमारे ९०% मांग गारुडी हे 'स्पिरीट' हे द्रव्य मद्यपान म्हणून प्राशन करीत होते. असे मद्यपान करण्यासाठी ते मुंबई बाहेरही जात असत. तसेच, मांग गारुडी समाजातील स्त्रिया ह्या अनैतिक मार्गातून पैसे कमावण्याची त्यांची मानसिकता दिसून येत होती (अन्त्रोलीकार अहवाल १९५०: ७१). इदाते अभ्यास समिती (१९९९) यांनी मांग गारुडी जात ही भटक्या जमातीमध्ये समाविष्ट नसल्याने त्यांचा अभ्यासात समावेश केला नव्हता. तरीसुद्धा, त्यांनी या समाजाची काही निरीक्षणे नोंदविलेली आहेत. त्यांच्यामते, समितीने प्रत्यक्ष भेटी दिल्यानंतर या समाजाची स्थिती विदारक अशी त्यांना दिसली. तसेच या समितीच्या मते, या समाजाचा मांग गारुडी असा उल्लेख न करता शिबारी असा उल्लेख करावा अशी मागणी या समाजातील प्रतिनिधींनी इदाते समिती समोर केली होती. ही मागणी समितीला रास्त वाटली.

मुटाटकर समिती, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगच्या मते, गारोडी या शब्दाचा अर्थ: सापाचे खेळ गावोगावी जाऊन करणारे असाच रूढ आहे. गारुडी हा अर्थातच एक व्यवसाय आहे. परंतु, मांग गारुडी म्हणजे 'गारुडी किंवा सापगारुडी' नव्हेत. सापांचा खेळ करणे हा मांग गारुडी समाजाचा व्यवसाय नाही. रामनाथ चव्हाण (२००४) यांनी मांग गारुडी समाजाच्या जात पंचायतींचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये ते जातपंचायतींचे प्रेक्षक म्हणून सहभागी झाले होते. त्यांनी अनेक ठिकाणी भेटी देऊन पंच आणि इतर लोकांच्या मुलाखती घेतल्या. त्यातून असे निदर्शनास आले की, मांग गारुडी ही जात विमुक्त जातीमध्ये गणली गेली. ब्रिटीशांच्या काळात ही जमात गुन्हेगार म्हणून ओळखली जात होती. स्वातंत्र्यकाळानंतर सुद्धा त्यांच्यावर गुन्हेगारीचा शिक्का राहिला होता. मांग गारुडी समाजाची सामाजिक-सांस्कृतिक जडणघडण विशिष्ट प्रकारची आहे. मांग गारुडी 'पारोशी' ही सांकेतिक भाषा म्हणून वापरतात. मांग गारुडी ही मातंग समाजाची पोटजात मानली जाते. परंतु, मातंग समाज त्यांना हलके समजत असल्याने त्यांच्याशी बेटी व्यवहार करत नाहीत, शिवाय

त्यांच्याबरोबर पूर्वी रोटी व्यवहारही केला जात नसे. मांग गारुडी ही जात त्यांच्या पारंपारिक व्यवसायामुळे मातंग समाजापासून वेगळी आहे. 'म्हशी भादरणे' हा त्यांचा मुख्य व्यवसाय झाला, त्याचबरोबर ते छोट्या-मोठ्या चोऱ्या करीत आणि गारुडी समाजाच्या जादू व हातचालाखीच्या व्यवसायातही सहभागी होत असत. मांग गारुडी समाजातील कुळांची नावे हीच त्यांची आडनावे आहेत. आंब्याचे व जांभळाचे झाड हे या जातीचे देवक मानले जाते. अक्षय तृतीया हा सण त्यांच्यात महत्वाचा मानला जातो. शिवाय, सांस्कृतिकदृष्ट्या त्यांच्यामध्ये म्हशीला मानाचे स्थान आहे. तिला ते लक्ष्मी मानतात. या समाजातील स्त्रीयांना दुय्यम स्थान आहे. विवाह, मृत्यू विधी आणि समाजातील तंटे-बखेडे सोडवण्यासाठी जात पंचायत महत्वाची भूमिका पार पडत असते. समाजातील न्याय-निवाडा करताना शिक्षेचे स्वरूप जात पंचायतीकडून ठरवले जाते.

शिक्षणाचा अभाव, उत्पन्नाच्या साधनांचा अभाव, रूढी परंपरांचा पगडा, वास्तव्याचे भटके स्वरूप इ. बाबी या समाजाच्या मागासलेल्या स्थितीस कारणीभूत आहेत. पारंपारिक व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यवसायात असल्याने हा समाज आपली प्रगती करू शकला नाही. या समाजाच्या उन्नतीसाठी, त्यांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी तसेच नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना उपलब्ध आहेत. परंतु या योजनांचा लाभ घेण्यासाठी या लोकांना काही कागदपत्रांचा पाठपुरावा करावा लागतो. जसे की जातीचा दाखला, जात पडताळणी दाखला इ. मागासलेल्या व भटक्या स्वरूपामुळे या जातीच्या लोकांकडे अशा कागदपत्रांचा अभाव दिसून येतो. त्यासाठी "१९५० वर्षापूर्वीचे वास्तव्याचे पुरावे" मिळविण्यात या लोकांना अडचणी येतात. शिवाय, मांग-गारुडी समजासंबंधी फारसे संशोधन सुद्धा झालेले नाही. परिणामी या लोकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीच्या राज्य सरकारच्या योजना असूनही त्यांपासून मांग गारुडी समाज वंचित राहिलेला दिसत आहे. याच पार्श्वभूमीच्या आधारे बार्टी संस्थेच्या संशोधन विभागामार्फत मांग-गारुडी समाजाच्या सामाजिक-आर्थिक मागासलेल्या स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यासाठी वापरण्यात आलेली संशोधन पद्धती पुढे देण्यात आली आहे.

## संशोधन पद्धती




*पुणे येथील मांग गारुडी  समाजाची कार्यशाळा*

या समाजातील लोक संपूर्ण महाराष्ट्रात कमी-जास्त संख्येने वेगवेगळया भागात वास्तव्य करीत आहेत. या लोकांपर्यंत पोहोचण्याच्या हेतूने एकूण तीन विभागात गोंदिया, पुणे आणि नाशिक येथे कार्यशाळेचे आयोजन केले गेले.  यामागील  प्रमुख उद्देश हा होता की, मांग गारुडी समाजातील प्रतिनिधी आणि इतर लोकांशी प्रत्यक्ष संवाद साधून माहितीचे संकलन करणे. तसेच या कार्यशाळांदरम्यान,  या समाजाच्या मागासलेल्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी तयार करण्यात आलेली संशोधनपर प्रश्नावली कार्यशाळेत उपस्थित असणाऱ्या मांग गारोडी समाजातील लोकांशी प्रत्यक्ष संवाद साधून भरण्यात आली. गोंदिया येथील कार्यशाळा दि. १९ मे २०१५ रोजी आयोजित करण्यात आली. पुणे येथे दि. ७ जून २०१५ तर नाशिक येथे १४ जून २०१५ रोजी कार्यशाळा घेण्यात आली. तीनही कार्यशाळा मिळून एकूण १४९ प्रश्नावली भरण्यात आल्या. या सर्व कार्यशाळेसाठी मांग-गारुडी समाजाचे प्रतिनिधी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून आले होते.  उदा. गोंदिया येथे झालेल्या कार्यशाळेसाठी गोंदिया, नागपूर, वर्धा इ. जिल्ह्यातील व पुणे येथे झालेल्या कार्यशाळेत पुणे, मुंबई, कल्याण, ठाणे, सांगली, रायगड, अहमदनगर, कोल्हापूर, बीड इ. जिल्ह्यामधून प्रातिनिधी उपस्थित होते. त्याचबरोबर, नाशिक येथे झालेल्या कार्यशाळेत नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव इ. जिल्ह्यातील प्रतिनिधी आले होते. या कार्यशाळेमुळे मांग गारुडी समाजाच्या लोकांशी प्रत्यक्ष संवाद साधता आला. तसेच विविध जिल्ह्यांमधून एकाच ठिकाणी लोकांना संघटीत करण्यासाठी व त्यांच्याकडून माहितीचे संकलन करण्यासाठी ही कार्यशाळा एक उपयुक्त माध्यम ठरली. त्याचबरोबर, दिनांक २० मे २०१५ रोजी गोंदिया जिल्ह्यातील घोगरा या गावाला (घोगरा चौकी, भीमनगर) क्षेत्रीय भेट देऊन मांग गारोडी समाजाच्या सद्यस्थितीचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले. त्यांच्या आर्थिक सामाजिक व इतर मागासलेपणाचा अभ्यास करण्याच्या हेतूने या



*क्षेत्र भेट : लोहगाव मांग गारुडी  वस्ती*

भेटीचे आयोजन करण्यात आले होते. घोगरा चौकीच्या भेटीचे विश्लेषण प्रस्तुत अहवालात देण्यात आले आहे. सुरवातीच्या वरील टप्प्यात केलेल्या पथदर्शी अभ्यासावरून मांग गारुडी समाजाची लोकसंख्या महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात मोठ्या संख्येने असल्याचे निदर्शनास आले. तसेच जनगणना २०११ नुसार नागपूर (६४२८), पुणे (६००६) तर नाशिक (५८६५) हे तीन जिल्हे महाराष्ट्रातील मांग गारुडी समाजाची सर्वाधिक लोकसंख्या असलेले जिल्हे आहेत. यापैकी पुणे जिल्ह्याची मांग गारोडी समाजाच्या अभ्यासासाठी निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धतीने (census survey) पुणे जिल्ह्यातील मांग गारुडी समाजातील सर्व कुटुंबांकडून माहिती संकलीत करण्यात आली. यात मुलाखत अनुसूची आणि गटचर्चा मार्गदर्शिका या साधनांद्वारे सांख्यिकीय व गुणात्मक अशा दोन्ही स्वरूपाच्या माहितीचे संकलन करण्यात आले (पहा परिशिष्ट क्र. २). पुणे जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी वसलेल्या या समाजाच्या वस्त्यामधून सर्वेक्षण करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील मांग गारुडी समाजाच्या कुटुंबांची यादी तयार करण्यासाठी या समाजातील विविध संघटनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांची मदत घेण्यात आली. त्यांनी गावनिहाय व वस्तीनिहाय मांग गारुडी समाजातील कुटुंबांची संख्या दिली. सर्वेक्षण दरम्यान त्या त्या वस्तीतील १००% कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. याप्रमाणे एकूण १२७३ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. (अधिक माहितीसाठी परिशिष्ट क्र. ३ पहा.) विविध गावे व वस्त्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन निरीक्षणाद्वारे गुणात्मक माहिती मिळवली. यासाठी पुणे जिल्ह्यातील एकूण ९ वस्त्यांमध्ये गट चर्चा घडवून आणल्या. गट चर्चा घेण्यासाठी मांग गारुडी समाजाचे एकूण ११ भौगोलिक विभाग पाडण्यात आले. जेणेकरून प्रातिनिधिक स्वरुपात गुणात्मक माहितीचे संकलन करता आले. या चर्चांमधून मांग गारुडी समाजाच्या सामाजिक-आर्थिक व मागासलेल्या स्थिती विषयी महत्वाची माहिती मिळाली. यामध्ये लोहगाव, थेऊर, लोणी काळभोर, शिरूर, पाषाण, बाणेर, चंदवाडी (फुरसुंगी), आमराई (बारामती), माळवाडी (हडपसर) इत्यादी ठिकाणी असणाऱ्या मांग गारुडी



*थेऊर वस्तीमधील गटचर्चा*

समाजाच्या वस्त्यांचा समावेश आहे. गट चर्चाच्या नोंदी रेकॉर्डर आणि नोंदवहीत सुद्धा घेण्यात आल्या. रेकॉर्डर वापरण्याअगोदर गट चर्चेतील लोकांची परवानगी घेण्यात आली होती. त्याचबरोबर, मांग गारुडी समाजाच्या वास्तव्याच्या ठिकाणांची छायाचित्रे सुद्धा काढण्यात आली.तसेच, मांग-गारुडी समाजाच्या आर्थिक-सामाजिक-शैक्षणिक व एकूणच मागासलेल्या स्थितीचा अभ्यास अंतर्गत माहितीचे संकलन करण्यासाठी अन्वेषक म्हणून बार्टीच्या समतादुतांची मदत घेण्यात आली. त्यांच्यामार्फत मुलाखत अनुसुचीच्या आधारे माहिती संकलित करण्यात आली. नेमलेल्या अन्वेषकांवर माहिती संकलनाच्या वेळी बार्टीच्या संशोधन अधिकाऱ्यांनी पर्यवेक्षण केले. त्यांच्या नावांची यादी परिशिष्ट क्र. ४ मध्ये देण्यात आली आहे. त्याअगोदर संशोधन करण्यामागचा उद्देश स्पष्ट करून माहिती संकलीत करताना कोणत्या बाबी संशोधनाच्या उद्देशाने लक्षात घेणे गरजेचे आहे यासाठी एक दिवसाचे प्रशिक्षण त्यांना देण्यात आले. हे प्रशिक्षण दि. ८ सप्टेबर २०१५ रोजी घेण्यात आले. तसेच, दि. १५ सप्टेबर २०१५ ते २९ ऑक्टोबर २०१५ या दरम्यान माहिती संकलनाचे काम करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील मांग गारुडी समाजाच्या सामाजिक,आर्थिक, व शैक्षणिक मागासलेल्या स्थितीचा अभ्यास करून त्याचा प्रारुप अहवाल तयार करण्यात आला. त्यावर मांग गारुडी समाजातील काही प्रतिनिधींना सहभागी करून एकदिवसीय-चर्चासत्र दिनांक १७ मार्च २०१६ रोजी घेण्यात आले. त्यामध्ये प्रारूप अहवालावर सविस्तर व साधकबाधक चर्चा करण्यात आली. प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर व शंकेवर समाधानकारक उत्तरे देण्यात आली.



*लोणी काळभोर वस्तीमधील माहिती* संकलन

पुणे जिल्ह्यातील प्रामुख्याने ग्रामीण व शहरी भागाचा स्वतंत्र चल म्हणून अभ्यास करण्यात आला. यात ग्रामीण भागातील एकूण ७११ तर शहरी भागातील एकूण ५६२ मांग गारोडी समाजाच्या कुटुंब प्रमुखांनी उत्तरदाते म्हणून आपली कौटूंबिक माहिती दिली. शहरी भागात पुणे शहर, पिंपरी-चिंचवड शहर आणि बारामती, लोणावळा व शिरूर इ. छोटी शहरे यामध्ये जर मांग गारुडी समाजाची कुटुंबे वसलेली असतील तर विश्लेषणासाठी त्यांचा समावेश शहरी भागात केला आहे. तसेच, जी कुटुंबे ग्राम पंचायत भागात वसलेली आहेत त्यांचा समावेश ग्रामीण भागात करण्यात आला आहे. त्याचबरोबर, मांग गारुडी समाजातील कुटुंबांची वर्गवारी ही आर्थिक आधारावर करून त्याचे सुद्धा विश्लेषण करण्यात आले आहे. त्यामध्ये, उच्च, मध्यम


आणि अल्प उत्पन्न गटांचा समावेश करण्यात आला आहे. उच्च उत्पन्न गटात मोडणारे कुटुंबांचे मासिक उत्पन्न हे रु. २०,००० पेक्षा जास्त आहे. मध्यम उत्पन्न गटात मोडणारे कुटुंबांचे मासिक उत्पन्न हे रु. १०,००१ ते २०,००० पर्यंत आहे. तसेच, अल्प उत्पन्न गटात मोडणारे कुटुंबांचे मासिक उत्पन्न हे रु. १०,००० पेक्षा कमी आहे. संकलित केलेल्या माहितीचे Statistical Package for Social Sciences (SPSS) मध्ये विश्लेषण करण्यात आले. त्यानुसार, माहितीचे तक्ते तयार करण्यात आले.

सदर अहवालामध्ये पुणे जिल्हा आणि मांग गारुडी समाजासंबंधी प्राथमिक माहिती पहिल्या भागामध्ये देण्यात आली आहे. दुसऱ्या भागात मांग गारुडी समाजाची समाजिक आणि सांस्कृतिक जडणघडण याचे सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. तिसऱ्या भागात मांग गारुडी समाजाची आर्थिक स्थिती याचे विवेचन केले आहे. शेवटी, या संशोधनातून प्राप्त झालेले निष्कर्ष आणि शिफारशीं देण्यात आल्या आहेत.

## पुणे जिल्हा: अभ्यासाचे क्षेत्र आणि मांग गारुडी समाज

क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्र भारतातील तिसरे व लोकसंख्येच्या बाबतीत दुसरे मोठे राज्य आहे. राज्यात उष्ण कटीबंधीय मोसमी हवामान आहे. लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३.०८ लक्ष चौ. किमी आहे. राज्याची लोकसंख्या जनगणना २०११ नुसार ११.२४ कोटी असून ती देशातील एकूण लोकसंख्येच्या ९.३ % आहे. राज्याचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असुन ४५.२ % लोकसंख्या नागरी भागात राहते. महाराष्ट्रामध्ये दर हजार पुरुषामागे ९४६ इतक्या महिला आहेत. राज्यामध्ये अनुसूचित जातींचे प्रमाण ११.८१ % आहे. राज्यात ३६ जिल्हे असून प्रशासकीय सुविधेसाठी ते कोकण, पुणे, नाशिक,औरंगाबाद,अमरावती व नागपूर या सहा महसुली विभागात विभागले आहेत (महाराष्ट्र शासन २०१५: १-२). खाली दिलेल्या महाराष्ट्र राज्याच्या नकाशामध्ये वेगवेगळ्या ३६ जिल्ह्यांची स्थिती दर्शविली आहे.

**आकृती क्र. १ : महाराष्ट्र राज्य नकाशा**




*आकृती क्र. 1: महाराष्ट्र राज्याचा नकाशा*

पुणे हा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला जिल्हा आहे. जिल्ह्याचे १५,६४२ चौरस कि.मी. क्षेत्रफळ असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५ % आहे. जिल्ह्याच्या भौगोलिक क्षेत्रानुसार उदा. घाटमाथा, मावळ आणि पठार असे विभाग पडतात. भीमा नदी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी आहे. पुणे जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यातून किमान एक तरी नदी वाहते. पुणे जिल्ह्यात १४ तहसील असून ते पुढील प्रमाणे आहेत. जुन्नर, आंबेगाव, शिरूर, खेड, मावळ, मुळशी, हवेली, पुणे शहर, दौंड, पुरंधर, वेल्हे, भोर, बारामती, आणि इंदापूर. शिरूर तालुक्याचे क्षेत्र सर्वात मोठे असून सर्वात कमी क्षेत्र हे पुणे शहराचे आहे. खाली दिलेल्या पुणे जिल्ह्याच्या नकाशामध्ये वेगवेगळ्या भागांची स्थिती दर्शविली आहे. पुणे जिल्ह्यात पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिका असून पुणे खडकी आणि देहूरोड येथे कटक मंडळे आहेत. त्याचप्रमाणे खेड तालुक्यात

आळंदी, पुरंदरमध्ये सासवड व जेजुरी, मावळमध्ये तळेगाव दाभाडे व लोणावळा आणि भोर, दौंड, बारामती, शिरूर, जुन्नर व इंदापूर तालुक्यामध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे जिल्ह्यात एकूण ११ नगरपालिका आहेत. पुणे शहर वगळता १३ तालुक्यात पंचायत समित्या आहेत. जिल्ह्यात एकूण १८६६ खेडी आहेत, त्यांपैकी १८ खेडी ओसाड आहेत. जिल्ह्याच्या पश्चिमेस १००० मिलीमीटरपेक्षा जास्त तर अतिपूर्व भागात सुमारे ६०० ते ७०० मिलीमीटर पाऊस पडतो. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ९४.२९ लाख असून यामध्ये ४९.२४ लाख पुरुष व ४५.०५ लाख स्त्रिया आहेत. यानुसार जिल्ह्यात दर हजार पुरुषामागे स्त्रियांची संख्या ९१५ आहे. एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या ११.८० लाख (१२.५२%) आहे. जिल्ह्याचे चालू किंमतीनुसार निव्वळ उत्पन्न २०११-२०१२ च्या वर्षाचे दरडोई उत्पन्न रु. १,४०,५७० एवढे आहे (महाराष्ट्र शासन २०१३: १-१०).


**आकृती क्र. २ पुणे जिल्हा नकाशा**




*आकृती क्र. २: पुणे जिल्ह्याचा नकाशा*

पुणे जिल्ह्यातील मांग-गारुडी समाजाच्या सामाजिक-आर्थिक मागासलेल्या स्थितीचा अभ्यास करताना मांग गारुडी समाजात सुमारे १२७३ कुटुंब संख्या आढळून आली आहे. या समाजातील उत्तरदात्यांकडून कुटुंबांसाठी असणारी मुलाखत अनुसूची  भरून घेण्यात आली. उत्तरदाते हे प्रामुख्याने कुटुंबातील प्रौढ स्त्री-पुरुष होते. त्याची  महत्वपूर्ण माहिती पुढीलप्रमाणे देण्यात आली आहे.

**आकृती क्र. ३: उत्तरदात्यांचे स्त्री-पुरुष प्रमाण**




आकृती क्र. ३ नुसार मांग गारुडी समाजाच्या अभ्यासासाठी माहिती जमा करताना मुलाखत घेतलेल्या उत्तरदात्यांपैकी  पुरुषांचे प्रमाण स्त्रियांच्या तुलनेत थोडे जास्त म्हणजे ५८.३० % आहे.

**तक्ता क्र. १: उत्तरदात्याचे वयनिहाय प्रमाण**

| वय | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| १८ ते ३० | ३८६ | ३० |
| ३१ ते ४५ | ५३५ | ४२ |
| ४५ ते ६० | २६७ | २१ |
| ६० पेक्षा जास्त | ८२ | ६ |
| एकूण | १२७० | १०० |


तक्ता क्र. १ नुसार असे दिसते की, ३१ ते ४५ या वयोगटातील उतरदात्यांचे प्रमाण संशोधनासाठी माहिती गोळा करताना ४२ % आहे. त्याखालोखाल १८ ते ३० वयोगटातील उत्तरदात्यांचे प्रमाण ३० % आहे. याचाच अर्थ की, अभ्यासामध्ये तरुण उत्तरदाते अधिक प्रमाणात आहेत.

**तक्ता क्र. २ : उत्तरदात्यांची वैवाहिक स्थिती**

| वैवाहिक स्थिती | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---:|---:|
| परित्यक्ता | १५ | १.२ |
| घटस्फोटीत | ३ | ०.२ |
| विवाहित | १०५९ | ८३.२ |
| अविवाहित | ३४ | २.७ |
| विधवा | १५४ | १२.१ |
| विदुर | ८ | ०.६ |
| एकूण | १२७३ | १००.० |

तक्ता क्र. २ नुसार, मुलाखत घेतलेल्या उत्तरदात्यांपैकी विवाहित उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. त्याचबरोबर परितक्त्या, घटस्फोटीत आणि विधवा महिलांचे प्रमाण सुद्धा १३.५ % दिसून येते. सामाजिक समस्यांच्या दुष्टीकोनातून महिलांच्या ह्या प्रमाणाकडे पाहिले जाणे आवश्यक आहे.

**आकृती क्र. ४: उत्तरदात्यांचे शिक्षणाचे प्रमाण**





आकृती क्र. ४ नुसार, मुलाखत घेतलेल्या उत्तरदात्यांपैकी अशिक्षित उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वात जास्त (४९.६०%) आहे. याउलट, पदवीधर आणि पदव्युत्तर उच्चशिक्षित उत्तरदात्याचे प्रमाण अत्यल्प (१.४%) आहे.

**तक्ता क्र. ३ : कुटुंबातील सदस्य संख्या व त्याचे प्रमाण**

| लिंग | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| प्रौढ महिला | १९९० | २८ |
| प्रौढ पुरुष | १८०४ | ३१ |
| मुले | १३९७ | २२ |
| मुली | १२५७ | १९ |
| एकूण | ६४४८ | १००.०० |

२०११ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्ह्यातील मांग गारुडी समाजाची लोकसंख्या ६००६ आहे. तक्ता क्र. ३ नुसार, मांग गारुडी समाजाचे सर्वेक्षण करण्यात आलेल्या सर्व कुटुंबातील सदस्यांची संख्या सुमारे ६४४८ असून त्यामध्ये प्रौढ पुरुषांचे प्रमाण अधिक आहे. तसेच मुलींच्या तुलनेत मुलांचे प्रमाणही किंचित अधिक आहे.

**आकृती क्र. ५: ग्रामीण व शहरी भागातील कुटुंब संख्या व त्याचे प्रमाण**




आकृती क्र. ५ नुसार, पुणे जिल्ह्यातील मांग गारुडी समाजाची क्षेत्र निहाय कुटुंबसंख्या शहरी व ग्रामीण अशा दोन्ही क्षेत्रात विभागली आहे. यापैकी प्रस्तुत अभ्यासात या समाजाची शहरी भागातून ५६२ तर ग्रामीण भागातून ७११ कुटुंब संख्या आढळून आली आहे. दोन्ही भागांमध्ये जवळपास सारख्या प्रमाणात कुटुंब संख्या विभागलेली दिसत आहे.

**तक्ता क्र. ४: कुटुंबांचे व्यवसायाचे प्रमाण**

| व्यवसाय | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| शेती | ११ | ०.९ |
| शेती सलग्न व्यवसाय | ११ | ०.९ |
| शेत मजुरी | ९० | ७.१ |
| व्यावसायिक | १४३ | ११.२ |
| सरकारी नोकरी | ४४ | ३.५ |
| इतर | १२४ | ९.७ |
| इतर मजुरी | ७५५ | ५९.३ |
| खाजगी नोकरी | ९५ | ७.५ |
| एकूण | १२७३ | १००.० |

तक्ता क्र. ४ नुसार, मांग गारुडी समाजाच्या सर्वेक्षणामध्ये समाविष्ट असणाऱ्या उत्तरदात्यांच्या कुटुंबांपैकी इतर मजुरी करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण जास्त (५९.३०%) दिसून येते. इतर मजूरीत अंग-मेहनतीच्या कामांचा समावेश आहे. यामध्ये भंगार गोळा करणे, चाकुला धार लावणे, धुणं भांडीची कामे करणे, कचरा वेचणे, गवंडी, बिगारी, वाढपी, हमाली, गावठी दारू बनविणे अशा कामांचा समावेश होतो. त्यापाठोपाठ, छोटे-मोठे व्यवसाय आणि शेतमजुरी यांच्या कामात असण्याचे अनुक्रमे ११% व ७.१०% प्रमाण आहे. ग्रामीण भागात उदरनिर्वाहासाठी म्हशी राखोळीने सांभाळायला घेणारी कुटुंबे निदर्शनास आली.

**तक्ता क्र. ५: कुटुंबाचे मासिक उत्पनाचे प्रमाण**

| उत्पन्न गट | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| उच्च | १३४ | १०.५ |
| मध्यम | ३९ | ३.१ |
| अल्प | १०९२ | ८५.८ |
| प्रतिक्रीया नाही | ८ | .६ |
| एकूण | १२७३ | १००.० |

तक्ता क्र. ५ नुसार, मांग गारुडी समाजाच्या सर्वेक्षणामध्ये सुमारे ८५.८०% कुटुंबाचे मासिक उत्पन्न १०००० पेक्षा कमी दिसून येत आहे. त्यावरून असे म्हणता येईल की, या समाजाची आर्थिक स्थिती समाधानकारक नाही. पुढील प्रकरणात मांग गारुडी समाजाची सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडण याविषयी विवेचन करण्यात आले आहे.

*बारामती येथील मांग गारुडी वस्ती*



प्रकरण २:

# मांग गारुडी आणि मुलभूत सेवासुविधा

कोणत्याही समाजाला सुधारित आणि निरोगी जीवनमान जगण्यासाठी मुलभूत सेवासुविधा मिळणे क्रमप्राप्त असते. त्यामध्ये शिक्षण, आरोग्य, पाणी, वीज पुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था, शौचालय, लोक वस्तीस जोडलेले रस्ते, आणि वाहतूक व्यवस्था इ. सोयी-सुविधांचा समावेश असतो. मांग गारुडी समाजाची स्थिती अभ्यासत असताना पुढील निरीक्षणे आढळून आली.

## मांग गारुडी समाजासाठी उपलब्ध असणाऱ्या सोई-सुविधा

पुणे जिल्ह्यात मांग गारुडी समाज राहत असलेल्या बहुतांश वस्त्यांमध्ये मुलभूत सेवा सुविधांची दयनीय अवस्था निदर्शनास आली. यामध्ये पिण्याचे पाणी, अधिकृत विजेची उपलब्धता, सांडपाण्याची सुविधा वस्तीअंतर्गत स्वच्छता, कचरा पेटी, घंटा गाडी, भूमी अंतर्गत नाले, मांग गारुडी समाजाच्या वस्तीस जोडलेले पक्के रस्ते, शौचालय इत्यादी सुविधा निकृष्ट दर्जाच्या आढळून आल्या. बारामतीमधील आमराई या मांग गारुडी समाजाच्या वस्तीमध्ये लोकांच्या घरासमोरून गटार लाईन काढलेली दिसून आली.





*थेऊर व चंदवाडी (फुरसुंगी) या मांग गारुडी वस्तींमधील पाण्याची सुविधा*

**तक्ता क्र. ६ : विभागनिहाय पाण्याची सुविधा उपलब्धतेचे प्रमाण**

| विभाग | पाण्याची सुविधा उपलब्धतेचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | १२४ | ४३८ | ५६२ |
| | २२.१०% | ७७.९०% | १००.००% |
| ग्रामीण | ३६३ | ३४८ | ७११ |
| | ५१.१०% | ४८.९०% | १००.००% |
| एकूण | ४८७ | ७८६ | १२७३ |
| | ३८.३०% | ६१.७०% | १००.००% |

तक्ता क्र. ६ नुसार शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात पाण्याच्या सुविधेचा अभाव दिसून आला. ग्रामीण भागातील ५१.१०% कुटुंबांना पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. तर शहरी भागात २२.१० % कुटुंबाना पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. जरी पाण्याची सुविधा उपलब्ध असली तरी नळाच्या आजूबाजूला गटारे-नाले व कचरा अशी अस्वच्छता बहुतांशी वस्त्यांमध्ये निदर्शनास आली. असुरक्षित आणि अस्वच्छ पाण्यामुळे आरोग्य धोक्यात असते ह्या अनारोग्य परिस्थितीचा सामना त्यांना करावा लागतो. बारामती मधील आमराई वस्तीमधील महिला रोज १ किलोमीटर पायी चालून पाट बंधारे खात्याच्या कॅनॉलवर कपडे धुण्यास जातात. लोणी काळभोर वस्तीमधील लोक वस्तीच्या मागे वाहणाऱ्या अतिशय अस्वच्छ अशा नाल्यात अंघोळी करतात, कपडे व म्हशी धुतात, तसेच येथेच शौचासही बसतात. तसेच माळवाडी, चंदवाडी, लोणी काळभोर, थेऊर येथील मांग गारुडी वस्त्यांमध्ये सार्वजनिक स्त्रोतांवर पिण्याच्या पाण्याचे तोटी नसलेले पाईप असल्याचे क्षेत्र भेटी दरम्यान दिसून आले.

**तक्ता क्र . ७: विभागनिहाय वीज सुविधा उपलब्धतेचे प्रमाण**

| विभाग | वीज सुविधा उपलब्धतेचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | १३२ | ४३० | ५६२ |
| | २३.५०% | ७६.५०% | १००.००% |
| ग्रामीण | ३०८ | ४०३ | ७११ |
| | ४३.३०% | ५६.७०% | १००.००% |
| एकूण | ४४० | ८३३ | १२७३ |
| | ३४.६०% | ६५.४०% | १००.००% |

तक्ता क्र. ७ नुसार  शहरी भागातील २३.५० % कुटुंबांकडे वीज सुविधा उपलब्ध नाही. तर ग्रामीण भागातील ४३.३०% कुटुंबांकडे विजेची सुविधा उपलब्ध नाही. लोणी काळभोर येथील मांग गारुडी  समाजाच्या वस्तीमध्ये आकडे टाकून अनधिकृतपणे वीज घेतल्याचे दिसून आले. तसेच साडेसतरा नळी मधील बरीचशी मांग गारुडी कुटुंबे अजूनही वीज सुविधा अभावी अंधारात जीवन कंठतात.

**तक्ता क्र . ८ : विभागनिहाय वाहतूक व्यवस्था असण्याचे प्रमाण**

| विभाग | वाहतूक व्यवस्था | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | १६१ | ४०१ | ५६२ |
| | २८.६०% | ७१.४०% | १००.००% |
| ग्रामीण | ३४८ | ३६३ | ७११ |
| | ४८.९०% | ५१.१०% | १००.००% |
| एकूण | ५०९ | ७६४ | १२७३ |
| | ४०.००% | ६०.००% | १००.००% |

तक्ता क्र. ८ नुसार  शहरी भागातील ७१.४०% कुटुंबाना वाहतूक व्यवस्था उपलब्ध आहे. यामध्ये पी.एम.पी.एल. बस, शेअर रिक्षा अशा वाहतूकीच्या साधनांचा समावेश आहे. तसेच ग्रामीण भागातील ५१.१० % कुटुंबांना ही सुविधा आहे. तरीही ४८.९०% ग्रामीण भागातील कुटुंबे वाहतूकीच्या सुविधांच्या उपलब्धतेपासून वंचित आहेत. मांग गारुडी  समाजाची ही कुटुंबे मुख्य वस्ती पासून दूर अंतरावर असल्याचे आढळून आले.

**तक्ता क्र. ९  : विभागनिहाय पक्के रस्ते उपलब्धतेचे प्रमाण**

| विभाग | पक्के रस्ते उपलब्धतेचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | २३६ | ३२६ | ५६२ |
| | ४२.००% | ५८.००% | १००.००% |
| ग्रामीण | ४१८ | २९३ | ७११ |
| | ५८.८०% | ४१.२०% | १००.००% |
| एकूण | ६५४ | ६१९ | १२७३ |
| | ५१.४०% | ४८.६०% | १००.००% |


*मांग-गारुडी वस्ती थेऊर मधील रस्त्याची अवस्था*

वरील तक्ता क्र. ९ नुसार एकंदरीत ५१.४०% मांगगारोडी कुटुंबांना त्यांच्या वस्तीपासून पक्क्या रस्त्याची सुविधा उपलब्ध नाही. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात हे प्रमाण जास्त आहे. ग्रामीण भागात निम्म्या पेक्षा जास्त म्हणजे ५८.८०% कुटुंबे पक्क्या रस्त्याच्या सुविधे पासून वंचित आहेत. थेऊर गावातील मांग गारोडी वस्ती सुरु होते त्या ठिकाणापर्यंत रस्त्याचे काम केले गेले व वस्ती सुरु होताच पक्का रस्ता बाधण्याचे काम थांबविलेले दिसून आले. शहरी भागात देखील अजूनही ४२% कुटुंबांना वस्ती अंतर्गत पक्का रस्ता नाही. बारामती येथील आमराई वस्तीमध्ये मांग गारुडी समाजाची वस्ती सुरु होते त्या ठिकाणी पक्के रस्ते केलेले नाहीत. उलट, दलित वस्ती सुधार कार्यक्रमाअंतर्गत इतर दलितांच्या वस्तीमध्ये पक्के रस्ते निर्माण केले आहेत असे दिसून आले.

**तक्ता क्र. १०: विभागनिहाय दवाखाना उपलब्धतेचे प्रमाण**

| विभाग | दवाखाना उपलब्ध उपलब्धतेचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ८५ | ४७७ | ५६२ |
| | १५.१०% | ८४.९०% | १००.००% |
| ग्रामीण | ११७ | ५९४ | ७११ |
| | १६.५०% | ८३.५०% | १००.००% |
| एकूण | २०२ | १०७१ | १२७३ |
| | १५.९०% | ८४.१०% | १००.००% |

वरील तक्ता क्र. १० नुसार ग्रामीण भागातील ८३.५०% कुटुंबांना तर शहरी भागातील ८४.९०% कुटुंबांना घराजवळ दवाखाना उपलब्ध आहे. बारामतीमधील आमराई वस्तीमधील मांग गारुडी लोकांना सरकारी दवाखान्यासाठी ३ किलोमीटर अंतरावर जावे लागते. पण त्याठिकाणी मांग गारुडी समाजातील लोकांना दुय्यम दर्जेची वागणूक मिळते असे गट चर्चे दरम्यान लोकांनी सांगितले. याचाच अर्थ की, त्यांना आरोग्य सुविधा उपलब्ध असूनही त्या मिळण्यासाठी मानहानी सहन करावी लागते.

**तक्ता क्र. ११ : विभागनिहाय सांडपाणी व्यवस्था उपलब्धतेचे प्रमाण**

| विभाग | सांडपाणी व्यवस्था उपलब्धतेचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | २८० | २८२ | ५६२ |
| | ४९.८०% | ५०.२०% | १००.००% |
| ग्रामीण | ४८७ | २२४ | ७११ |
| | ६८.५०% | ३१.५०% | १००.००% |
| एकूण | ७६७ | ५०६ | १२७३ |
| | ६०.३०% | ३९.७०% | १००.००% |

वरील तक्ता क्र. ११ नुसार ६०.३०% मांग गारोडी कुटुंबांना सांडपाण्याची सुविधा उपलब्ध नाही. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात हे प्रमाण अधिक दिसत आहे. ग्रामीण भागात ६८.५०% कुटुंबांना सांडपाण्याची सुविधा उपलब्ध नाही. यावरून निम्म्याहून अधिक कुटुंबांना उघड्यावरील गटारे व नाले या अनारोग्य स्थितीस सामोरे जावे लागत आहे. सांडपाण्याची योग्यरीत्या व्यवस्था नसल्याने आमराई, लोणी काळभोर, चंदवाडी, थेऊर, लोहगाव अशा ठिकाणच्या मांग गारुडी वस्त्यांमध्ये दुर्गंधी व घाणीची परिस्थिती दिसून आली. साडेसतरा नळी वस्तीमध्ये राहणाऱ्या मांग गारुडी कुटुंबांना पावसाळ्यात गुडघ्यापर्यंतच्या पाण्यातून आपल्या घरात जावे लागते. तर घरात शिरणाऱ्या पाण्याला बादलीने बाहेर काढावे लागते. ही परिस्थिती माहिती संकलन करताना प्रत्यक्षात निदर्शनास आली. मांग गारुडी राहत असलेल्या बहुतांशी वस्त्यांमधील सांडपाणी उघड्या गटारांने ओढ्यात आणि जवळच्या कॅनॉलमध्ये सोडले जाते. या ठिकाणी गावातील मैला पाणी व इतर दुषित पाणी देखील सोडले जाते. त्यामुळे मांग गारुडी वस्तीच्या जवळून वाहणाऱ्या या कॅनॉल आणि ओढ्याचे पाणी अतिशय दुषित व दुर्गंधी पसरविणारे झाले आहे. त्यामुळे मांग गारुडी वस्तीमध्ये दुर्गंधी व अस्वच्छतेचे वातावरण आढळून आले. या पाण्यामुळे डासांचे प्रमाण वाढले आहे व परिणामी टायफाईड, मलेरिया, डेंगूसारखे आजार होण्याची शक्यता वाढत आहे, असे फुरसुंगी मधील चंदवाडी या मांग गारुडी वस्तीतील लोकांनी सांगितले.



*थेऊर मांग गारुडी वस्तीमधील सांडपाण्याची अवस्था*



*लोणी काळभोर मांग गारोडी वस्तीमधील सांडपाण्याची अवस्था*

**तक्ता क्र. १२: विभागनिहाय शौचालय व्यवस्था उपलब्धतेचे प्रमाण**

| विभाग | शौचालय व्यवस्था उपलब्धतेचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | २५९ | ३०३ | ५६२ |
| | ४६.१०% | ५३.९०% | १००.००% |
| ग्रामीण | ४७६ | २३५ | ७११ |
| | ६६.९०% | ३३.१०% | १००.००% |
| एकूण | ७३५ | ५३८ | १२७३ |
| | ५७.७०% | ४२.३०% | १००.००% |

वरील तक्ता क्र. १२ नुसार एकूण ५७.७०% मांग गारोडी कुटुंबाना शौचालयांची व्यवस्था नाही. हे प्रमाण ग्रामीण भागात अधिक दिसते. ग्रामीण भागात अजूनही ६६.९०% कुटुंबे उघड्यावर शौचालयास जातात. शहरी भागात ४६.१०% कुटुंबांना ही सुविधा उपलब्ध नाही. अजूनही मांग गारुडी समाजातील लोकांना वस्तीलगत वाहणाऱ्या नाल्याच्या अथवा कॅनॉलच्या बाजूने उघड्यावर शौचास बसावे लागते. अशी परिस्थिती लोणी काळभोर व आमराई या वस्त्यांमध्ये दिसून आली. ग्रामीण भागमध्ये संपूर्ण स्वच्छता अभियान राबवून गाव स्वच्छ आणि हागणदारी मुक्त करण्यासाठी संकल्प केला जातो. असे प्रयत्न या ठिकाणी होताना दिसून येत नाही.



*लोणी काळभोर येथील ओढा*



*सार्वजनिक शौचालय, लोणी काळभोर*

**तक्ता क्र. १३: विभागनिहाय आधार कार्ड असण्याचे प्रमाण**

| विभाग | आधार कार्ड | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ५१ | ५११ | ५६२ |
| | ९.१०% | ९०.९०% | १००.००% |
| ग्रामीण | ७९ | ६३२ | ७११ |
| | ११.१०% | ८८.९०% | १००.००% |
| एकूण | १३० | ११४३ | १२७३ |
| | १०.२०% | ८९.८०% | १००.००% |

तक्ता क्र. १३ नुसार ८९.८०% मांग गारोडी कुटुंबाकडे आधार कार्ड असल्याचे दिसत आहे, शहरी भागात त्याचे प्रमाण सुमारे ९१ %असून ग्रामीण भागात तेच प्रमाण ८९ %आहे. आधार कार्ड कोणत्याही शासकीय योजनेसाठी आधारभूत मानले जाते. ते उपलब्ध असेल तर वंचित राहण्याची शक्यता असते.

**तक्ता क्र. १४ : विभागनिहाय मतदान कार्डचे प्रमाण**

| विभाग | मतदान कार्ड | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | आहे | |
| शहरी | ६४ | ४९८ | ५६२ |
| | ११.४०% | ८८.६०% | १००.००% |
| ग्रामीण | ८८ | ६२३ | ७११ |
| | १२.४०% | ८७.६०% | १००.००% |
| एकूण | १५२ | ११२१ | १२७३ |
| | ११.९०% | ८८.१०% | १००.००% |

तक्ता क्र. १४ मध्ये मांग गारुडी समाजातील कुटुंबांकडे उपलब्ध असणाऱ्या मतदान कार्डाचे एकूण प्रमाण ८८.१०% दिसत आहे. अजूनही शहरी भागातील ११.४०% व ग्रामीण भागातील १२.४० %कुटुंबांकडे मतदान कार्ड नाही. शिक्षणाचा अभाव व मतदानाच्या हक्काबाबतची उदासीनता ही यामागील कारणे चर्चेदरम्यान समोर आली. तसेच ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागातील या समाजाकडे मतदान कार्ड असण्याचे प्रमाण अल्प फरकाने जास्त दिसून येते.

**तक्ता क्र. १५: विभागनिहाय प्राथमिक शाळाव्यवस्था उपलब्धतेचे प्रमाण**

| विभाग | प्राथमिक शाळा व्यवस्था | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ६६ | ४९६ | ५६२ |
| | ११.७०% | ८८.३०% | १००.००% |
| ग्रामीण | ३७ | ६७४ | ७११ |
| | ५.२०% | ९४.८०% | १००.००% |
| एकूण | १०३ | ११७० | १२७३ |
| | ८.१०% | ९१.९०% | १००.००% |




*मांग गारुडी वस्तीमधील प्राथमिक शाळा (बारामती)*

तक्ता क्र. १५ नुसार, मांग गारुडी समाजाची सध्याची प्राथमिक शाळेची सुविधा (सरकारी आणि खाजगी असे मिळून) विचारली असता असे आढळून आले की, ग्रामीण भागातील ९४.८०% कुटुंबांना तर शहरी भागातील ८८.३०% कुटुंबाना प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध आहे. (मांग गारुडी समाजाच्या शैक्षणिक स्थितीचे सविस्तर विवेचन प्रकरण ३ मध्ये दिले आहे.)

## आरोग्याची स्थिती

**तक्ता क्र १६ : विभागनिहाय आजारीपणात उपचार घेण्याच्या ठिकाणाचे प्रमाण**

| विभाग | आजारीपणात उपचार ठिकाण | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | भगत | दवाखाना | घरगुती उपचार | पारंपारिक वैद्य | |
| शहरी | २७ | ५१६ | १७ | २ | ५६२ |
| | ४.८०% | ९१.८०% | ३.००% | ०.४०% | १००.००% |
| ग्रामीण | २०१ | ४९७ | ११ | २ | ७११ |
| | २८.३०% | ६९.९०% | १.५०% | ०.३०% | १००.००% |
| एकूण | २२८ | १०१३ | २८ | ४ | १२७३ |
| | १७.९०% | ७९.६०% | २.२०% | ०.३०% | १००.००% |

वरील तक्ता क्र. १६ नुसार एकूण ७९.६०% मांग गारुडी कुटुंबे आजारीपणात दवाखान्यातच उपचार घेतात असे दिसते. हे प्रमाण ग्रामीण भागात ६९.९०% तर शहरी भागात ९१.८०% कुटुंबे आजारी पडल्यावर दवाखान्यात उपचार घेतात. ग्रामीण भागात अजूनही २८.३०% कुटुंबे आजारपणात बाबा-भगत यांच्याकडे जाताना दिसत आहेत. अशाप्रकारे एकंदरीतच मांग गारोडी समाजावर बाबा-भगताचा प्रभाव असल्याचे १७.९०% कुटुंबांनी सांगितले आहे.

**तक्ता क्र . १७ : विभागनिहाय कुटुंबातील सदस्यांना दीर्घकालीन आजार असण्याचे प्रमाण**

| विभाग | कुटुंबात सदस्यांना दीर्घकालीन आजार | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ५०६ | ५६ | ५६२ |
| | ९०.००% | १०.००% | १००.००% |
| ग्रामीण | ६३८ | ७३ | ७११ |
| | ८९.७०% | १०.३०% | १००.००% |
| एकूण | ११४४ | १२९ | १२७३ |
| | ८९.९०% | १०.१०% | १००.००% |

वरील तक्ता क्र. १७ नुसार ग्रामीण आणि शहरी भागातील कुटुंबांमधील सदस्यांमध्ये दीर्घकालीन आजार असण्याचे प्रमाण जवळजवळ सारखेच (९०%) आहे. केवळ १०.१० % कुटुंबांनी आपणास असे आजार असल्याचे सांगितले. यामध्ये मधुमेह, क्षयरोग, दमा अशा आजारांचा समावेश आहे. असे असले तरीही, साथींच्या रोगांनी या समाजातील लोक आजारी पडत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या पाठीमागे घाणीच्या साम्राज्यात त्यांचे वास्तव्य असण्याचे प्रमुख कारण आहे.

प्रकरण ३:

# मांग गारुडी समाजाची सामाजिक-सांस्कृतिक स्थिती

## जातीचे मुळ व उगम

मांग गारुडी जात ही महाराष्ट्राच्या अनेक ठिकाणी ग्रामीण भागात आढळून येत असली (Russell R.V. and Hiralal १९९३, १८९) तरी अलीकडे तिचे प्राबल्य शहरी भागातही जाणवू लागले आहे. मांग गारुडी हे मुख्यतः गारुडी म्हणून ओळखले जातात. (Enthoven १९९०, ३५८). 'मांग- गारुडी'समाजाचे लोकही स्वत:ला 'भटकी जमात' समजत असले तरी, शासन- दरबारी त्यांची तशी अधीकृत नोंद नाही (सेंटर ऑफ स्टडीज इन सोशल सायन्सेस, १९९९). मांग-गारुडी ही मांग जातीतीलच एक पोट-जात आहे जी गुन्हेगार जमात म्हणून ओळखली जात असे (Singh १९९३, ९००). मांग गारुडी हे मेलेले जनावरे उचलण्यात माहीर असलेला गट मानत असे. मांग गारुडी हा समाज "मातंग" समाजाचा एक भाग पूर्वीपासून मानला गेलेला आहे. मूळ मातंग जातीची असलेली ही पोटजात त्यांच्या पारंपारिक व्यवसायामुळे मातंग समाजापासून वेगळी पडलेली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात गुन्हेगार म्हणून ओळखली जाणारी ही जात उपजीवीकेसाठी जश्या छोट्या-मोठ्या चोऱ्या करीत होते तसे काही लोकांनी पोट भरण्यासाठी "गारुडी" जमातीची हातचलाखी किंवा जादूचा खेळ करणे व्यवसाय स्वीकारला होता, म्हणून लोक त्यांना मांग गारुडी म्हणून ओळखू लागले (चव्हाण, २००४: ६). महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीच्या यादीनुसार ती मांग-गारुडी, मांग-गारोडी या नावाने ही ओळखली जाते. या समाजातील कार्येकर्त्यांशी चर्चा करताना असे दिसून आले की, १३ ऑगस्ट १७७३ रोजी नारायणराव पेशवे यांचा खून झाला. तो गारदी ह्या मुस्लीम पठाणांनी केला. तेव्हा असा समज झाला की, हा खून गारुडीने केला. त्यामुळे गारुडी समाजाला गुन्हेगार समजण्यात येऊ लागले. तसेच, मांग-गारुडी ही पूर्वाश्रमीची गुन्हेगार जात असल्याने त्यांना 'सेटलमेंट कॅम्प'मध्ये ठेवण्यात येत होते. आजही बारामती मधील आमराई वस्तीत राहणाऱ्या मांग गारुडी समाजाला गुन्हेगार म्हणून संशयाने पाहिले जाते, असे मत गट चर्चे दरम्यान लोकप्रतिनिधींनी मांडले. पोलीस स्टेशनला या समाजाची योग्य पद्धतीने तक्रार नोंदविली जात नाही. याउलट कोणतीही चोरी झाली तर आमच्या वस्तीत येऊन पोलीस विचारपूस करतात, असे या वस्तीतील लोकांनी सांगितले. मांग-गारुडी समुदाय हा मुळात सह्याद्रीच्या पायथ्याशी राहणारा समजला जातो. संपूर्ण महाराष्ट्रात विखुरलेला हा समाज आहे. त्यांची लोकसंख्या नागपूर, पुणे, नाशिक, कोल्हापूर, वर्धा, यवतमाळ, सोलापूर, लातूर,

अहमदनगर , मुंबई, धुळे, जळगाव, भंडारा, गोंदिया, नंदुरबार ठाणे इ. जिल्ह्यात आढळून येते. तसेच, बीड, सांगली, गडचिरोली, रायगड, चंद्रपूर या जिल्ह्यातही मांग-गारुडी समाज निवास करत आहे असे पथदर्शी सर्वेक्षणातून दिसून आले.

या समाजाचे लोकही स्वत:ला 'भटकी जमात' समजत असले तरी, वस्तुतः या जातीचा समावेश अनुसूचित जातीत करण्यात आला आहे. अनेक जाती-जमातीचे लोक अनुसूचित जातीत समावेश करावा अशी मागणी करीत असताना आम्हाला अनुसूचीत जातीतून काढून टाकावे अशी या समाजाची सात्तत्याने मागणी राहिली आहे (सेंटर ऑफ स्टडीज इन सोशल सायन्सेस, पृ. क्र. ६-७). तसेच, या समाजाच्या काही कार्यकर्त्यांच्या मते, त्यांचा समावेश अनुसूचित जातीत असला तरीही त्यांच्या समाजाचे भटके स्वरूप असल्याने त्यांना 'भटके' समजण्यात यावे. ब्रिटीश काळात या समाजाला गुन्हेगार असे घोषित करण्यात आल्यामुळे स्वत:चा जीव धरून गावो गावी हिंडत असत. कुठल्याही गावात हा समाज ३ दिवसापेक्षा जास्त राहत नव्हता. भटकंती स्वरूप असलेल्या या समाजाला सतत हिंडत राहवे लागत होते. ब्रिटीशकाळा पासूनच या समाजाला जातीभेद आणि अस्पृश्यता या समस्यांना सामोरे जावे लागत असे. चंदवडी, बाणेर, शिरूर, थेऊर आणि बारामती या ठिकाणी घेतलेल्या गट चर्चेत सुद्धा भटक्या-विमुक्तांचा इतिहास कथन करण्यात आला. या समाजाने मांग या समाजाच्या वस्तीतच आपली वस्ती करून स्वत:चा जीव वाचवण्यासाठी मांग हे नाव जातीपुढे लावले आणि तेव्हापासून मांग गारुडी अशी या समाजाची ओळख पडली.

**तक्ता क्र. १८: विभागनिहाय पूर्वजांचे राहण्याचे स्वरूप व त्याचे प्रमाण**

| विभाग | पूर्वजांचे राहण्याचे स्वरूप | | एकूण |
|---|---|---|---|
| | भटके | स्थायिक | |
| शहरी | ५२१ | ४१ | ५६२ |
| | ९२.७०% | ७.३०% | १००.००% |
| ग्रामीण | ६१६ | ९५ | ७११ |
| | ८६.६०% | १३.४०% | १००.००% |
| एकूण | ११३७ | १३६ | १२७३ |
| | ८९.३०% | १०.७०% | १००.००% |

तक्ता क्र. १८ नुसार असे दिसते की, मांग गारुडी समाजातील एकूण ८९.३० % कुटुंबांच्या मते, त्यांच्या पूर्वजांच्या राहण्याचे स्वरूप हे भटके होते. शहरी भागातील ९२.७० % कुटुंब आणि ग्रामीण भागातील ८६.६०

% कुटुंबे यांचे पूर्वज भटके होते असे आढळून आले आहे. तसेच पूर्वज भटके होते पण सध्या स्थायिक आहोत असे बारामती मधील गट चर्चेत मांग गारुडी लोकांनी सांगितले.

**तक्ता क्र. १९: विभागनिहाय स्थायिक होण्याच्या कालावधीचे प्रमाण**

| विभाग | स्थायिक होण्याचा कालावधी | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | ३० वर्षापूर्वी | ३० ते ६० वर्षापूर्वी | ६० वर्षापेक्षा जास्त | माहित नाही / लागू नाही | |
| शहरी | ९७ | ८७ | ३०९ | ६९ | ५६२ |
| | १७.३०% | १५.५०% | ५५.००% | १२.२०% | १००.००% |
| ग्रामीण | ७२ | ९७ | ३३५ | २०७ | ७११ |
| | १०.१०% | १३.६०% | ४७.१०% | २९.१०% | १००.००% |
| एकूण | १६९ | १८४ | ६४४ | २७६ | १२७३ |
| | १३.३०% | १४.५०% | ५०.६०% | २१.७०% | १००.००% |

वरील तक्ता क्र . १९ नुसार ६० वर्षांपेक्षा जास्त वर्षांपासून स्थायिक झालेल्या मांग गारुडी लोकांचे प्रमाण ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागांत मोठ्या प्रमाणात दिसून येते. यात शहरी भागात ५५% तर ग्रामीण भागात ४७.१०% कुटुंबे दिसतात. तसेच शहरी भागात स्थायिक होण्याचे प्रमाण हे ग्रामीण भागापेक्षा जास्त आहे. ३० वर्षांपासून स्थायिक झालेल्या या समाजातील लोकांचे प्रमाण हे केवळ १३.३० % आहे. तसेच, काही प्रमाणात उत्तरदात्यांना त्यांच्या पुर्वजांच्या भटक्या स्वरूपाविषयी माहिती नव्हती. फुरसुंगी येथे झालेल्या गट चर्चेत एका व्यक्तीने आपली पाचवी पिढी या वस्तीत राहत असल्याचे सांगितले. तसेच काही कुटुंबे जरी एका ठिकाणी राहत असले तरी कर्ता पुरुष गोवोगावी उदरनिर्वाहासाठी भटकत होता असे सांगितले. सध्या तरी मांग गारुडी समाज स्थायिक झालेला दिसून येत आहे.

**तक्ता क्र. २०: विभागनिहाय विशिष्ट ठिकाणी वास्तव्याच्या कालावधीचे प्रमाण**

| विभाग | विशिष्ट ठिकाणी वास्तव्याच्या कालावधीचे प्रमाण | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | ५ वर्षापेक्षा कमी | ५ ते १० वर्षे | १० ते १५ वर्षे | १५ वर्षापेक्षा जास्त | |
| शहरी | ३४ | २७ | २४ | ४७७ | ५६२ |
| | ६.००% | ४.८०% | ४.३०% | ८४.९०% | १००.००% |
| ग्रामीण | २४ | २६ | २७ | ६३४ | ७११ |
| | ३.४०% | ३.७०% | ३.८०% | ८९.२०% | १००.००% |
| एकूण | ५८ | ५३ | ५१ | ११११ | १२७३ |
| | ४.६०% | ४.२०% | ४.००% | ८७.३०% | १००.००% |

तक्ता क्र. २० वरून असे दिसून येते की सद्यस्थितीत मांग गारुडी समाजातील कुटुंबे १५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून एका विशिष्ट ठिकाणी राहत आहेत. हे प्रमाण शहरी व ग्रामीण अशा दोन्ही विभागांमध्ये इतर कालावधी पेक्षा जास्त आहे. शहरी भागातील ८५ %कुटुंबे तर ग्रामीण भागातील जवळपास ९० %कुटुंबे हे पंधरा वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून सध्या राहत असलेल्या ठिकाणी राहत आहेत. यावरून पूर्वापार असलेले या समाजाचे भटके स्वरूप आता बहुतांशी कमी झालेले असून एका ठिकाणी राहून उदरनिर्वाह करण्याकडे या समाजाचा कल दिसून येत आहे.

## भाषा

त्यांचा धर्म हा हिंदू असून भाषा मराठी आहे (L.B.Thade n.d.) कुटुंब सर्वेक्षणात सुद्धा असे दिसले. सर्वच कुटुंबे हिंदू धर्माचा अनुनय करतात. या समाजातील कार्यकर्त्यांशी चर्चा करताना त्यांनी माहिती दिली की, मांग-गारुडी समाजाची 'पारोशी' ही मूळ भाषा आहे. शिवाय, मराठी ही त्यांची बोलीभाषा आहे. आपापसात चर्चा करताना ते पारोशी भाषेचा वापर करतात. उदा. पैशाला- खामोशे, टिपरे तर एक रुपयाला कांदा, दुधाला नाखरं म्हणतात. पाण्याला—निरोंब, बायकोला—माखीन तर नवऱ्याला मख्या, पोलिसाला—चिंगडा, दमरी-रुपये, खपळून - पळुन जा, लीपडी - कपडे असे संबोधले जाते. इतर जातींशी संबंध ठेवताना ते त्यांच्या भाषेचा वापर करताना दिसतात. उदा. या समाजातील लोक चोरी करताना मराठा किंवा पाटील यांच्या समोर स्वभाषेत

बोलतात. उदा. "दांडाल वरीवला. काही चुलबू नका." (मराठा आला आहे. काही बोलू नका.) या समाजाचे लोक 'शिबारी' भाषा बोलतात म्हणून त्यांचा उल्लेख 'मांग-गारुडी' असा न करता 'शिबारी' असा करावा अशी त्यांची मागणी आहे (सेंटर ऑफ स्टडीज इन सोशल सायन्सेस, पृ. क्र. ७). परंतु, पुणे जिल्ह्यातील अभ्यासात असे काहीच आढळून आले नाही. शिबारी आणि पारोशी ही एकच भाषा मानली जाते.

**तक्ता क्र. २१: विभागनिहाय बोलीभाषेचे प्रमाण**

| विभाग | बोलीभाषा | | एकूण |
|---|---|---|---|
| | मराठी | पारोशी/ शिबारी | |
| शहरी | ३६९ | १९३ | ५६२ |
| | ६५.७०% | ३४.३०% | १००.००% |
| ग्रामीण | २२८ | ४८३ | ७११ |
| | ३२.१०% | ६७.९०% | १००.००% |
| एकूण | ५९७ | ६७६ | १२७३ |
| | ४६.९०% | ५३.१०% | १००.००% |

उदा. तक्ता क्र . २१ नुसार असे निदर्शनास आले की, या समाजातील शहरी भागातील ६५.७० %कुटुंबांची भाषा ही मराठी असून ग्रामीण भागातील ६७.९० %कुटुंबांची भाषा ही शिबारी आहे. यावरून असे दिसते की, ग्रामीण भागात शिबारी भाषा बोलण्याचे प्रमाण अधिक आहे. रामनाथ चव्हाण यांच्या मते, त्या भाषेला मांग गारुडी "चोरभाषा" किवा "पारोशी"भाषा असे म्हणतात. ही भाषा मातंग समाजाच्या "अंबुजवाय" या सांकेतिक भाषेशी जवळची असून ती इतर समाजातील लोकांना न कळणारी असल्याने विशेषतः गुन्हेगारी प्रकरणात अडकल्यानंतर किवा इतरांना आपला व्यवहार समजू नये म्हणून हे लोक आपापसात ही भाषा बोलतात (चव्हाण २००४: ५). वस्तीपातळीवर केलेल्या गट चर्चेत तसेच दिनांक १७ मार्च २०१६ रोजी मांग गारुडी समाजाच्या लोकप्रतिनिधींशी झालेल्या चार्चेत 'पारोशी व शिबारी या दोन्ही भाषा एकच आहेत व शिबारी हा शब्द मांग गारुडी या जातीशी समानार्थी आहे. मांग गारुडी जातीलाच सांकेतिक भाषेत शिबारी असे म्हणतात.' असे मत कार्यकर्त्यांनी मांडले.

## आडनाव

या समाजातील लोकांचे वर्गीकरण पूर्वाश्रमीचे अस्पृश म्हणून करण्यात आले आहे. मांग गारुडी समाजातील लोक चौगुले समजले जातात. त्यांची लोकसंख्या ही कोल्हापूर भागात जास्त प्रमाणात आढळून येते (Singh १९९३, ९००-९०९). परंतु, थाडे समितीनुसार ही पूर्वाश्रमीची गुन्हेगारी जमात सर्वत्र महाराष्ट्रात आढळून येते. अत्रोलीकर समिती अहवाल १९४९ नुसार, मुंबईमधील नायगाव, वरळी, सेतान चौकी, कल्याणजवळील वालधुनी या ठिकाणी हा समाज रहिवासी असलेला आढळतो. रामनाथ चव्हाण यांच्यामते, या समाजाची काही प्रमुख "कुळे" असून त्यांना समाजात त्यांच्या दर्जानुसार मानपान देण्याची रीत आहे. विशेषतः धार्मिक कार्याचे किंवा देव कार्याच्या प्रसंगी आणि विवाहप्रसंगी सदर कुळांची प्रतिष्ठा राखली जाते त्यांना योग्य तो मानपान दिला जातो. मात्र तसे घडले नाही तर त्या कुळांचा अपमान झाला असे समजून त्या कुळातील लोक त्याचा जाब संबंधीतास विचारतात, किंवा त्यांच्याविषयीची तक्रार जातपंचायतीमध्ये मांडतात. या समाजातील कुळांची नावे हिच या समाजातील लोकांची "आडनावे" आहेत (चव्हाण २००४: ६). बारामतीमधील मांग गारुडी समाजाच्या लोकांनी गायकवाड, देडे, झेंडे, कसबे, खलसे, लोंढे, भाले, बोडके, उपाध्ये, राखपसरे, पाथरकर, काळे ही १२ कुळे असल्याचे सांगितले. जनगणना २०११ नुसार, मांग-गारुडी समाजाची लोकसंख्या महाराष्ट्रात सर्वत्र पसरलेली आहे. सर्वात जास्त लोकसंख्या नागपूर, पुणे आणि नाशिक जिल्ह्यात आहे. या समाजातील कार्येकर्त्यांशी चर्चा करताना असे दिसून आले की, सकट, लोंढे, कांबळे, राखपसरे, उफाडे, देडे (झेंडे), भाले, कसबे, हातागळे, फासगे, नाडे, शेंडे, गायकवाड, सोनावणे, पाथरकर, अवचर (अवचट) अल्हाट, सोनावणे, लांडगे, उपाध्ये, काळे, खलसे, बोडखे, राक्षे, भिसे, झेंडे, साने, पाटील, उमप, खंदारे, माले, चव्हाण, घोडगे, ढालवाले, अवचरे, शिंदे, थोरात इ. आडनावे प्रचलित आहेत. त्याशिवाय, पथदर्शी सर्वेक्षणातून प्राप्त झालेली आडनावे उदा. पिसणे, शिंदे, खंदारे, अल्हाट, रोकडे, चौघुले, काळे, अंकुशे, भिसे, माने, चव्हाण, मानकर, राखुंडे, सोनटक्के, जाधव, ढालवाले, इ. आढळून येतात. ह्या आडनावामध्ये कालांतराने बदल झालेला आहे. उदा. राखपसरे हे पूर्वी राखडे, राक्षे या आडनावानी ओळखले जात होते. कोल्हापूरमध्ये कसबे हे चौघुले तर सकट हे पाटील आडनावाने ओळखले जात होते. सोलापूरमध्ये उकरंडे यांना काळे संबोधले जात होते. नागपूरमध्ये राखपसरे यांना मानकर समजले जात होते. गट चर्चेमध्ये सुद्धा ह्या प्रकारची आडनावे मांग गारुडी समाजात असतात असे सांगण्यात आले.

## धर्म आणि रितीरिवाज

मांग गारुडी हे ब्राम्हणी हिंदू आहेत. ते भवानी देवीची  व हिंदू देवतांची पूजा करतात (Enthoven १९९०, ३५८). मृत्युनंतर व्यक्तीला झोळीमध्ये घेऊन जातात आणि त्याचे शव पुरले जाते. मृत्युनंतर सुतक पाळले जाते (L.B.Thade, No Date).  गर्भधारणेनंतर कोणतेही रीतीरिवाज पार पाडले जात नाहीत. मुलाच्या जन्मानंतर त्याचे मुंडन केले जाते. मुलगी वयात आल्यानंतर त्याचा उत्सव म्हणून काही विधी पार पाडले जातात. या समाजातील कार्यकर्त्यांनी माहिती सांगितल्याप्रमाणे, मांग-गारुडी समाजाचे लक्ष्मीआई ही कुलदैवता तर व्यापारीदृष्ट्या खंडोबा हे कुलदैवत आहे. वरखडची आई ही सुद्धा मांग-गारुडी समाजाची कुलदेवता  आहे. सूर्य, नदी आणि पूर्वज यांची ते पूजा करत असत. पूर्वी फक्त अक्षय्य तृतीयाच साजरी केली जात होती. आता, हिंदू धर्माप्रमाणे सर्व सण साजरे करतात. पथदर्शी सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीनुसार, हिंदू सणाबरोबरच अक्षय्यतृतीया, आषाढी, जत्रा, गाय-म्हैस पूजन इ. सण साजरे केले जातात. तसेच, ओटी भरण, डोहाळे जेवण, बारसे इ. कार्यक्रमही केले जातात. समाजाच्या देव-देवतांमध्ये खंडोबा, मरीआई, काळूआई, लक्ष्मीआई, महालक्ष्मीआई, सप्तश्रृंगी माता, फिरस्तीआई, वर्खेडाचीआई, मांगू म्हसोबा, तुळजाभवानीआई, मानकेश्वरी आई, मांगीरबाबा इ. चा समावेश आहे. त्याचबरोबर, कुटुंबाचे कुलदैवत म्हणून म्हसोबा, महालक्ष्मी, खंडोबा, मरीआई, काळूआई, तुळजापूरची लक्ष्मीआई, खंडोबा, मरीआई, काळूआई, महालक्ष्मीआई, फिरस्तीआई, वर्खेडाचीआई, नरसोबा, येडूआई, नवदुर्गा, यलाम्मा इ. समावेश आहे. समाजाच्या देवता आणि कुटुंबाच्या कुलदैवतांमध्ये विशेष फरक दिसून येत नाही. या बाबींना पुणे जिल्ह्यात घेण्यात आलेल्या काही गट चर्चेमध्ये सुद्धा दुजोरा मिळाला.



*चंदवाडी वस्तीमधील देवपूजा करणारी महिला*

रामनाथ चव्हाण यांच्यामते, या समाजातील कुळांचे “खंडोबा” हे कुलदैवत असून या कुळांची कुटुंबे खंडोबाची पूजा करतात. इच्छापूर्तीसाठी खंडोबाला नवस बोलतात. दरवर्षी येणाऱ्या “सोमवती अमावास्यला” जेजुरी गावात खंडोबाच्या यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होतात. देवाच्या नावाने भंडारा किवा खोबरे उधळतात; आपल्या मुला-मुलीच्या विवाहानंतर खंडोबाच्या नावाने जागरण-गोंधळ घालतात.या कुळातील काही स्त्रिया किवा पुरुषांच्या  अंगात येते

असे सांगतात व खंडोबाला मुले व मुली सोडण्याची प्रथा या समाजात आहे त्याचबरोबर त्यांचा ‘आखीती’ हा सण ते मोठ्या उत्साहाने साजरा करतात. किंबहुना ‘आखीती’ (म्हणजेच अक्षयतृतीया) हा मांग गारुड्याचा सर्वात मोठा सण मानला जातो (चव्हाण २००४: ६-१४). शिरूरमधील गटचर्चेत अहमदनगर जिल्ह्यातील वरखेडची आई बहुसंख्य मांग गारुडी समाजाची कुलदैवत आहे व या देवीची जत्रादेखील भरवली जाते. तर बारामतीमध्ये जत्रेत देवीला गरोदर असलेली मेंढी बळी दिली जाते, अशी माहिती मिळाली.

**तक्ता क्र. २२: विभागनिहाय कुलदैवताचे प्रमाण**

| विभाग | कुलदैवत | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | खंडोबा | लक्ष्मी आई | मरीआई | तुळजा भवानी आई | वरखेडची आई | इतर देवी देवता | |
| शहरी | १५७ | १४८ | ४० | ३० | ४३ | १४४ | ५६२ |
| | २७.९०% | २६.३०% | ७.१०% | ५.३०% | ७.७०% | २५.६०% | १००.००% |
| ग्रामीण | २११ | १९४ | १६ | ४५ | १६९ | ७६ | ७११ |
| | २९.७०% | २७.३०% | २.३०% | ६.३०% | २३.८०% | १०.७०% | १००.००% |
| एकूण | ३६८ | ३४२ | ५६ | ७५ | २१२ | २२० | १२७३ |
| | २८.९०% | २६.९०% | ४.४०% | ५.९०% | १६.७०% | १७.३०% | १००.००% |



*मांग गारुडी कुटुंबातील कुलदैवत, लोणी काळभोर वस्ती*

मांग गारुडी समाजात धार्मिक विधी, देव देवतांची पूजा करण्याचे प्रमाण दिसून येते. तक्ता क्र. २२ नुसार पुणे जिल्ह्यातील जवळपास २९% मांग गारुडी कुटुंबांचे कुलदैवत हे जेजुरी येथील खंडोबा आहे. २७% कुटुंबांचे कुलदैवत कोल्हापूरची महालक्ष्मी आई तर १७% कुटुंबांची कुलदैवत अहमद नगर जिल्ह्यातील वरखेड गावातील देवी आहे. तसेच मरी आई, तुळजा भवानी आई व इतर देवी देवतांची कुलदैवत म्हणून पूजा केली जाते. ग्रामीण व शहरी भागात कुटुंबांच्या कुलदेवतांमध्ये फारसा फरक दिसून येत नाही. ग्रामीण भागात वरखेडची देवी या कुलदेवीला

मुख्यत्वे (२३.८०%) पूजले जाते. या कुलदैवतांची नियमित पूजाअर्चा करणे, जत्रा भरविणे, नवस बोलणे, मांसाहाराचा नवैद्य दाखविणे, या देवता अंगात येणे अशा प्रकारच्या परंपरा या समजतात दिसून येतात.

**तक्ता क्र. २३: विभागनिहाय बाळ जन्मल्यानंतरचे विधी (पाचवी व बारावी)**

| विभाग | जन्मल्यानंतरचे विधी | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ७ | ५५५ | ५६२ |
| | १.२०% | ९८.८०% | १००.००% |
| ग्रामीण | ९ | ७०२ | ७११ |
| | १.३०% | ९८.७०% | १००.००% |
| एकूण | १६ | १२५७ | १२७३ |
| | १.३०% | ९८.७०% | १००.००% |

तक्ता क्र . २३ नुसार असे निदर्शनास येते की ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागांमध्ये बाळ जन्मल्यानंतर पाचवी, बारावी हे विधी मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. अशा विधी करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण शहरी आणि ग्रामीण भागात सारखेच (९९%) दिसून येते. यावरून पूर्वापार चालत आलेले रिती-रिवाज आजही या समाजामध्ये पाळले जातात, असे दिसून येते. पाचवीला बकरीचे पाट किंवा कोकरू बळी दिला जातो. तसेच न्हाणीची पूजा केली जाते. पाच मुलींना सवाशीण म्हणून जेवू घातले जाते. काही कुटुंब तिनवी म्हणजे बाळाच्या जन्मानंतर तिसरा दिवसदेखील साजरा करता. जन्मानंतरच्या विधी मध्ये सटवाई देवीची पूजा केली जाते. बाराव्या दिवशी बकरीची पाय-मुंडी आणून बाळंतीणीला खायला देतात. सध्याच्या काळात बारसे करण्याची पद्धत रूढ झाली आहे. परंतु पूर्वी बाळाचा जन्म रानात, गावाबाहेर, अथवा जेथे वास्त्यव्याला जागा मिळेल तेथे होत असे. अशा वेळी बारसे, वाढदिवस वगैरे समारंभ होत नसत. तसेच अशिक्षितपणामुळे जन्म तारीख देखील आई वडील लक्षात ठेवत नसत.. असे बारामती येथील चर्चेत सुगंधाबाई देडे या मांग गारुडी समाजातील महिलेने सांगितले. बाळाला केस आल्यावर साधारणपणे एक वर्षाने जावळाचा कार्यक्रम केला जातो. यावेळी देखील बकरी बळी देऊन त्याचे तिखट जेवण सर्वांना खायला दिले जाते.

**तक्ता क्र. २४: विभागनिहाय बाळाच्या जन्माआधीच्या विधी**

| विभाग | बाळाच्या जन्माआधी काही विधी विधी करण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | २८९ | २७३ | ५६२ |
| | ५१.४०% | ४८.६०% | १००.००% |
| ग्रामीण | ४३९ | २७२ | ७११ |
| | ६१.७०% | ३८.३०% | १००.००% |
| एकूण | ७२८ | ५४५ | १२७३ |
| | ५७.२०% | ४२.८०% | १००.००% |

तक्ता क्र . २४ नुसार  मांग गारुडी समाजात बाळाच्या जन्मानंतर आणि जन्मापूर्वी महत्वाचे विधी केले जातात. ग्रामीण आणि शहरी भागातील कुटुंबामध्ये बाळाच्या जन्मानंतर केले जाणाऱ्या विधीच्या प्रमाणात फरक दिसून येत नाही. पण, जन्मानंतर केल्या जाणाऱ्या विधीमध्ये ग्रामीण भागात ३८.३०% तर शहरी भागात ४८.६०% कुटुंबांचे प्रमाण आहे. शहरीकरणामुळे हे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा किंचितसे जास्त दिसते.

**तक्ता क्र. २५: विभागनिहाय अंत्य संस्काराचा प्रकार व त्याचे प्रमाण**

| विभाग | अंत्य संस्काराचा प्रकार | | एकूण |
|---|---|---|---|
| | पुरणे | जाळणे | |
| शहरी | ४३ | ५१९ | ५६२ |
| | ७.७०% | ९२.३०% | १००.००% |
| ग्रामीण | ० | ७११ | ७११ |
| | ०.००% | १००.००% | १००.००% |
| एकूण | ४३ | १२३० | १२७३ |
| | ३.४०% | ९६.६०% | १००.००% |

मांग गारुडी समाजात ग्रामीण भागातील सर्वच कुटुंबामध्ये मृत व्यक्तीचा अंत्य विधी हा दहन पद्धतीने केला जातो.  शिवाय, व्यक्तीच्या  मृत्यू नंतर सातव्या दिवशी दशक्रिया विधी केला जातो.  पूर्वी  मांग गारोडी समाजात रूढ असलेली मृत व्यक्तीला पुरण्याची पद्धत आणि मृताला झोळीमध्ये घेऊन जाण्याची पद्धत आता नाहीशी होत असताना दिसत आहे. दफन विधीसाठी जमिनीची गरज असते, जमिनीचा अभाव या समाजाकडे

असल्याचे दिसून आले आहे. शिवाय इतर समाजात दहन करण्याची पद्धत असल्याने त्याचे अनुकरण या समाजाकडूनही होत आहे. या कारणांमुळे दहन विधी केला जातो.

**तक्ता क्र. २६: विभागनिहाय दशक्रिया विधीचा दिवस व त्याचे प्रमाण**

| विभाग | दशक्रिया विधीचा दिवस | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | सातव्या | दहाव्या | तेराव्या | |
| शहरी | ५३७ | १९ | ६ | ५६२ |
| | ९५.६०% | ३.४०% | १.१०% | १००.००% |
| ग्रामीण | ६८५ | २६ | ० | ७११ |
| | ९६.३०% | ३.७०% | ०.००% | १००.००% |
| एकूण | १२२२ | ४५ | ६ | १२७३ |
| | ९६.००% | ३.५०% | ०.५०% | १००.००% |

तक्ता क्र . २६ वरून स्पष्ट होते कि मांग गारोडी समाजात व्यक्ती मृत झाल्यावर दशक्रिया विधी सातव्या दिवशी केला जातो. शहरी व ग्रामीण या दोन्ही भागात हे प्रमाण जवळपास सारखे म्हणजे ९५.६० % व ९६.३० % असे दिसून येते. या उलट शहरी आणि ग्रामीण भागात दहावा आणि तेरावा या विधीला महत्व देण्याचे प्रमाण कमी दिसून येते. पूर्वापार असलेल्या भटक्या स्वरूपामुळे एका गावात फार काळ राहण्याची परवानगी नसल्याने दशक्रिया विधी देखील कमी कालावधीत केला जाण्याची पद्धत या समाजात असल्याचे कारण गट चर्चेत सांगण्यात आले. पूर्वी ज्या दिवशी व्यक्तीची मयत झाली त्या दिवशी मद्यपान करून भजनी मंडळी भजन म्हणायचे. तसेच अजूनही मृत शरीराला खांदा देणारे ४ खांदेकरी व एक पाणी देणारा यांना तेल लावून खांदा उतरविण्याची पद्धत आहे. चूल बंद ठेवायची. सूतक म्हणून सातव्या दिवशी मटन खाऊन सूतक सोडायचे अशी प्रथा असल्याचे बारामती येथील गट चर्चे दरम्यान या समाजातील लोकांनी सांगितले.

मांग-गारुडी समाज हा प्रामुख्याने मांसाहारी आहे. ज्वारी आणि इतर कडधान्य हे सुद्धा त्यांच्या आहारात समाविष्ट असते. या समाजातील काही लोक मद्यपानही करतात (Singh १९९३, ९०९). मांग-गारुडी समाज इतर कोणत्याही समाजास त्यांची दफनभूमी वापरण्याची परवानगी देत नाही. परंतु, पाण्याची साधने सर्व समाजाबरोबर वापरतात. मांग जात ही मांग-गारुडी समाजासोबत विवाहसंबंध जुळवत नाहीत किंवा

त्यांच्याकडून अन्न-पाणी सुद्धा घेत नाहीत. या समाजातील लोकांच्या घरांची स्थिती अतिशय वाईट असते. ते कुडाच्या घरात राहतात. ते आपला पारंपारिक व्यवसाय करत भटके जीवन जगत असतात (L.B.Thade एन. डी.). परंतु, अलीकडे या समाजातील बहुतांशी कुटुंबे स्थायिक झालेली आहेत. फक्त मुलांनाच औपचारिक शिक्षण दिले जात होते. त्यांची सुद्धा माध्यमिक शिक्षणानंतर गळती होत होती. मुलीचे शिक्षण प्राथमिक शाळेपर्यंतच होत होते (Singh १९९३, ९०२-९१०). या समाजातील कार्यकर्ते माहिती सांगतात की, फक्त मांसाहार हाच लोकांचा आहार आहे. त्यात रेडा, ससे, घोरपड, गायी-म्हशी इ. चा समावेश असतो. त्यामुळे इतर समाज या लोकांना जवळच घेत नव्हते. शिवाय, गावकुसाबाहेरील अस्पृश्य सुद्धा यांना जवळ करत नव्हते. मांग-महार पाणी दुरून वाढून देत असत. छत्रपती शाहू महाराजांनी १७ फेब्रुवारी १९१८ रोजी या समाजातील लोकांची हजेरी बंद केली. समाजातील कार्यकर्ते सांगतात कि, छत्रपती शाहु महाराज यांनी या समाजाची भटकंतीची स्थिती पाहून त्यांना कोल्हापूर संस्थानात स्थायिक होण्यासाठी कोल्हापूर शहराच्या सीमेलगत त्यांना जमीन दिली. मुळात, या समाजातील शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. त्यांपैकी मुलींचे शिक्षणाचे प्रमाण अजूनच कमी आहे. तीन लाकडाची पाल टाकून गावकुसाबाहेर माळावर मुक्काम केला जातो. नोकरीमध्येही या समाजाचे अत्यल्प प्रमाण आहे. "म्हैस भादरणे" हेच या जातीचे प्रमुख वैशिट्ये मानले जाते. नाशिक येथील कार्यशाळेत एका प्रतिनिधीने मत व्यक्त केले की, "आम्ही शिक्षणात मागे आहोत. आम्हाला शिक्षणाची संधी व योग्य मार्गदर्शन मिळाले तर आम्ही नक्कीच पुढे जाऊ. आमचे पूर्वापार भटके स्वरूप आहे. आमचे पूर्वज कुठे स्थायिक झाले नाही. तर आम्ही १९५० च्या आधीचा रहिवाशी पुरावा कसा देणार? आमचे वडील-दादा शाळेत गेले नाही मग कागदपत्र कोठून आणणार? सरकारी योजनांचा आम्ही लाभ कसा घेणार? जर आमच्याकडे आमची जात सिद्ध करण्यासाठीचे पुरावेच नाहीत?" समाजातील कार्येकर्ते माहिती सांगतात की, बांबूला झोळी बांधून फक्त तीनच लोक प्रेताला अंत्यविधीसाठी घेऊन जात होते. तिसऱ्या दिवशीच सावडणे आणि दशक्रियाविधी एकत्रच केले जात होते. कारण, तीनच दिवस गावात राहण्याची परवानगी पाटील देत होते. त्या तिसऱ्या दिवशी रेड्याचे जेवण देण्याची प्रथा होती. आता, सातव्या दिवशी दशक्रिया विधी केला जातो.

**तक्ता क्र. २७: विभागनिहाय मांसाहाराचे प्रमाण**

| विभाग | मांसाहार करणे | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ११ | ५५१ | ५६२ |
| | २.००% | ९८.००% | १००.००% |
| ग्रामीण | १६ | ६९५ | ७११ |
| | २.३०% | ९७.७०% | १००.००% |
| एकूण | २७ | १२४६ | १२७३ |
| | २.१०% | ९७.९०% | १००.००% |

या समाजाच्या जाती वैशिष्ट्याप्रमाणे आजही या समाजातील लोकांमध्ये मांसाहार करण्याचे प्रमाण दिसून येते. तक्ता क्र. २७ नुसार ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात हे प्रमाण साधारणपणे सारखेच (९८%) आहे. या समाजाची हलाखीची आर्थिक परिस्थिती असल्याने मिळेल ते अन्न खाऊन पोट भरण्यासाठी मांसाहार केला जात असे. “आमचा भटका समाज असल्याने मिळेन ते खाणे आणि त्यातही गाय म्हशींचे मांस मोठ्या प्रमाणात खाणे हे आमच्या समाजाचे वैशिष्ट्ये आहे.” असे दादू सकट या कार्यकर्त्याने माळवाडी येथे झालेल्या गटचर्चेत सांगितले. तर बारामती येथे झालेल्या चर्चेत पूर्वी मेलेल्या जनावरांचे म्हणजे मेलेल्या कोंबड्या व शेळ्यांचे मांस खाऊन पोट भरत होतो, पोल्ट्री फार्ममध्ये मेलेल्या रोगट कोंबड्या खाऊन आम्ही पूर्वी पोटं भरली आहेत असे या समाजातील लोकांनी सांगितले. त्याचप्रमाणे फुरसुंगी येथील मांग गारुडी वस्तीतील लोकांनी सांगितले की पूर्वी गावात कोणाच्या घरी जनावर मेले की ते आमच्यासमोर आणून टाकत मग आम्ही ते मेलेले जनावर आपापसात वाटून खात असे. पूर्वी शिकारद्वारे देखील जनावरे खाल्ली जायची. यात घोरपड, हरण, लावर अशा प्राण्यांचा समावेश होता. पण आता शिकारीस बंदी असल्याने कोणी शिकार करीत नाही. धर्मिक कार्ये, सण समारंभ, विवाह, दुःखद कार्ये अशा अनेक प्रसंगी मांसाहार केला जातो.

**तक्ता क्र. २८: विभागनिहाय चिकन खाण्याचे प्रमाण**

| विभाग | चिकन खाण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | हो | |
| शहरी | ३४ | ५२८ | ५६२ |
| | ६.००% | ९४.००% | १००.००% |
| ग्रामीण | ४१ | ६७० | ७११ |
| | ५.८०% | ९४.२०% | १००.००% |
| एकूण | ७५ | ११९८ | १२७३ |
| | ५.९०% | ९४.१०% | १००.००% |

तक्ता क्र. २८ नुसार मांसाहारात कोंबडीचे मांस म्हणजेच चिकन खाणाऱ्या मांग गारुडी कुटुंबांचे प्रमाण दिसून येते. यामध्ये ग्रामीण व शहरी या दोन्ही विभागामधील कुटुंबांमध्ये जवळपास सारख्याच प्रमाणात चिकन आहारात घेतले जाते. ९४.१०% मांग गारुडी कुटुंबे आपण चिकन खात असल्याचे सांगतात. मांसाहारातील इतर प्राण्याचे मांस तुलनेने जास्त महाग मिळते. ते वारंवार खरेदी करण्यास परवडत नाही व कोंबडी कमी किमतीमध्ये खरेदी करता येते. त्यामुळे अलीकडील काळात, हा मांसाहार मोठ्या प्रमाणात करत असल्याचे या कुटुंबाने सांगितले.

**तक्ता क्र. २९: विभागनिहाय गायी-म्हशीचे मांस खाण्याचे प्रमाण**

| विभाग | गायी-म्हशीचे मांस खाणे | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | २१४ | ३४८ | ५६२ |
| | ३८.१०% | ६१.९०% | १००.००% |
| ग्रामीण | १९१ | ५२० | ७११ |
| | २६.९०% | ७३.१०% | १००.००% |
| एकूण | ४०५ | ८६८ | १२७३ |
| | ३१.८०% | ६८.२०% | १००.००% |

तक्ता क्र. २९ मध्ये गायी-म्हशींचे मांस म्हणजेच बीफ खाणाऱ्या कुटुंबाचे एकूण प्रमाण ६८.२०% दिसून येते. शहरी भागातील ६१.९०% तर ग्रामीण भागातील ७३.१०% कुटुंबे बीफ खातात. हे प्रमाण शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात अधिक प्रमाणात दिसून येत आहे.

**तक्ता क्र. ३०: विभागनिहाय डुकराचे मांस खाण्याचे प्रमाण**

| विभाग | डुकराचे मांस खाण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ५३४ | २८ | ५६२ |
| | ९५.००% | ५.००% | १००.००% |
| ग्रामीण | ७०६ | ५ | ७११ |
| | ९९.३०% | ०.७०% | १००.००% |
| एकूण | १२४० | ३३ | १२७३ |
| | ९७.४०% | २.६०% | १००.००% |

मांग गारुडी समाजात जरी मोठ्या प्रमाणात मांसाहार केला जात असला तरी पोर्क म्हणजे डुकराचे मांस खाणे निषिद्ध समजले जाते. तक्ता क्र.३० नुसार ९७.४०% मांग गारुडी कुटुंबे आपण डुक्कर खात नाही असे सांगतात. तर केवळ २.६०% कुटुंबांनी आम्ही मिळेल ते अन्न खाऊन पोट भरतो मग यात डुक्कराचे देखील मांस खाल्ले जाते असे मत मांडले.

**तक्ता क्र. ३१: विभागनिहाय इतर प्रकारचे मांसाहार करण्याचे प्रमाण**

| विभाग | इतर प्रकारचे मांसाहार | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ४१० | १५२ | ५६२ |
| | ७३.००% | २७.००% | १००.००% |
| ग्रामीण | ५३२ | १७९ | ७११ |
| | ७४.८०% | २५.२०% | १००.००% |
| एकूण | ९४२ | ३३१ | १२७३ |
| | ७४.००% | २६.००% | १००.००% |

तक्ता क्र.३१ नुसार २६% मांग गारुडी कुटुंबे कोंबडी, बीफ, पोर्क इत्यादी सोडून इतर प्रकारचा मांसाहार करतात. यात बकरी, शेळी, ससा, घोरपड, मासे यांचा समावेश आहे. पूर्वी रानात शिकार करून घोरपड, ससा असे प्राणी पकडले जात असत. पण आता शिकार करण्यास बंदी असल्यामुळे इतर प्राणी खाण्याचे प्रमाण कमी झाले आहे असे मत कुंजीरवाडी येथे एका मांग गारुडी गृहस्थाने मांडले. एकूण ७४% कुटुंबांनी इतर प्रकारचा मांसाहार करीत नसल्याचे सांगितले.

**तक्ता क्र. ३२: विभागनिहाय जोगवा/परडीची प्रथा व त्याचे प्रमाण**

| विभाग | जोगवा/परडीची प्रथा | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ४२० | १४२ | ५६२ |
| | ७४.७०% | २५.३०% | १००.००% |
| ग्रामीण | ४९० | २२१ | ७११ |
| | ६८.९०% | ३१.१०% | १००.००% |
| एकूण | ९१० | ३६३ | १२७३ |
| | ७१.५०% | २८.५०% | १००.००% |

तक्ता क्र. ३२ नुसार असे दिसते की, ग्रामीण भागातील कुटुंबामध्ये सुमारे ३१.१० %कुटुंबात जोगवा मागण्याची आणि परडी मिरविण्याची प्रथा आहे. तेच प्रमाण शहरी भागासाठी सुमारे २५.३० %आहे. ग्रामीण भागात नवरात्रीच्या उत्सवात महिला परडी मागण्यासाठी घरोघरी जातात. परडीत मिळालेले पीठ, तेल , धान्य उदरनिर्वाहासाठी वापरतो अशी लोहगाव व चंदवाडी येथील लोकांनी क्षेत्र भेट व गटचर्चा दरम्यान दिली. मांजरी व बारामती येथे पूर्वापार परडी मागून पोट भरणारे पुरुष दिसले. बारामती मधील जवळपास सर्वच कुटुंबे नवरात्रीत परडी मागतात.

**तक्ता क्र ३३: विभागनिहाय बाबा-बुआ यांना मानण्याचे प्रमाण**

| विभाग | बाबा बुआ यांना मानणे | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | २९७ | २६५ | ५६२ |
| | ५२.८०% | ४७.२०% | १००.००% |
| ग्रामीण | २४१ | ४७० | ७११ |
| | ३३.९०% | ६६.१०% | १००.००% |
| एकूण | ५३८ | ७३५ | १२७३ |
| | ४२.३०% | ५७.७०% | १००.००% |

तक्ता क्र. ३३ नुसार बाबा-बुआ यांना मानतो असे म्हणणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण दिसत आहे. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात बाबा-बुआला मानण्याचे प्रमाण जास्त आहे. शहरी भागात ४७.२०% कुटुंबे

तर ग्रामीण भागात ६६.१०% कुटुंबे अशा प्रकारच्या अंधःश्रद्धा पाळताना दिसतात. एकंदरीत अशा श्रद्धा ठेवणाऱ्या मांग गारुडी कुटुंबाची संख्या ही निम्म्यापेक्षा जास्त म्हणजे ५७.७०% आहे.

**तक्ता क्र:.३४: विभागनिहाय धार्मिकविधी पूर्ण करण्यासाठी प्राण्यांचा बळी देण्याचे प्रमाण**

| विभाग | धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी प्राण्यांचा बळी देण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ८४ | ४७८ | ५६२ |
| | १४.९०% | ८५.१०% | १००.००% |
| ग्रामीण | ५० | ६६१ | ७११ |
| | ७.००% | ९३.००% | १००.००% |
| एकूण | १३४ | ११३९ | १२७३ |
| | १०.५०% | ८९.५०% | १००.००% |

तक्ता क्र. ३४ नुसार धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी कोंबडा, बकरा आणि इतर पशु बळी देण्याची प्रथा ग्रामीण भागात ९३ %कुटुंबात असून शहरी भागात ८५.१० %कुटुंबात हे प्रमाण आहे. देव देवतांना पशु बळी देऊन ते मांस प्रसाद म्हणून सेवन करण्याची पद्धत मांसाहारास प्रोत्साहन देताना दिसते. सणसमारंभ असो अथवा अंत्य विधी असो  मांसाहार प्रामुख्याने केला जातो आणि बळी म्हणून टोणगा (रेडा) मारला जातो. वरखेडची देवी, कोल्हापूरची लक्ष्मी देवी, वणीची देवी या सर्व देवतांना बळी म्हणून टोणगा मारण्याची पद्धत असल्याचे माळवाडी येथे झालेल्या चर्चेत समोर आले. दसरा व अक्षय तृतीया या मांग गारोडी समाजाच्या प्रमुख समजल्या जाणाऱ्या सणांना देखील टोणगा बळी म्हणून मारला जातो. फुरसुंगी येथील चंडवाडी या मांग गारुडी समाजाच्या वस्तीतील लोकांनी सांगितले की आमच्या समाजात मोठ्या प्रमाणात नवस बोलले जातात. व ते पूर्ण करण्यासाठी प्राण्यांचा बळी देण्याची पध्दत आहे.

**तक्ता क्र: ३५: विभागनिहाय जादूटोणाचे प्रमाण**

| विभाग | जादूटोणाचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ४९१ | ७१ | ५६२ |
| | ८७.४०% | १२.६०% | १००.००% |
| ग्रामीण | ५१८ | १९३ | ७११ |
| | ७२.९०% | २७.१०% | १००.००% |
| एकूण | १००९ | २६४ | १२७३ |
| | ७९.३०% | २०.७०% | १००.००% |

तक्ता क्र. ३५ नुसार ग्रामीण भागात २७.१० %कुटुंबांना कोणीतरी त्यांच्यावर जादूटोणा केला आहे असे वाटते तर तेच प्रमाण शहरी भागासाठी १२.६० %आहे.

**तक्ता क्र:. ३६: विभागनिहाय कुटुंबातील सदस्यांच्या अंगात येण्याचे प्रमाण**

| विभाग | अंगात येण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ३७८ | १८४ | ५६२ |
| | ६७.३०% | ३२.७०% | १००.००% |
| ग्रामीण | ४३६ | २७५ | ७११ |
| | ६१.३०% | ३८.७०% | १००.००% |
| एकूण | ८१४ | ४५९ | १२७३ |
| | ६३.९०% | ३६.१०% | १००.००% |

तक्ता क्र. ३६ नुसार ग्रामीण भागात घरातील सदस्यांच्या अंगात येण्याचे ग्रामीण भागात ३८.७० % प्रमाण आहे तर शहरी भागात ३२.७० % प्रमाण आहे. काळूबाई, लक्ष्मीआई या देवी अंगात येतात. त्याला देवाचे वारे आले असे म्हणतात. अंगात आलेल्या व्यक्तीला इतर लोक त्यांच्या समस्या सांगतात. मग झाडाला म्हणजेच बाधित/ समस्याग्रस्त व्यक्तीला काही करायला उदा. नवस करणे, बळी देणे, उपास करणे असे अंगात आलेली व्यक्ती सांगते. तिखटाचा म्हणजे मांसाहाराचा नेवैद्य दाखवून व हळदी कुंकू लावून अंगात आलेल्या देवीला शांत केले जाते असे चंदवाडी येथील लोकांनी सांगितले.

**तक्ता क्र. ३७: विभागनिहाय पोतराज प्रथेचे प्रमाण**

| विभाग | पोतराज प्रथेचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ५१२ | ५० | ५६२ |
| | ९१.१०% | ८.९०% | १००.००% |
| ग्रामीण | ६६७ | ४४ | ७११ |
| | ९३.८०% | ६.२०% | १००.००% |
| एकूण | ११७९ | ९४ | १२७३ |
| | ९२.६०% | ७.४०% | १००.००% |

तक्ता क्र. ३७ नुसार या समाजात शहरी भागात कुटुंबामध्ये पोतराज असण्याचे प्रमाण ८.९० %तर हेच प्रमाण ग्रामीण भागासाठी ६.२० %आहे. लोणी काळभोर येथील गट चर्चेत सांगितले की, पोतराज ही प्रथा या समाजात आहे. अशाप्रकारे नवस करणे ,पूजा अर्चा करणे ,अंगात येणे या प्रथा सर्रास आहेत. ज्या लोकांना मुलगा होत नाही ते नवस करतात. त्यात मूलगा झाला की देवीला सोडेल मग हा मुलगा पोतराज होतो व देवीच्या नावाने भिक्षा मागतो तो जन्मापासून केस कापत नाही. पूर्वी मुलीसुद्धा देवीला सोडत. त्यांना देवदासी म्हणत. याच वस्तीत राहणाऱ्या एका बाईला देवाला सोडले आहे. आज तिचे वय ४५ आहे.

**तक्ता क्र. ३८: विभागनिहाय सूर्य ग्रहण /चंद्र ग्रहण मागण्याचे प्रमाण**

| विभाग | सूर्य ग्रहण /चंद्र ग्रहण मागण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ४७६ | ८६ | ५६२ |
| | ८४.७०% | १५.३०% | १००.००% |
| ग्रामीण | ३५९ | ३५२ | ७११ |
| | ५०.५०% | ४९.५०% | १००.००% |
| एकूण | ८३५ | ४३८ | १२७३ |
| | ६५.६०% | ३४.४०% | १००.००% |

जातीव्यवस्थेमध्ये पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातींना चंद्र आणि सूर्य ग्रहण मागणे बंधनकारक आहे असे मानले जात असे. "दे दान, सुटे गिर्हान" असे ग्रहण मागताना बोलले जात असे. दान देणाऱ्यावर संकट येणार

नाही अशा भीतीने भीक दिली जात असे. अशा अंधश्रधा आजही समाजात दिसून येतात. उदा. तक्ता क्र. ३८ नुसार, ग्रामीण भागात सूर्य व चंद्र ग्रहण मागण्याचे प्रमाण ४९.५० %तर हेच प्रमाण शहरी भागासाठी १५.३० %आहे.

## पेहराव

मांग-गारुड समाजातील पुरुष भारदस्त देहाचे असल्याने कच्छा, चड्डी आणि खांद्यावर उपरणे असा पेहराव असायचा. समाजातील वस्ती प्रमुख किंवा नाईक हे लाल रंगाची शाल किंवा लाल रंगाचा पेहराव केल्याने ओळखता येत असत. या समाजातील महिला तेलगु पद्धतीने गुडघ्याच्यावर साडी परिधान करत. या समाजाची जात पंचायत जाती अंतर्गत कलह किंवा तंटा निवारण करतात. ते समाजातील देवी-देवतांची पूजा करत (Russell R.V. and Hiralal १९९३, १९०). या समाजातील कार्यकर्ते सांगतात की, बाई गुडघ्याच्या वर नऊवारी साडी व चोळी नेसते. पुरुष धोतर, बंडी आणि डोक्याला मुंडास (फेटा सदृश्य कापड) व खांद्यावर घोंगडी असा पेहराव असतो. पथदर्शी सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीनुसार, पारंपारिक पोशाखात पुरुष धोतर, कमीज, फेटा, बंडी, पायजमा, सदरा, टोपी, पटका, पंचा, हाफ चड्डी, घोंगडी, व काठी इ. पेहराव करत असत. पण, आधुनिक काळात, पँट व शर्ट असा पेहराव करतात. या समाजातील स्त्रिया पारंपारिक पोशाखात नववारी साडी व चोळी असा पेहराव करत असत. त्या सुद्धा आधुनिक पोशाखाकडे वळल्या आहेत.



*पुरुषांचा पेहराव*




*स्त्रियांचा पेहराव*

## विवाह पद्धती

मांग-गारुडी समाजात घटस्फोट आणि विधवा विवाहांना परवानगी आहे. वधूच्या घरी साध्या पद्धतीने लग्नविधी पार पाडला जातो. पुनर्विवाहांतर्गत लग्नविधी ह्या मुलाच्या घरी पार पडल्या जातात. वधूला दिला जाणारा हुंडा हा शंभर रुपयांपेक्षा जास्त नसतो. घटस्फोट घेण्यास परवानगी असली तरीही महिलांना पोटगीचा दावा करता येत नाही. बालविवाहास पूर्वीच्या काळी संमती होती, पण अलीकडे मुला-मुलींचे विवाह १५ ते २० वर्षे वयामध्ये केले जातात (Singh १९९३, ९०९). बहुपत्नी पद्धतीला सुद्धा मांग-गारुडी समाजामध्ये मान्यता आहे. ब्राह्मण पुरोहिताकडून लग्नविधी संपन्न केला जातो. (Enthoven १९९०, ३५८).

या समाजातील कार्यकर्त्यांनी माहिती सांगितल्याप्रमाणे, हुंडा देणे-घेणे ही प्रथा या समाजात प्रचलित नाही. मुलीच्या वडिलांना साठ रुपये 'देज' देऊन मुलीचे लग्न हिंदू धर्माप्रमाणे करून घेतात. नवऱ्यामुलास लग्नाचा खर्च करावा लागतो. दारू द्यावी लागते. समान आडनावात लग्न केले जात नाही. ब्राह्मण दुरूनच मंगलअष्टके पुटपुटत असत. ज्यावेळी ब्राह्मण उपस्थित नसतील अशावेळी मांग-गारुडी जातीतीलच प्रमुख विवाह लावतो. सुपारी, साखरपुडा, हळद, लग्न, पाच दिवसांनी नवरी माहेरी, तेलाचे जेवण ते गुळाचे जेवण देणे इ. विधी पार पाडले जातात. नातलग तसेच जवळच्या महिलांना बांगड्या भरणे, देवक पूजने, लग्नानंतर वधु वराने कुलदैवताचे दर्शन घेण्यास जाणे अशा विधी केल्या जातात. नाशिक येथील कार्यशाळेत एका प्रतिनिधीने मत व्यक्त केले की, "आमच्या जात पंचायतीमध्ये पुनर्विवाह होतो. 'सारख्याला बारखा' ही आमच्याकडे पद्धत आहे. आम्ही लग्नामध्ये बायकोला 'हुंडा' देतो. हे आमच्या जातीचे वैशिष्ट्य आहे. व आम्हाला त्याचा आभिमान वाटतो." पथदर्शी सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीनुसार, हिंदू धर्मानुसार मांग-गारुडी समाजात लग्न लावण्याची पद्धती आहे. जात पंचायत समोर लग्न ठरवले जाते. ते आवश्यक मानले जाते. नवऱ्या मुलाने नवरीला हुंडा देण्याची पद्धत या समाजात प्रचलित आहे. शक्यतो मुलीकडे लग्नाचा कमी खर्च यावा हे पाहिले जाते. लग्नाअगोदर शाकाहारी आणि लग्नानंतर मांसाहारी जेवण देण्याची पद्धत या समाजात रूढ आहे. मांसाहारी जेवणात बकरे बळी देण्याची प्रथा आहे.

मांग-गारुडी समाजात विधवा विवाहास मान्यता आहे. विधवा विना अपत्य असेल किंवा तरुण असेल तर जातपंचायतीच्या परवानगीने अशा विधवेच्या विवाहास पूर्वी मान्याता दिली जात असे. मात्र अशा

पुनर्विवाहास 'विवाह' न म्हणता' मोहतुर' असे म्हटले जात असे. मोहतुरचा हा विधी प्रथम विवाहाच्या विधीपेक्षा खूपच वेगळा असे. तो दिवसा न करता रात्रीच्या वेळी केला जातो. विधवा विवाहाला मान्यता असली तरी विधवेला समाजात मानाचे स्थान दिले जात नाही (चव्हाण२००४: १९-२०). पण, अलीकडे, विधवा पुनर्विवाहाचे प्रमाण कमी दिसते. पहा तक्ता क्र. ४९.

**तक्ता क्र. ३९: विभागनिहाय आंतरजातीय विवाहाचे प्रमाण**

| विभाग | आंतरजातीय विवाहाचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ५०० | ६२ | ५६२ |
| | ८९.००% | ११.००% | १००.००% |
| ग्रामीण | ६७० | ४१ | ७११ |
| | ९४.२०% | ५.८०% | १००.००% |
| एकूण | ११७० | १०३ | १२७३ |
| | ९१.९०% | ८.१०% | १००.००% |

तक्ता क्र. ३९ नुसार, बहुतांशी शहरी आणि ग्रामीण भागात अनुक्रमे ८९% व ९४.२०% मांगगारोडी कुटुंबे जातीबाह्य विवाह करत नसल्याचे दिसते. जातीबाह्य विवाह न करणे हे जातीसंस्थेने बहाल केलेले वैशिष्ट्ये तंतोतंत पाळले जाते असे म्हणावे लागते. जातीबाह्य विवाह केल्याने जातीची 'शुद्धता' नष्ट होते असे मानले जाते.

**तक्ता क्र. ४०: विभागनिहाय कुटुंबांतील मुलींच्या लग्नाच्या वयाचे प्रमाण**

| विभाग | मुलींच्या लग्नाच्या वयाचे प्रमाण | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | १० वर्षापेक्षा कमी | १० ते १८ वर्ष | १८ वर्षापेक्षा जास्त | |
| शहरी | २ | २३८ | ३२२ | ५६२ |
| | ०.४०% | ४२.३०% | ५७.३०% | १००.००% |
| ग्रामीण | १ | ३३१ | ३७९ | ७११ |
| | ०.१०% | ४६.६०% | ५३.३०% | १००.००% |
| एकूण | ३ | ५६९ | ७०१ | १२७३ |
| | ०.२०% | ४४.७०% | ५५.१०% | १००.००% |

तक्ता क्र. ४० नुसार असे दिसते की, एकंदरीत मांग गारुडी समाजातील शहरी आणि ग्रामीण भागात अनुक्रमे ४२.७० %व ४६.७० %कुटुंबे घरातील मुलींचे विवाह हे वयाच्या १८ वर्षा आधीच करतात. मुलगी इयत्ता ६ वी मध्ये गेली कि लग्नासाठी नवरा मुलगा शोधू लागतात. १२ व्या वर्षी मुलींचे लग्न लावण्याचे प्रमाण त्यामुळे दिसून येते. यावेळी मुलीची पसंती विचारात घेतली जात नाही. मुलींचे शिक्षण त्यामुळे अर्धवट राहते. बारामती येथील गट चर्चेत या समाजातील स्त्रियांनी सांगितले की, 'चूल व मुल सांभाळणे हे अजूनही समाजात स्त्रियांचे स्थान आहे.'

**तक्ता क्र ४१: विभागनिहाय कुटुंबात पत्रिका जुळवून विवाहाचे प्रमाण**

| विभाग | कुटुंबात पत्रिका जुळूवून विवाहाचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ११५ | ४४७ | ५६२ |
| | २०.५०% | ७९.५०% | १००.००% |
| ग्रामीण | १७३ | ५३८ | ७११ |
| | २४.३०% | ७५.७०% | १००.००% |
| एकूण | २८८ | ९८५ | १२७३ |
| | २२.६०% | ७७.४०% | १००.००% |

तक्ता क्र. ४१ नुसार ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागांमध्ये पत्रिका जुळवून विवाह केला जात असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अधिक आहे. शहरी भागात सुमारे ७९.५० %तर ग्रामीण भागात ७५.७० %कुटुंबात विवाह करतेवेळी पत्रिका जुळवून लग्न लावले जाते. फुरसुंगी मधील चंदवाडी वस्ती मध्ये मांग गारुडी कुटुंबे पत्रिका पाहून लग्न जुळवत नाही तर नातीगोती, कुळे, आणि पंचांची मंजुरी या गोष्टी पाहिल्या जातात. माहिती संकलनातून पत्रिका जुळवून विवाह करण्याचे प्रमाण अधिक दिसत असले तरी मांग गारुडी समाजाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या समाजात ही प्रथा नसल्याचे दिनांक १७ मार्च २०१६ रोजी झालेल्या बैठकीत सांगितले.

**तक्ता क्र. ४२: विभागनिहाय मुलाने मुलीस हुंडा देण्याचे पद्धतीचे प्रमाण**

| विभाग | मुलाने मुलीस हुंडा देण्याचे पद्धतीचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | २५५ | ३०७ | ५६२ |
| | ४५.४०% | ५४.६०% | १००.००% |
| ग्रामीण | २८२ | ४२९ | ७११ |
| | ३९.७०% | ६०.३०% | १००.००% |
| एकूण | ५३७ | ७३६ | १२७३ |
| | ४२.२०% | ५७.८०% | १००.००% |

तक्ता क्र. ४२ नुसार वरील तक्त्यानुसार, ग्रामीण भागातील ६०.३० %कुटुंबात नवऱ्या मुलाने नवरी मुलीस हुंडा देण्याची पद्धत आहे. हेच प्रमाण शहरी भागासाठी ५४.६० आहे. लग्नकार्याचा खर्च 'चार आणे बारा आणे' या पद्धतीने करीत असल्याने नवरा मुलगा खर्चाचा मोठा वाटा उचलतो. तसेच लग्न ठरल्यावर मुलीला ६० रु देज देण्याची पद्धत आजही रूढ असल्याचे गट चर्चे दरम्यान समोर आले.

## मांग गारुडी जातीचे समाजातील स्थान

मांग-गारुडी ही जात अस्पृश्य समजली जाते. ते जबरदस्त कांगावखोर व चोर असतात. गावकरी त्यांच्या तांड्यात जाण्याला धजत नाहीत. त्यात कोणी गेले तर पुरुष एकच वर्दळीला येतात. व बायका एकच गिल्ला करतात. इतर समाजाशी त्यांचे चांगले सहसंबंध असतात. या जातीतील लोकांना नाव्ही किंवा परीट सेवा देत नाहीत. त्यामुळे ते स्वतःचे केस स्वत: कापत, अशी काही वर्षापूर्वी त्यांची स्थिती असल्याचे सांगण्यात आले. पण अलीकडील काळात ते न्हाव्याच्या दुकानात जातात. त्यांची स्वत:ची स्मशानभूमी आहे. सार्वजनिक पाणवठयावरुन पाणी भरतात. सामाजिक स्तरामध्ये हा समाज सर्वात खालच्या स्थानावर मानला जातो. वर्णव्यवस्थेमध्ये ते शुद्र म्हणुन संबोधले जातात.

मांग-गारुडी समाजाचे समाजात तुच्छ स्थान समजले जाते. सन २०१५ मध्येही हेच स्थान आहे. अजूनही, या समाजाला अस्पृश्य म्हणूनच समजले जाते. या समाजाकडे फक्त 'वोट बँक' (Vote Bank) म्हणूनच पाहिले जाते.

**तक्ता क्र .४३ : विभागनिहाय इतर समाजातील लोकांच्या समारंभात सहभाग घेण्याचे प्रमाण**

| विभाग | इतर समाजातील लोकांच्या समारंभात सहभाग घेण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ५२ | ५१० | ५६२ |
| | ९.३०% | ९०.७०% | १००.००% |
| ग्रामीण | ७१ | ६४० | ७११ |
| | १०.००% | ९०.००% | १००.००% |
| एकूण | १२३ | ११५० | १२७३ |
| | ९.७०% | ९०.३०% | १००.००% |

तक्ता क्र. ४३ नुसार इतर समाजातील लोकांच्या समारंभात ग्रामीण आणि शहरी भागातील सुमारे ९० %कुटुंबे सहभागी होत असतात.

**तक्ता क्र .४४ : विभागनिहाय इतर समाजातील लोकांकडून मिळणारी वागणूकीचे प्रमाण**

| विभाग | इतर समाजाकडून मिळणारी वागणूकीचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | भेदभावाची | समानतेची | |
| शहरी | ९२ | ४७० | ५६२ |
| | १६.४०% | ८३.६०% | १००.००% |
| ग्रामीण | २५७ | ४५४ | ७११ |
| | ३६.१०% | ६३.९०% | १००.००% |
| एकूण | ३४९ | ९२४ | १२७३ |
| | २७.४०% | ७२.६०% | १००.००% |

परंतु, तक्ता क्र. ४४ नुसार ग्रामीण भागातील ३६.१० % कुटुंबांना तर शहरी भागातील १६.४० % कुटुंबांना सामाजिक भेदभावाचा सामना करावा लागतो. थेऊर, लोणी काळभोर आणि लोहगाव येथील गट चर्चेत असे सांगण्यात आले की, मांग गारुडी समाजाला गावगाड्यात स्थान नाही. "४० वर्षापूर्वी आम्हाला इतर समाजाचे लोक पंक्तीतून उठवायचे आजही मराठा व ब्राह्मण लोक आमचे पाणी पीत नाहीत. पण तरीही आज परिस्थिती बदलली आहे. आज गावचे सरपंच चहा प्यायला बोलवितात. या समाजाचे इतर समजाबरोबर चांगले

संबंध आहेत. लग्न व बारशात इतर समाजाचे लोक यांना सहभागी करून घेतात .पण पूर्वी मात्र अस्पृश्य समजले जात .त्यामुळे भेदभाव केला जात असे .इतर समाजाच्या पंक्तीमधील उष्टी पत्रावळ या लोकांना खावी लागत. इतर समाजातील लोक या लोकांना पूर्वी जवळ घेत नव्हते पण आता घरात जेवायला बोलावतात .पूर्वी पाणी पिले म्हणून आमच्या लोकांना खूप मारले होते पण आता लोहगावात पाणी पुरवठा खात्यात मांग गारुडी समाजाचे लोक कार्यरत आहेत." असे मत गटचर्चे दरम्यान या समाजातील लोकांनी मांडले.

## शिक्षणाची स्थिती

**तक्ता क्र. ४५: विभागनिहाय कुटुंबात शिक्षित व्यक्तींची संख्या व त्याचे प्रमाण**

| विभाग | कुटुंबात शिक्षित व्यक्तींची संख्या | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | अशिक्षित | १ ते २ व्यक्ती शिक्षित | ३ ते ४ व्यक्ती शिक्षित | ५ पेक्षा जास्त | |
| शहरी | ७० | २२२ | १७६ | ९४ | ५६२ |
| | १२.५०% | ३९.५०% | ३१.३०% | १६.७०% | १००.००% |
| ग्रामीण | ७० | २५९ | २५६ | १२६ | ७११ |
| | ९.८०% | ३६.४०% | ३६.००% | १७.७०% | १००.००% |
| एकूण | १४० | ४८१ | ४३२ | २२० | १२७३ |
| | ११.००% | ३७.८०% | ३३.९०% | १७.३०% | १००.००% |

तक्ता क्र. ४५ नुसार असे दिसते की, या समाजामध्ये शहरी भागातील कुटुंबांमध्ये अशिक्षितांचे सुमारे १३ %असून ग्रामीण भागात हे प्रमाण १० %आहे. तसेच, मांग गारुडी समाजाच्या ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील कुटुंबांतील १ ते २ सदस्य आणि ३ ते ४ सदस्य आणि त्यापेक्षा जास्त सदस्य शिक्षित असण्याचे प्रमाण यामध्ये फारसा फरक दिसून येत नाही.

**तक्ता क्र. ४६: शिक्षण घेणाऱ्या मुलांचे प्रमाण**

| **शिक्षण घेणाऱ्या मुलांचे प्रमाण** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **विभाग** | **प्राथमिक** | | **माध्यमिक** | | **उच्च माध्यमिक** | | **एकूण** |
| | **मुले** | **मुली** | **मुले** | **मुली** | **मुले** | **मुली** | |
| शहरी | २१० | १७८ | ७३ | ६४ | ४६ | १९ | ५९० |
| | ३६% | ३०% | १२% | ११% | ८% | ३% | १००% |
| ग्रामीण | २६३ | १९८ | १२४ | ७१ | ३९ | २८ | ७२३ |
| | ३६% | २७% | १७% | १०% | ५% | ४% | १००% |
| एकूण | ४७३ | ३७६ | १९७ | १३५ | ८५ | ४७ | १३१३ |
| | ३६% | २९% | १५% | १०% | ६% | ४% | १००% |

तक्ता क्र. ४६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मांग गारुडी  समाजातील ६ ते १८ वयोगटातील शिक्षण घेत असलेल्या मुलांचे प्रमाण दिसत आहे. या तक्त्यावरून शिक्षण घेण्याच्या प्रमाणात मुलांच्या तुलनेत मुलीची संख्या ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागामध्ये कमी प्रमाणात दिसत आहे. शहरी भागातील एकूण मुलांच्या ३०% मुली या प्राथमिक शिक्षण घेत आहेत. तर ग्रामीण भागात हेच प्रमाण २७% आहे. तसेच प्राथमिक ते उच्च माध्यमिक पर्यंत शिक्षण घेण्याचे प्रमाण कमी कमी होताना दिसत आहे. उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांचे व मुलींचे प्रमाण शहरी भागात अनुक्रमे ८ % व ३ % दिसत आहे तर ग्रामीण भागात हेच प्रमाण अनुक्रमे ५ % व ४ % दिसत आहे. यावरून मांग गारुडी  समाजातील शिक्षणाबाबतची उदासीनता दिसून येते. सामाजिक-आर्थिक मागासलेपणा, पालकांमधील अशिक्षितपणा शैक्षणिक सवलती मिळवण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा आभाव यामुळे या समाजातील मुले शिकत नाहीत असे मत लोकांनी मांडले.

**तक्ता क्र. ४७: शिक्षणातून गळती झालेल्या मुलांचे प्रमाण**

| शिक्षणातून गळती झालेल्या मुलांचे प्रमाण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विभाग | प्राथमिक | | माध्यमिक | | उच्च माध्यमिक | | एकूण |
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | |
| शहरी | २५ | २८ | २२ | १७ | ४ | ३ | ९९ |
| | २५% | २८% | २२% | १७% | ४% | ३% | १००% |
| ग्रामीण | ५२ | ६४ | ४४ | २९ | १४ | २ | २०५ |
| | २५% | ३१% | २१% | १४% | ७% | १% | १००% |
| एकूण | ७७ | ९२ | ६६ | ४६ | १८ | ५ | ३०४ |
| | २५% | ३०% | २२% | १५% | ६% | २% | १००% |

तक्ता क्र. ४७ नुसार मांग गारुडी  समाजातील मुलांचे शाळेतील गळतीचे प्रमाण दिसून येते. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात गळती झालेल्या मुलांची संख्या जास्त आहे. शहरी भागात प्राथमिक ते उच्च माध्यमिक पर्यंत एकूण ९९ मुलांची गळती झालेली दिसते तर ग्रामीण भागात हाच आकडा दुप्पट म्हणजेच २०५ एवढा दिसत आहे. तसेच एकूण गळतीचे प्रमाण प्राथमिक शिक्षण ते माध्यमिक शिक्षण असे कमी होताना दिसत असुन उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांचे देखील कमी प्रमाण हे त्यामागील कारण आहे. गट चर्चेमध्ये असे आढळून आले की, मुलींचे कमी वयात होणारे विवाह, त्यांना घर कामासाठी शाळा सोडावी लागणे ही देखील मांग गारुडी  समाजातील मुलांच्या गळतीमागील कारणे दिसून आली.

**तक्ता क्र. ४८: विभागनिहाय शिक्षणासाठी आवश्यक कागदपत्रांची उपलब्धता असण्याचे प्रमाण**

| विभाग | शिक्षणासाठी आवश्यक कागदपत्रांची  उपलब्धता | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ४७३ | ८९ | ५६२ |
| | ८४.२०% | १५.८०% | १००.००% |
| ग्रामीण | ५४३ | १६८ | ७११ |
| | ७६.४०% | २३.६०% | १००.००% |
| एकूण | १०१६ | २५७ | १२७३ |
| | ७९.८०% | २०.२०% | १००.००% |

मांग गारुडी समाजाच्या विकासात शिक्षणासाठी उपलब्ध असणाऱ्या कागदपत्रांचे महत्व प्रकर्षाने दिसून येते, कारण, अशा प्रकारच्या कागदपत्रांवरच त्यांना विकासाच्या योजना आणि शासकीय योजनेचा लाभ प्राप्त होण्याचा मार्ग मोकळा होत असतो. तक्ता क्र. ४८ नुसार असे दिसते की, ग्रामीण भागामध्ये ७६.४०% कुटुंबांकडे शैक्षणिक कागदपत्रांची उपलब्धता नाही. याउलट, शहरी भागात हे प्रमाण सुमारे ८४% आहे. त्यामुळे त्याचा परीणाम त्यांच्या विकासावर साहजिकच होत आहे, असे म्हणावे लागेल. शिवाय, जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रमाणपत्र मिळवताना सुद्धा अडचणीं येण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासंबंधी अधिक चर्चा आर्थिक स्थिती या प्रकरणा अंतर्गत करण्यात आली आहे.

## महिलांचे समाजातील स्थान

**तक्ता क्र. ४९: विभागनिहाय घटस्फोटीत व विधवा महिलांच्या पुनर्विवाहास परवानगीचे प्रमाण**

| विभाग | घटस्फोटीत व विधवा महिलांच्या पुनर्विवाहास परवानगी | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ४८७ | ७५ | ५६२ |
| | ८६.७०% | १३.३०% | १००.००% |
| ग्रामीण | ६७२ | ३९ | ७११ |
| | ९४.५०% | ५.५०% | १००.००% |
| एकूण | ११५९ | ११४ | १२७३ |
| | ९१.००% | ९.००% | १००.००% |



*मांग गारुडी समाजातील स्त्रिया*

तक्ता क्र. ४९ नुसार ग्रामीण भागात सुमारे ९४.५० %कुटुंबे असे म्हणतात की, घटस्फोटीत किंवा विधवा महिला पुन्हा विवाह करू शकत नाही. तेच प्रमाण शहरी भागासाठी ८६.७० %आहे. श्री संजय राखपसरे, मांग गारुडी समाजातील पुढारी कार्यकर्ते यांच्या मते, या समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान असल्याचे क्षेत्र भेटी दरम्यान दिसून आले. या समाजातील पुरुषांची स्त्रियांकडे पाहण्याची संशयी वृत्ती आहे. महिलांना आदराचे स्थान नाही तसेच पुरुषांच्या व्यसनाधीनतेमुळे महिलांना त्रास दिला जातो.

**तक्ता क्र ५०: विभागनिहाय महिलांना घटस्फोटानंतर पोटगीचे प्रमाण**

| विभाग | महिलांना घटस्फोटानंतर पोटगी | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ५११ | ५१ | ५६२ |
| | ९०.९०% | ९.१०% | १००.००% |
| ग्रामीण | ६९३ | १८ | ७११ |
| | ९७.५०% | २.५०% | १००.००% |
| एकूण | १२०४ | ६९ | १२७३ |
| | ९४.६०% | ५.४०% | १००.००% |

तक्ता क्र. ५० नुसार महिलांना घटस्फोटानंतर ग्रामीण भागात सुमारे ९७.५० %तर शहरी भागात ९०.९० %कुटुंबे पोटगी देत नाहीत. यावरून घटस्फोटीत महिलांची परिस्थिती चिंताजनक दिसून येते. आमच्या पुरुषांना रोजगार नाही, अर्थाजन नाही तर पोटगी देणार कुठून असे मत गट चर्चे दरम्यान बहुसंख्य मांग गारुडी लोकांनी, विशेषतः पुरुषांनी मांडले. तसेच या समाजातील महिला आपल्या हक्कांसाठी कायद्याची मदत घेत नसल्यानेही हे प्रमाण जास्त दिसून येत आहे. फुरसुंगी येथे झालेल्या गट चर्चेत महिलांना घटस्फोट किंवा पोडगी घ्यायचा अधिकार नसल्याचे वस्तीतील लोकांनी सांगितले. कितीही अडचणी असल्या तरी महिलेला पतीसोबत नांदायलाच लागते. शिवाय कोर्टाची पायरी चढण्याची समाजातील स्त्रियांची ऐपत नाही.

**तक्ता क्र . ५१: विभागनिहाय देवदासी/मुरळी प्रथांचे प्रमाण**

| विभाग | देवदासी/मुरळी प्रथांचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ४६७ | ९५ | ५६२ |
| | ८३.१०% | १६.९०% | १००.००% |
| ग्रामीण | ६४५ | ६६ | ७११ |
| | ९०.७०% | ९.३०% | १००.००% |
| एकूण | १११२ | १६१ | १२७३ |
| | ८७.४०% | १२.६०% | १००.००% |

तक्ता क्र. ५१ नुसार असे दिसून येते की, मांग गारुडी समाजामध्ये देवदासी अथवा मुरळीची प्रथा असल्याचे शहरी भागातील १६.९०% तर ग्रामीण भागातील ९.३० % कुटुंबांनी सांगितले आहे. अजूनही एकूण १२.६०% कुटुंबे अशी प्रथा असल्याचे सांगतात. यावरून या समाजातील स्त्रियांच्या स्थितीचा अंदाज येतो. १९३० मधील अहवालात स्टार्ट समितीने मुरळी प्रथेच्या समस्येवर गांभीर्य व्यक्त केले होते. निष्पाप मुलीना देवाच्या नावाने समाजात सोडण्यात येत होते. त्याचा देवाशी विवाह करण्यात येत होता. त्याविषयी प्रतिबंधात्मक कायदा माद्ण्याचे मत सदर समितीचे नोंदविले होते. तसेच, मुलांना वाघ्या किंवा पोतराज म्हणून ‘देवाला दान’ करण्याचीही प्रथा होती. पण त्याचे प्रमाण मुरळी प्रथेअंतर्गत असणाऱ्या मुलींच्या तुलनेत कमी होते (स्टार्ट समिती १९५०: ९८-९९). अलीकडील काळात, महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र देवदासी प्रथा निर्मुलन कायदा २००५ लागू करण्यात आला. त्यात देवदासी प्रथेला प्रतिबंध करून ती प्रथा समूळ नष्ट करण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले. देवदासींना विवाह करता यावा व त्यांचे पुनर्वसन व्हावे यासाठी शासनाने प्रयत्न देखील केले आहेत (website:bombayhighcourt.nic.in, accessed dated on 13th April 2016).

**तक्ता क्र. ५२: विभागनिहाय प्रथम मासिक पाळी आल्यावर धार्मिक विधीचे प्रमाण**

| विभाग | प्रथम मासिक पाळी आल्यावर धार्मिक विधीचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ९८ | ४६४ | ५६२ |
| | १७.४०% | ८२.६०% | १००.००% |
| ग्रामीण | १२८ | ५८३ | ७११ |
| | १८.००% | ८२.००% | १००.००% |
| एकूण | २२६ | १०४७ | १२७३ |
| | १७.८०% | ८२.२०% | १००.००% |

या समाजातील मुलीना मासिक पाळी आल्यानंतर ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात धार्मिक विधी केला जातो. तक्ता क्र. ५२ नुसार जवळपास ८२% कुटुंबांमध्ये हा विधी केला जात असल्याचे दिसून येत आहे.

**तक्ता क्र ५३: विभागनिहाय घरातील बायकांना मासिक पाळीत विटाळ पाळण्याचे प्रमाण**

| विभाग | घरातील बायकांना मासिक पाळी आल्यावर बाजूला बसविणे | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ९० | ४७२ | ५६२ |
| | १६.००% | ८४.००% | १००.००% |
| ग्रामीण | ४८ | ६६३ | ७११ |
| | ६.८०% | ९३.२०% | १००.००% |
| एकूण | १३८ | ११३५ | १२७३ |
| | १०.८०% | ८९.२०% | १००.००% |

तक्ता क्र. ५३ नुसार ग्रामीण भागात सुमारे ९३.२० %कुटुंबे महिलांना घरात मासिक पाळी आल्यानंतर बाजुला बसवून त्या कालावधीमध्ये अस्पृश्यता पाळतात. महिलांनी या काळात घरातील इतर कामे उदा. कपडे व भांडी धुणे, घर साफसफाई करणे या प्रकारची अस्वच्छतेची कामे केली तर ते मान्य असते. पण, त्याच काळात देव पूजा, स्वयंपाक, किंवा इतर धार्मिक कार्यात त्या एकतर सहभागी होऊ शकत नाही किंवा ते कार्य पार पडणे समाजमान्य नसते. पूर्वापार अस्तित्वात असणाऱ्या जातीसंस्थेने दिलेले स्पृश्य-अस्पृश्य पवित्र-अपवित्र या कल्पना त्यात गुंतलेले असते.

**तक्ता क्र . ५४: विभागनिहाय बायकांना जटा धारण करण्याचे प्रमाण**

| विभाग | बायकांना जटा धारण करण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ३३४ | २२८ | ५६२ |
| | ५९.४०% | ४०.६०% | १००.००% |
| ग्रामीण | ३३४ | ३७७ | ७११ |
| | ४७.००% | ५३.००% | १००.००% |
| एकूण | ६६८ | ६०५ | १२७३ |
| | ५२.५०% | ४७.५०% | १००.००% |



*जटा असलेली मांग गारुडी महिला*

तक्ता क्र . ५४ नुसार ग्रामीण भागात सुमारे ५३ %कुटुंबाच्या म्हणण्यानुसार या समाजातील बायकांना जटा असतात. तर शहरी भागासाठी हेच प्रमाण ४०.६० %आहे.

**तक्ता क्र ५५: विभागनिहाय बाळंतपणात महिलांसोबत विटाळ पाळण्याचे प्रमाण**

| विभाग | बाळंतपणात महिलांसोबत विटाळ पाळण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ८१ | ४८१ | ५६२ |
| | १४.४०% | ८५.६०% | १००.००% |
| ग्रामीण | ३८ | ६७३ | ७११ |
| | ५.३०% | ९४.७०% | १००.००% |
| एकूण | ११९ | ११५४ | १२७३ |
| | ९.३०% | ९०.७०% | १००.००% |

तक्ता क्र. ५५ नुसार असे दिसून येते कि महिलांना बाळंत झाल्यावर कुटुंबापासून दूर ठेवून त्याच्यासोबत विटाळ पाळला जातो. एकंदरीत प्रमाण ९०.७० % एवढे आहे. शहरी भागापेक्षा हे प्रमाण ग्रामीण भागात जास्त म्हणजेच ९४.७० % एवढे आहे. तर ग्रामीण भागात केवळ ५.३०% कुटुंबे अशा प्रकारे महिलांसोबत **विटाळ** पाळत नाहीत. या काळात महिलांनी घरातील देव देवतांना स्पर्श करू नये. महिला या काळात अपवित्र समजल्या जातात, अशी धारणा असल्याचे दिसून आले.

## जात पंचायत

घटस्फोट, जातींचे तंटे-बखेडे हे जात पंचायातीमार्फत सोडविले जातात. या जातीत पितृसत्ताक पध्दती पाळतात. समाजातील कार्यकर्त्यांनी माहिती सांगितल्याप्रमाणे, अजूनही समाज 'जात पंचायती'च्या नियमाप्रमाणे चालतो, हे विशेष आहे. मांग गारुडी  समाज जात पंचायातीलाच 'फड पंचायत' म्हणतो. तसेच फुरसुंगी येथे झालेल्या चर्चेत पूर्वी मांग गारुडी समाजातील लोक फड बसवायची, पण आता ही पद्धत नाही असे सांगितले गेले. या समाजात जात पंचायती मध्ये  पाटीलकी करण्याचा अधिकार सकट व राखपसरे ही कुळे बजावतात. तसेच लोंढे आडनाव असलेल्या लोकांनाही पूर्वी पंच केले होते. पंचाची निवड करताना तो अशील आहे का बाडगा हे तपासले जाते. आपसातील वाद मिटवण्यासाठी पंचाचे मत घेतले जाते. हा समाज स्वत:ला गुन्हेगारी स्वरूपाचा समाज समजत असल्याने आपण वाद सोडविण्यासाठी पोलिसांकडे का जायचे. त्या ऐवजी जात पंचायतीमार्फत प्रश्न सोडवायचे अशी पूर्वापार समज या लोकांमध्ये दिसून येते. नाशिक येथील कार्यशाळेत एका

प्रतिनिधीने मत व्यक्त केले की, "आमच्या जातीमध्ये, मांग गारुडी समाजात जात पंचायातीने एखादी शिक्षा दिल्याचे एकही उदाहरण नाही." पथदर्शी सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीनुसार, जात पंचायतीचा लग्न ठरविण्यामध्ये, अर्थात लग्न, घटस्फोट, साखरपुडा इ. मध्ये विशेष सहभाग असतो. ते मुख्य भूमिका पार पडतात. जात पंचायत लग्नासाठी एकत्र जमल्यानंतर समाजातील निर्णय घेतले जातात. कौटुंबिक वाद-विवाद सुद्धा येथेच सोडवले जातात. उदा. विवादाच्या विषयामध्ये तंटे सोडविताना दोन्ही पक्षास समान न्याय देण्याचा प्रयत्न जात पंचायत करते. तरीही समजा, विवाद मिटत नसेल तर जाती बाहेर काढणे, दंड करणे, शारीरिक शिक्षा करणे आणि गावाबाहेर हाकलून देणे अशा प्रकारच्या शिक्षा जात पंचायत करत असते. पण अलीकडील काळात त्याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते. तसेच धार्मिक कार्यक्रमांमध्येदेखील पंचांना आदराचे स्थान असते. चैत्र महिन्यात रेडा बळी देणे, आषाढात बोकड बळी देणे, जत्रा भरविणे ही कामे पंच करतात.

**तक्त क्र. ५६: विभागनिहाय जात पंचायतीकडून सोडविल्या जाणाऱ्या समस्याचे प्रमाण**

| विभाग | जात पंचायतीकडून सोडविल्या जाणाऱ्या समस्या | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | कौटुंबिक तंटा | विवाह संबधीत | प्रतिक्रिया नाही | इतर तंटा निवारण | |
| शहरी | १३३ | १११ | ३४ | १० | २८८ |
| | ४६.२०% | ३८.५०% | ११.८०% | ३.५०% | १००.००% |
| ग्रामीण | ९१ | २९३ | १३ | १४ | ४११ |
| | २२.१०% | ७१.३०% | ३.२०% | ३.४०% | १००.००% |
| एकूण | २२४ | ४०४ | ४७ | २४ | ६९९ |
| | ३२.००% | ५७.८०% | ६.७०% | ३.४०% | १००.००% |



*जातपंचायतीची बैठक (लोहगाव)*

तक्ता क्र. ५६ नुसार, शहरी भागात सुमारे ४६.२० %कुटुंबाचे कौटुंबिक तंटा जात पंचायतीकडून सोडविण्याचे प्रमाण आहे. तसेच, ग्रामीण भागात कुटुंबांच्या विवाहासंबधीच्या अडचणी सोडविण्याचे प्रमाण ७१.३० %आहे. तक्ता क्र. ४१ नुसार असे दिसते की, त्यासाठी जात पंचायत जातीतील लोकांना शिक्षा देण्याचा भाग म्हणून जास्तीत जास्त 'समज देणे' ह्या प्रकाराचा अवलंब करत असल्याचे दिसते. तसेच इतर स्वरुपाची शिक्षा म्हणजे वाळीत टाकणे, शारीरिक शिक्षा यांचे प्रमाण अत्यल्प दिसून येते.

**तक्ता क्र. ५७: विभागनिहाय जात पंचायतीकडून दिलेल्या शिक्षेचे स्वरूप यांचे प्रमाण**

| विभाग | जात पंचायतीकडून दिलेल्या शिक्षेचे स्वरूप | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दंड व वाळीत टाकणे दोन्ही | समज देणे | माहित नाही/प्रती क्रिया नाही | वाळीत टाकणे | दंड | शारीरिक शिक्षा | |
| शहरी | १२ | १३७ | ९८ | ३० | ९ | २ | २८८ |
| | ४.२०% | ४७.६०% | ३४.००% | १०.४०% | ३.१०% | ०.७०% | १००.००% |
| ग्रामीण | १६ | ३३८ | ३० | १४ | ११ | २ | ४११ |
| | ३.९०% | ८२.२०% | ७.३०% | ३.४०% | २.७०% | ०.५०% | १००.००% |
| एकूण | २८ | ४७५ | १२८ | ४४ | २० | ४ | ६९९ |
| | ४.००% | ६८.००% | १८.३०% | ६.३०% | २.९०% | ०.६०% | १००.००% |



Form of Certificate to be issued to Vim. .ta Jati/Nomadic Tribes (excluding Dhangar and Vanjari and their synonyms) Persons belonging to the State of Maharashtra

CASTE CERTIFICATE

Documents Verified :-
1 School Leaving Certificate of Self
2 Ration Card Xerox
3 Affidavit of Applicant
4 School Leaving Certificate of Brother
5 Caste Certificate of Brother

This is to certify that Shri **Rakhapasare Vasant Bhau** Son of **Rakhpasare Bhau Babu** of Town **Phursungi** in District **Pune** of the State of Maharashtra belongs to the **GARUDI** Tribe which is recognised as a **Nomadic Tribe** under Government Re Edun. & Social Welfare Dept. CBC-1361/M dated 21/11/1961 amended from time to time.

2. Shri **Rakhapasare Vasant Bhau** and family ordinarily resides in Town **Phursungi** of **Pune** Distr State of Maharashtra

**Case No. : 050300783**

Place : Pune

Date : 03/05/2005

Signature-

Deputy Co...

Name -

Designation-

**Citizen Facility Center**

DEPUTY COLLECTOR C.F.C. PUNE

*चुकीच्या प्रवर्गात नोंद असलेले जात प्रमाणपत्र*

**तक्ता क्र. ५८: विभागनिहाय जातीचे प्रमाणपत्र असण्याचे प्रमाण**

| विभाग | जातीचे प्रमाणपत्र | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ३१० | २५२ | ५६२ |
| | ५५.२०% | ४४.८०% | १००.००% |
| ग्रामीण | ४९२ | २१९ | ७११ |
| | ६९.२०% | ३०.८०% | १००.००% |
| एकूण | ८०२ | ४७१ | १२७३ |
| | ६३.००% | ३७.००% | १००.००% |

तक्ता क्र. ५८ नुसार असे दिसून येते की, ग्रामीण भागातील सुमारे ६९.२० %कुटुंबाकडे जातीचे प्रमाणपत्र उपलब्ध नाही. तर हेच प्रमाण शहरी भागासाठी ५५.२० %आहे. सन १९५० पूर्वीच्या वास्तव्याच्या पुराव्या अभावी बहुसंख्य मांग गारुडी लोकांना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यात अडचणी येतात असे या दिसून आले. तसेच, जात प्रमाणपत्र पडताळणी न केलेल्या कुटुंबाचे प्रमाण ग्रामीण भागासाठी ९६.९० % तर शहरी भागासाठी ९३.८० %आहे (पहा तक्ता क्र. ५९). मुळातच जातीचे प्रमाणपत्र नसणे, किंवा जात पडताळणी प्रमाणपत्राची आवश्यकता न भासणे अशी कारणे ही जात पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध नसण्यामागे दिसून येतात. शिवाय. मांग गारुडी समाजाला काही ठिकाणी जात प्रमाणपत्र हे चुकीच्या प्रवर्गात मिळाल्याचे दिसून आले. मागील पानावर दिलेल्या आकृतीमध्ये त्याची नोंद घेतलेली आहे.

**तक्ता क्र. ५९: विभागनिहाय जात पडताळणी प्रमाणपत्र असण्याचे प्रमाण**

| विभाग | जात पडताळणी प्रमाणपत्र | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ५२७ | ३५ | ५६२ |
| | ९३.८०% | ६.२०% | १००.००% |
| ग्रामीण | ६८९ | २२ | ७११ |
| | ९६.९०% | ३.१०% | १००.००% |
| एकूण | १२१६ | ५७ | १२७३ |
| | ९५.५०% | ४.५०% | १००.००% |

**तक्ता क्र. ६०: विभागनिहाय संघटना करत असलेली मदतीचे प्रमाण**

| विभाग | संघटना करत असलेली मदत | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | लोक प्रभोधन करणे | शेक्षाणिक व सामाजिक विकासासठी प्रयत्न | जातीचे प्रमाणपत्र मिळून देणे | शासकीय योजना लोकांपर्यंत पोहचवणे | कोणतीही मदत नाही | |
| शहरी | ५८ | ३९ | ३ | २ | १९१ | २९३ |
| | १९.८०% | १३.३०% | १.००% | ०.७०% | ६५.२०% | १००.००% |
| ग्रामिण | ११५ | २२ | ८ | १८ | २३६ | ३९९ |
| | २८.८०% | ५.५०% | २.००% | ४.५०% | ५९.१०% | १००.००% |
| एकूण | १७३ | ६१ | ११ | २० | ४२७ | ६९२ |
| | २५.००% | ८.८०% | १.६०% | २.९०% | ६१.७०% | १००.००% |

या समाजामध्ये मांग गारुडी समाज युवक संघ, मांग गारुडी विकास सेवा संघ अशा संघटना कार्य करीत आहेत. तक्ता क्र. ६० नुसार असे दिसते कि, एकूण ६१.७०% कुटुंबांना अशा संघटना कोणतीच मदत करत नसल्याचे सांगितले आहे. शहरी भागात ६५.२० %कुटुंबास कोणतीही मदत होत नाही. आणि हेच प्रमाण ग्रामीण भागासाठी ५९.१० %आहे. एकूण २५% कुटुंबांच्या मते अशा संघटना लोक प्रबोधनाचे काम करतात. ग्रामीण भागात हे प्रमाण  २८.८०% आहे. तर शहरी भागातील १९.८० %कुटुंबाच्या मते हे कार्य चालते. बहुतांशी कुटुंबांना आपल्या समाजात कोणत्या संघटना आहेत हे माहित नसल्याचे निदर्शनास आले. तसेच, फूरसुंगी-चंदवाडी येथील गट चर्चेमध्ये या समाजातील लोकांनी सांगितले की, २००४ मध्ये मांग गारुडी समाज युवक संघ संघटनेने पुण्यातील अलका टोकीज ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत समाजातील कार्यकर्त्यांचा मोर्चा काढला. यावेळी मांग गारुडी समाजास राहण्यासाठी सात बारा उतारा असलेली जमीन हवी, जातीच्या दाखल्यासाठी १९५० च्या वास्तव्याच्या पुराव्याची अट या समाजासाठी रद्द करावी  अशा मागण्या जिल्हाधिकाऱ्याकडे केल्या गेल्या. त्या काळापासून ही संघटना या समाजाच्या उन्नतीसाठी सरकारशी पाठपुरावा करीत आहे.

**तक्ता क्र: ६१: विभागनिहाय संघटना मदतीसाठी करीत असलेली मागणी याचे प्रमाण**

| विभाग | संघटना मदतीसाठी करत असलेली मागणी | | एकूण |
|---|---|---|---|
| | आर्थिक स्वरूपातील मागणी | कोणतीही मागणी नाही | |
| शहरी | ३६ | २५७ | २९३ |
| | १२.३०% | ८७.७०% | १००.००% |
| ग्रामिण | ७ | ३९२ | ३९९ |
| | १.८०% | ९८.२०% | १००.००% |
| एकूण | ४३ | ६४९ | ६९२ |
| | ६.२०% | ९३.८०% | १००.००% |

तक्ता क्र. ६१ नुसार एकूण ९३.८०% कुटुंबांच्या मते सामाजिक कामासाठी किंवा लोकांच्या अडचणी सोडविण्यासाठी संघटना कोणतीच मागणी करीत नाही. परंतु, अशा कामांसाठी संघटना शहरी भागातून आर्थिक स्वरूपातून मदत गोळा करत असते असे १२.३०% कुटुंबांनी सांगितले. तर आर्थिक स्वरूपातील मदतीची मागणी करण्याचे प्रमाण ग्रामीणभागात अत्यल्प असल्याचे दिसते.

प्रकरण ३:

# मांग गारुडी  समाजाचा आर्थिक स्तर

## व्यवसाय

अंत्रोलीकर समितीनुसार, २००० मांग गारुडी  मुंबईतील नायगाव भागात राहतात. त्यापैकी २०० लोकांना काहीच काम नाही. २५% लोक गुन्हेगारीकडे वळले आहेत. मुंबईतील सेताण चौकी भागातील २०% मांग गारुडी लोकांना रोजगार नाही व ते भीक मागतात. वरळीतील मांग गारुडीपेकी २५% लोकांना व्यवसाय नसल्याने ते भीक मागतात. कल्याणमधील वालधुनी या गावात ५०० मांग गारुडी आहेत. त्यातील ७५% लोकांना रोजगार नाही. मांग गारुडी  आणि इतर माजी गुन्हेगारी जमातीतील रोजगाराचे प्रमाण अनुक्रमे ६० आणि ४० आहे (अत्रोलीकर समिती अहवाल १९४९: २). मांग-गारुडी समाजातील काही लोक काही प्रमाणात गारुडी समाजाचा व्यवसाय करत होते, जरी त्यांच्यापैकी बहुतांशी लोकांचा व्यवसाय म्हशी भादरणे किंवा म्हशींचा व्यवहार करणे हा होता (Enthoven १९९०, ३५८). थाडे समितीच्या अहवालावरून असे दिसून येते की, या समाजातील लोक काही प्रमाणात शेती, पशुपालन, टोपल्या-चटया बनविणे इ. कामे उदरनिर्वाहासाठी करत असले तरीही त्यांची मुख्य उपजीविका ही गुन्हेगारी (चोरी) या व्यवसायातूनच  होत असल्याचे दिसून येते. मराठवाड्यातील मांग-गारुडी समाजातील बहुतांशी कुटुंब समाजविघातक कृत्यांमध्ये उदा. दारू बनविणे, वेश्याव्यवसाय इ. मध्ये सहभागी दिसतात. मांग-गारुडी समाजाचा पारंपारिक व्यवसाय म्हशी भादरणे हा आहे. तसेच, म्हशी भादरण्याबरोबरच म्हशींची चोरी करणे, जनावरे चोरणे किंवा पिकांची चोरी करणे ह्यामध्ये हा समाज गुंतलेला असायचा. त्यात महिलांचाही समावेश असायचा (अत्रे १९१६: १२८). यावरून या समाजातील कुटुंबांना त्यांचे पूर्वज करत असलेल्या व्यवसायाबाबत विचारण्यात आले तेव्हा, सर्वेक्षण करताना असे आढळून आले की, सर्वच उत्पन्न गटातील बहुतांशी लोकांच्या मतानुसार, त्यांचे पूर्वज म्हशी भादरण्याचा व्यवसाय करीत होते. तक्ता क्र. ६२ नुसार पूर्वज चोरी करण्याचा व्यवसाय करत होते याचे प्रमाण अल्प उत्पन्न गटातील कुटुंबामध्ये ४७.४० टक्के तर उच्च उत्पन्न गटात ४१ टक्के दिसून येते.  तसेच, तक्ता क्र. ६५ नुसार भिक मागण्याचा पूर्वजांचा व्यवसाय असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अल्प उत्पन्न गट असणाऱ्या कुटुंबामध्ये सुमारे ५८.४० टक्के आहे. तर हेच प्रमाण उच्च उत्पन्न गट असणाऱ्या कुटुंबांमध्ये ४३.६० टक्के दिसते. त्याचबरोबर तक्ता क्र. ६४ नुसार सापांचा खेळ करणे हा पूर्वजांचा व्यवसाय असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण सर्वच उत्पन्न गटात

अत्यंत अल्प दिसते. पूर्वजांचा गावगुंडी व हातचलाखीचा व्यवसाय असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वच उत्पन्न गटात अल्प दिसून येते. (तक्ता क्र. ६६) शिरूरमधील या समाजाच्या एका व्यक्तीने पूर्वी आपण ढोल वाजवून डोंबाऱ्याचा खेळ करीत असल्याचे सांगितले.

**तक्ता क्र. ६२: पूर्वजांच्या चोरी करण्याच्या व्यवसायाचे प्रमाण**

| उत्पन्न | पूर्वजांच्या चोरी करण्याच्या व्यवसायाचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| उच्च | ८८ | ४६ | १३४ |
| | ५९.००% | ४१.००% | १००.००% |
| मध्यम | ५७४ | ५१८ | १०९२ |
| | ६५.७०% | ३४.३०% | १००.००% |
| अल्प | २३ | १६ | ३९ |
| | ५२.६०% | ४७.४०% | १००.००% |
| एकूण | ६८५ | ५८० | १२६५ |
| | ५४.२०% | ४५.८०% | १००.००% |


**तक्ता क्र . ६३: उत्पन्न गटनिहाय पूर्वजांचा म्हशी भादरण्याचा व्यवसाय करण्याचे प्रमाण**

| उत्पन्न गट | पूर्वजांचा म्हशी भादरण्याचा व्यवसाय | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| उच्च | २ | ३७ | ३९ |
| | ५.१०% | ९४.९०% | १००.००% |
| मध्यम | ९ | १२५ | १३४ |
| | ६.७०% | ९३.३०% | १००.००% |
| अल्प | ५० | १०४२ | १०९२ |
| | ४.६०% | ९३.३०% | १००.००% |
| एकूण | ६१ | १२०४ | १२६५ |
| | ४.८०% | ९५.२०% | १००.००% |



*म्हशी भादरण्यासाठी वापरायचे वस्तरे*

तक्ता क्र . ६३ वरून असे दिसून येते कि एकूण ९५.२०% लोकांचा म्हशी भादरण्याचा पूर्वीचा व्यवसाय होता. त्यापैकी अल्प उत्पन्न गट असलेल्या सर्वाधिक म्हणजे ९५.४०% लोकांनी आपल्या पूर्वजांचा म्हशी भादरण्याचा व्यवसाय असल्याचे सांगितले. तर उच्च उत्पन्न गटात हा व्यवसाय करण्याचे प्रमाण तुलनेने कमी दिसते. फुरसुंगी जवळच्या चंदवाडी या मांग गारुडी समाजाच्या वस्तीमध्ये बहुतांशी कुटुंबांमध्ये वस्तरे व केस भादारण्याची इतर साधने पाहायला मिळाली. ती सोबतच्या छायाचित्रात दाखवलेली आहेत. त्याचबरोबर, या समाजातील काही कुटुंबे राखोळीने म्हशी सांभाळण्याचा व्यवसाय करतात, त्याच्या मोबदल्यात एका म्हशीमागे महिन्याला किमान एक हजार रुपये आकारले जातात, असे क्षेत्राय भेटी दरम्यान निदर्शनास आले. लोहगावमधील मांग गारुडी कुटुंबाने 'भोत पाडणे' हा देखील पुर्वजांचा व्यवसाय असल्याचे सांगितले. गावातील म्हैशीने मेलेल्या पिलाला जन्म दिल्यास दुखाःने तिचे दुध आटू नये म्हणून मेलेल्या पिलाच्या कातडीमध्ये भुसा भरून त्याची प्रतिकृती तयार केली जाते. त्यास भोत पाडणे असे म्हणतात. पूर्वी हे काम मांग गारुडी समाज करत असे.



*राखोळीने सांभाळायला घेतलेल्या म्हशी (चंदवाडी, फुरसुंगी)*

**तक्ता क्र . ६४ : उत्पन्न गटनिहाय 'सापाचा खेळ' हा पूर्वजांचा व्यवसाय असण्याचे प्रमाण**

| उत्पन्न | सापाचा खेळ हा पूर्वजांचा व्यवसाय असण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| उच्च | ३८ | १ | ३९ |
| | ९७.४०% | २.६०% | १००.००% |
| मध्यम | १३० | ४ | १३४ |
| | ९७.००% | ३.००% | १००.००% |
| अल्प | १०५९ | ३३ | १०९२ |
| | ९७.००% | ३.००% | १००.००% |
| एकूण | १२२७ | ३८ | १२६५ |
| | ९७.००% | ३.००% | १००.००% |

तक्ता क्र. ६४ नुसार सापाचा खेळ दाखविणे हा मांग गारुडी या समाजाचा व्यवसाय नसल्याचे बहुतांशी लोकांचे म्हणणे आहे. सर्व उत्पन्न गटातील मिळून केवळ 3 टक्के लोकच आपले पूर्वज इतर

उदरनिर्वाहाची साधने नसल्याने हा व्यवसाय करीत होते असे म्हणतात. यामध्ये बारामतीमधील आमराई व खांडजगाव तसेच पुरंदर तालुक्यातील नीरा या भागातील मांग गारुडी वस्तीमधील लोकांचा समावेश आहे.

**तक्ता क्र . ६५ : उत्पन्न गटनिहाय पूर्वजांचा भीक मागण्याच्या व्यवसायाचे प्रमाण**

| उत्पन्न | पूर्वजांचा भीक मागण्याच्या व्यवसायाचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| उच्च | २२ | १७ | ३९ |
| | ५६.४०% | ४३.६०% | १००.००% |
| मध्यम | ८२ | ५२ | १३४ |
| | ६१.२०% | ३८.८०% | १००.००% |
| अल्प | ४५४ | ६३८ | १०९२ |
| | ४१.६०% | ५८.४०% | १००.००% |
| एकूण | ५५८ | ७०७ | १२६५ |
| | ४४.१०% | ५५.९०% | १००.००% |

तक्ता क्र. ६५ नुसार अल्प उत्पन्न गटातील मांग गारुडी लोकांचे भिक मागण्याचे प्रमाण जास्त दिसत असून मंदिराच्या बाहेर, रेल्वे रुळावर भिग मागण्याचा व्यवसाय पूर्वज करीत होते अशी माहिती या समाजातील लोकांनी दिली.

**तक्ता क्र . ६६ : उत्पन्न गटनिहाय पुर्वजांचा गावगुंडी खेळ हा व्यवसाय असण्याचे प्रमाण**

| उत्पन्न | पुर्वजांचा गावगुंडी खेळ व्यवसाय असण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| उच्च | ३३ | ६ | ३९ |
| | ८४.६०% | १५.४०% | १००.००% |
| मध्यम | १२२ | १२ | १३४ |
| | ९१.००% | ९.००% | १००.००% |
| अल्प | ९४६ | १४६ | १०९२ |
| | ८६.६०% | १३.४०% | १००.००% |
| एकूण | ११०१ | १६४ | १२६५ |
| | ८७.००% | १३.००% | १००.००% |

या समाजातील कार्येकर्त्यांशी चर्चा करताना यास दुजोरा मिळाला की, 'म्हशी भादरणारे' किंवा म्हशींचे संगोपन हा मांग-गारुडी समाजाचा पारंपारिक व्यवसाय आहे. शिवाय, पिकांच्या चोऱ्या, भुरटी चोरी इ.मध्ये सुद्धा या समाजातील लोक सहभागी असतात. मांग गारुडी समाजातील कुटुंबे अजूनही पारंपारिक व्यवसायात असण्याचे प्रमाण उल्लेखनीय आहे. उच्च उत्पन्न गटातील कुटुंबांचे या व्यवसायातील प्रमाण १२. ८० टक्के आहे, तर अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांमध्ये हे प्रमाण २१.६० टक्के दिसते. (तक्ता क्र. ६७) त्याचबरोबर, ग्रामीण भागातील सुमारे २७.७० टक्के कुटुंबे आणि शहरी भागातील ११.९० टक्के कुटुंबे अजूनही त्यांचा पूर्वजांच्या व्यवसायात गुंतलेले आहेत. (तक्ता क्र. ६८)

**तक्ता क्र . ६७ : उत्पन्न गटानुसार अजूनही पारंपारिक व्यवसायात असण्याचे प्रमाण**

| उत्पन्न | पारंपारिक व्यवसाय असण्याचे प्रमाण | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| उच्च | ३४ | ५ | ३९ |
| | ८७.२०% | १२.८०% | १००.००% |
| मध्यम | ११३ | २१ | १३४ |
| | ८४.३०% | १५.७०% | १००.००% |
| अल्प | ८५६ | २३६ | १०९२ |
| | ७८.४०% | २१.६०% | १००.००% |
| | १००३ | २६२ | १२६५ |
| एकूण | ७९.३०% | २०.७०% | १००.००% |




*म्हशी भादरण्याचा व्यवसाय करणारे पुरुष*
*(लोहगाव )*

वरील तक्त्यात २०.७०% लोक अजूनही पारंपारिक व्यवसायात आहेत. तर ७९.३० % मांग गारुडी लोकांनी आपला पारंपारीक व्यावसाय सोडून इतर साधने उदर निर्वाहासाठी अवलंबिली आहेत. तसेच अल्प उत्पन्न गटातील तुलनेने सर्वाधिक म्हणजे २१.६० टक्के लोक पारंपारीक व्यवसाय करीत आहेत. या वरून पारंपारिक व्यासायाय जसे की म्हशी भादारणे, म्हशी राखोळीने ठेवणे अशा व्यवसायातून अल्प प्रमाणात उत्पन्न मिळत असल्याचे दिसते.

**तक्ता क्र. ६८ : शहरी व ग्रामीण भागानुसार अजूनही पारंपरीक व्यवसायात असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण**

| विभाग | अजूनही पारंपारिक व्यवसाय | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| शहरी | ४९५ | ६७ | ५६२ |
| | ८८.१०% | ११.९०% | १००.००% |
| ग्रामीण | ५१४ | १९७ | ७११ |
| | ७२.३०% | २७.७०% | १००.००% |
| एकूण | १००९ | २६४ | १२७३ |
| | ७९.३०% | २०.७०% | १००.००% |




*शिरूर मधील भंगार गोळा करणारी मांग गारुडी समाजातील महिला*

पुणे जिल्ह्यातील मांग गारुडी समाजाच्या लोकांशी गट चर्चा करण्यात आली. त्यामध्ये असे दिसले की, चंदवाडी, बारामती, शिरूर भागात राहणाऱ्या समाजाचा मुख्य पारंपारिक व्यवसाय हा म्हैस भादरणे आहे पण त्याच बरोबर हे लोक भीक मागून खाणे सुद्धा करतात. थेऊर मधील गणपती मंदिराच्या बाहेर हे लोक मागून खातात. सध्याची पिढी ही मजुरी काम करून उदर निर्वाह करीत आहे व त्याच बरोबर खासगी कंपनी मध्ये कंत्राटी पद्धतीवर काम करून घर चालवत आहे. लोणी काळभोर, बेट वस्ती, उरळी कांचन येथील मांग गारुडी समाजाचे लोक दारुभट्टी चालवून गावठी दारू विकण्याचा व्यवसाय करतात. फुले नगर (आळंदी रोड) येथील इतर राज्यातून उदरनिर्वाहासाठी स्थलांतरीत मांग गारुडी वस्तीतील लोक चाकू-सुऱ्या यांना धार लावण्याचे काम करीत आहेत. म्हैस भादरणे हा व्यवसाय कमी झाला आहे. मात्र जुने पिढीचे लोक अजूनही ते करतात. चंदवाडीतील बरेच लोक अजूनही हे काम करतात. एक म्हैस भादरण्यासाठी एका व्यक्तीला साधारण १५ मिनिटे लागतात आणि त्यासाठी दर हा १०० रूपये आहे .बाणेर, माळवाडी, लोणीकंद भागात या समाजाचा म्हशी भादरणे आणि गावांतील पाटलांच्या म्हैशी संभाळणे तसेच चोरी करणे हा पण एक व्यवसाय होता. चोरी हे आपले उदरनिर्वाह करण्यसाठी करत होते. सध्याच्या परिस्थितीत मिळेल ते काम करणे, मजुरी करणे आणि स्त्रियां हे दुसऱ्यांच्या घरी जावून धुणी-भांडी करतात. याउलट, पुणे जिल्ह्यातील थेऊर भागात म्हशी विकण्याचा व्यवसाय अजूनही वस्तीतील लोक करतात .कुणाकडेही मोठ्या व्यवसायाची इतर साधने नाहीत, जमिनी नाहीत .त्यामुळे शेती करता येत नाही .या समाजाकडे उदर निर्वाहाचे साधन नसल्याने अजूनही मागासलेल्या

अवस्थेत समाज जगत आहे .दिवसेंदिवस तो अधोगतीला चालला आहे. ७० कुटुंबापैकी ५ ते १० कुटुंबे सध्या म्हशी भादारण्याचे काम करीत आहेत. थेऊर गणपती मंदिराबाहेर या समाजातील लोक आजही भीक मागत असतात. लोणी काळभोरमध्ये राखोळीने म्हशी सांभाळल्या जातात.

पथदर्शी सर्वेक्षाणादरम्यान गोंदिया जिल्ह्यातील घोगरा येथील वस्तीतील लोकांशी चर्चा केल्यानंतर माहिती मिळाली की, म्हशी भादरणे हा या लोकांचा पारंपारिक व्यवसाय आहे. या समाजातील काही लोकांकडे हा व्यवसाय करण्यासाठी त्या पद्धतीचा वस्तारा आहे. ते म्हशींचे केस भादारायचे काम करतात. या कामासाठी एका म्हशीचे १५० रुपये मिळतात. प्रत्येक २ महिन्याने एक म्हैस पुन्हा केस काढण्यासाठी तयार होत असते. अशाप्रकारे साधारणपणे, दोन महिन्यातून १०-१२ म्हशी भादारल्या जातात. वस्तीमधील बरेच लोक मजुरी करून उदरनिर्वाह करतात. त्यांना दिवसाला ५० ते ६० रु. मजुरी मिळते. तसेच कानातील मळ साफ करणे हा त्यांचा ५० वर्षापूर्वीपासूनचा धंदा आहे असेही त्या लोकांनी सांगितले. कानातील मळ काढून उदरनिर्वाह करणारे १०-१२ लोक या वस्तीत आहेत. गावोगावी फिरून ते हा व्यवसाय करतात. एका व्यक्तीचा कान साफ करण्याचे ते १० रु. घेतात. अशाप्रकारे  दिवसाला अंदाजे १०० रुपयांपर्यंत त्यांची कमाई  होते. काही लोक भिक मागणे, भंगार गोळा करणे अशी कामे करतात. भंगार गोळा करणाऱ्यांना दिवसाला ५० ते १०० रुपये भंगार विकून मिळतात. त्याचबरोबर, काही लोक मालिश करून आपला उदरनिर्वाह करतात. ते गावोगाव फिरून तेलाने मालिश करून देतात. एका मालिश चे ५० रु. घेतात. पूर्वी हे लोक चोरी देखील करायचे. गवत-काड्यांची चोरी करणे व शेतात किंवा गावात लपून ठेवणे, म्हशींचा चारा चोरणे, शेळ्या चोरणे अशा प्रकारची कामे करीत असत. लोकांशी चर्चा करताना असे समजले की, या समाजातील काही लोक काही प्रमाणात अवैध धंदे व भुरटे चोरी यामध्ये सध्याही गुंतलेले आहेत. घोगरा चौकी जवळूनच रेल्वे लाईन जात असल्याने रेल्वेमध्ये काही प्रमाणात भुरटे चोरी होते.

पुणे जिल्ह्यातील सर्वेक्षणादरम्यान बारामतीमधील एका वृद्ध मांग गारुडी  व्यक्तीने त्यांचा अनुभव सांगितला की, ३० वर्षापूर्वी ते चोरी करत असल्या कारणाने एकूण १० वेळा तुरुंगात गेले.  ही चोरी केवळ ऊस, मोसंबी, डाळिंब अशा फळांची होती. आपल्या कुटुंबाच्या उदरर्निर्वाहासाठी  हे गृहस्थ चोरी करत. १५ दिवस तुरुंगात घालवल्यावर त्यांची सुटका होत असे. काही लोक शेतातील कापूस चोरायचे. शेतातील जनावरांची पेंढी चोरून ती शेतकऱ्यांना विकायचे अशी परिस्थिती होती.

## साधन संपत्तीवर मालकी

पुणे जिल्ह्यातील सर्वेक्षणातून असे दिसून आले की, मांग गारुडी समाजाच्या एकूण कुटुंबांमध्ये उच्च उत्पन्न गटातील कुटुंबांमध्ये जमिनीची मालकी असण्याचे प्रमाण सुमारे १२.८० टक्के असून, मध्यम उत्पन्न गटातील कुटुंबांमध्ये हेच प्रमाण ९.७० टक्के तर अल्प उत्पन्न गटातील ४.५० टक्के असल्याचे दिसून येते (तक्ता क्र. ६९). तसेच, या समाजातील कुटुंबांचा उदरनिर्वाहाच्या साधनांपैकी जनावरांची मालकी असण्याचे प्रमाणात फारशी तफावत दिसून येत नाही. तक्ता क्र. ६३ प्रमाणे उच्च आणि मध्यम उत्पन्न गटातील कुटुंबांकडे १५ टक्के जनावरे असण्याचे प्रमाण आहे, तर हेच प्रमाण अल्प उत्पन्न गटात सुमारे १२.१० टक्के आहे.

**तक्ता क्र ६९: उत्पन्न गटनिहाय मालकीची जमीन असण्याचे प्रमाण**

| उत्पन्न गट | मालकीची जमीन | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| उच्च | ३४ | ५ | ३९ |
| | ८७.२०% | १२.८०% | १००.००% |
| मध्यम | १२१ | १३ | १३४ |
| | ९०.३०% | ९.७०% | १००.००% |
| अल्प | १०४३ | ४९ | १०९२ |
| | ९५.५०% | ४.५०% | १००.००% |
| एकूण | ११९८ | ६७ | १२६५ |
| | ९४.७०% | ५.३०% | १००.००% |

**तक्ता क्र. ७०: उत्पन्न गटनिहाय जनावरांची मालकी असण्याचे प्रमाण**

| उत्पन्न गट | जनावरांची मालकी | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| उच्च | ३३ | ६ | ३९ |
| | ८४.६०% | १५.४०% | १००.००% |
| मध्यम | ११३ | २१ | १३४ |
| | ८४.३०% | १५.७०% | १००.००% |
| अल्प | ९६० | १३२ | १०९२ |
| | ८७.९०% | १२.१०% | १००.००% |
| एकूण | ११०६ | १५९ | १२६५ |
| | ८७.४०% | १२.६०% | १००.००% |



*मांग गारुडी वस्ती मधील जनावरे (लोहगाव)*

**तक्ता क्र. ७१ : उत्पन्न गटनिहाय घराची मालकी असण्याचे प्रमाण**

| उत्पन्न | घराची मालकी | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | अतिक्रमित | स्व:चे | भाड्याचे | |
| उच्च | १३ | २१ | ५ | ३९ |
| | ३३.३०% | ५३.८०% | १२.८०% | १००.००% |
| मध्यम | २० | १०२ | १२ | १३४ |
| | १४.९०% | ७६.१०% | ९.००% | १००.००% |
| अल्प | ३३५ | ६७१ | ८६ | १०९२ |
| | ३०.७०% | ६१.४०% | ७.९०% | १००.००% |
| एकूण | ३६८ | ७९४ | १०३ | १२६५ |
| | २९.१०% | ६२.८०% | ८.१०% | १००.००% |



*लोणी काळभोर मधील अतिक्रमित जागेवरील वस्ती*

तक्ता क्र. ७१ नुसार, मध्यम उत्पन्न गटातील सर्वात जास्त प्रमाण ७६.१० टक्के कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीचे घर आहे. त्यानंतर, अल्प उत्पन्न गटातील कुटुंबाकडे ६१.४० टक्के आणि उच्च उत्पन्न गटातील कुटुंबाकडे ५३.८० टक्के मालकीचे प्रमाण आहे. अतिक्रमित जमिनीवर घर असण्याचे प्रमाण उच्च उत्पन्न गटात जास्त म्हणजे ३३.३० टक्के व अल्प उत्पन्न गटात ३०.७० टक्के आहे. भाड्याच्या घरात राहण्याचे प्रमाण सर्वच उत्पन्न गटात थोडे आहे.

**तक्ता क्र . ७२ : उत्पन्न गटनिहाय घरांचे स्वरूपाचे प्रमाण**

| उत्पन्न | घरांचे स्वरूप | | एकूण |
|---|---|---|---|
| | कच्चे | पक्के | |
| उच्च | १९ | २० | ३९ |
| | ४८.७०% | ५१.३०% | १००.००% |
| मध्यम | ४६ | ८८ | १३४ |
| | ३४.३०% | ६५.७०% | १००.००% |
| अल्प | ७२६ | ३६६ | १०९२ |
| | ६६.५०% | ३३.५०% | १००.००% |
| एकूण | ७९१ | ४७४ | १२६५ |
| | ६२.५०% | ३७.५०% | १००.००% |



*मांग गारुडी कुटुंबाचे कच्चे घर (बारामती)*

तक्ता क्र. ७२ नुसार, या समाजातील मध्यम उत्पन्न गटातील ६५.७० टक्के कुटुंबाकडे पक्के घर आहे तर उच्च उत्पन्न गटातील ५१.३० टक्के कुटुंबाकडे पक्के घर आहे. याउलट, अल्प उत्पन्न गटातील कुटुंबाकडे हेच प्रमाण ३३.५० टक्के आहे.

**तक्ता क्र . ७३ : उत्पन्न गटनिहाय रेशन कार्डाचा प्रकार व त्याचे प्रमाण**

| उत्पन्न | रेशन कार्डाचा प्रकार | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | रेशनकार्ड नाही | केशरी | पांढरे | पिवळा | |
| उच्च | ६ | २५ | ६ | २ | ३९ |
| | १५.४०% | ६४.१०% | १५.४०% | ५.१०% | १००.००% |
| मध्यम | ८ | १०४ | १३ | ९ | १३४ |
| | ६.००% | ७७.६०% | ९.७०% | ६.७०% | १००.००% |
| अल्प | १७१ | ७३४ | २० | १६७ | १०९२ |
| | १५.७०% | ६७.२०% | १.८०% | १५.३०% | १००.००% |
| एकूण | १८५ | ८६३ | ३९ | १७८ | १२६५ |
| | १४.६०% | ६८.२०% | ३.१०% | १४.१०% | १००.००% |

वरील तक्ता क्र. ७३ नुसार मध्यम उत्पन्न गटातील कुटुंबाकडे केशरी रंगाचे रेशन कार्ड असण्याचे प्रमाण ७७.६० टक्के असून अल्प व उच्च उत्पन्न गटातील कुटुंबाकडे हेच प्रमाण अनुक्रमे ६७.२०% व ६४.१०% आहे.

यावरून या समाजातील मोठ्या प्रमाणातील लोकांकडे केशरी रंगाचे रेशनकार्ड असल्याचे दिसते. या उलट आमची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असूनही आमच्याकडे पिवळे रेशन कार्ड नसल्याचे दुःख अनेक लोकांनी गटचर्चे दरम्यान व्यक्त केले. अल्प उत्पन्न गटातील केवळ १५.३० % लोकांकडेच पिवळे रेशन कार्ड आहे. वरील तक्त्यात रेशन कार्ड असल्याचे प्रमाण दिसत असले तरी बहुतांशी मांग गारुडी कुटुंबांनी त्यांच्या कुटुंबांमध्ये विवाह झाल्यानंतर पत्नीचे किंवा अपत्यांची नावे रेशनिंग कार्डमध्ये दाखल केलेली नाहीत. मांग गारुडी समाजामध्ये शिक्षणाचा व नाव नोंदविण्याच्या महत्वाबाबत जागृतीचा अभाव आहे, असे चंदवाडी या फुरसुंगी जवळील वस्तीतील लोकांनी सांगितले.

## अनुसूचित जातींसाठीच्या शासकीय योजना आणि त्यांचे लाभ

कुटुंब सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीनुसार, या समाजातील लोकांना शासकीय योजनांचा लाभ काही प्रमाणात मिळालेला दिसत आहे. त्यात प्रामुख्याने रमाई घरकुल व इंदिरा आवास योजना, मोफत शौचालय, शिष्यवृत्ती इ. यांचा समावेश आहे. अण्णाभाऊ साठे विकास महामंडळा अंतर्गत असणाऱ्या योजनेचा सुद्धा लाभ घेतलेला आहे. याउलट, काही लोकांना कोणत्याही योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे दिसत आहे.

**तक्ता क्र . ७४ : विभागनिहाय शासकीय योजनेचा लाभ घेण्याची कारणे व त्यांचे प्रमाण**

| | शासकीय योजनेचा लाभ घेण्याची कारणे | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **विभाग** | **शिक्षण** | **रोजगार आणि उपजीविका** | **घरकुल** | **कोणत्याही योजनेचा लाभ घेतला नाही** | **एकूण** |
| शहरी | १७ | ५१ | ३३ | ४६१ | ५६२ |
| | ३.००% | ९.१०% | ५.९०% | ८२.००% | १००.००% |
| ग्रामिण | ७ | २४ | ८२ | ५९८ | ७११ |
| | १.००% | ३.४०% | ११.५०% | ८४.१०% | १००.००% |
| एकूण | २४ | ७५ | ११५ | १०५९ | १२७३ |
| | १.९०% | ५.९०% | ९.००% | ८३.२०% | १००.००% |



*मांग गारुडी  कुटुंबाला घरकुल योजेनेत मिळालेले घर (थेऊर गाव)*

वरील तक्ता क्र. ७४ नुसार असे दिसते की, ग्रामीण भागातील सुमारे ११.५० टक्के कुटुंबांनी घरकुलाचे लाभ घेतलेले आहेत आणि हेच प्रमाण शिक्षण, रोजगार आणि उपजीविका याबाबतीत कमी दिसून येत आहे. याउलट, शहरी भागात घरकुलाचे लाभ घेण्याचे प्रमाण ५.९० टक्के असून शिक्षण, रोजगार आणि उपजीविका यांचे प्रमाण अनुक्रमे ३ टक्के  व  ९.१० टक्के आहे. याउलट, कोणत्याही योजनेचा लाभ घेतला नाही याचे शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागात जास्त दिसून येते.

**तक्ता क्र. ७५: विभागनिहाय शासकीय योजनेचा लाभ न घेण्याची कारणे व त्यांचे प्रमाण**

| विभाग | शासकीय योजनेचा लाभ न घेण्याची करणे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | योजनेचा लाभ मिळण्यासाठी होणारी दिरंगाई | योजनेची लाभ घेण्यासठी आवश्यक पात्रता नसणे | योजनेचे माहिती नव्हती | योजनेचे लाभ घेण्यासठी आवश्यक असणारी रक्कम न भरता येणे | कागदपत्रांची पूर्तता करण्यात असमर्थता | अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून उदासीनता | लागू नाही | एकूण |
| शहरी | २ | १५ | ३२३ | ३ | १०१ | १३ | ४ | ४६१ |
| | ०.४०% | ३.३०% | ७०.१०% | ०.७०% | २१.९०% | २.८०% | ०.९०% | १००.००% |
| ग्रामिण | ६ | ४ | ४९३ | ९ | ४३ | २४ | १९ | ५९८ |
| | १.००% | ०.७०% | ८२.४०% | १.५०% | ७.२०% | ४.००% | ३.२०% | १००.००% |
| एकूण | ८ | १९ | ८१६ | १२ | १४४ | ३७ | २३ | १०५९ |
| | ०.८०% | १.८०% | ७७.१०% | १.१०% | १३.६०% | ३.५०% | २.२०% | १००.००% |

तक्ता क्र. ७५ नुसार असे दिसते की, ग्रामीण भागात शासकीय योजनांचा लाभ न घेण्याचे प्रमुख कारणांपैकी योजनेची माहिती नसणे हे प्रामुख्याने दिसले. ग्रामीण भागातील सुमारे ८२.४० टक्के कुटुंबांना योजनांची माहिती नव्हती. तर शहरी भागातील ७०.१० टक्के कुटुंबांमध्ये माहिती नसण्याचे प्रमाण दिसून आले. कागदपत्रांची पूर्तता न करण्याचे प्रमाण शहरी भागातील कुटुंबामध्ये २१.९० टक्के तर ग्रामीण भागातील कुटुंबामध्ये ७.२० टक्के होते. योजनेचा लाभ मिळण्यासाठी कागदपत्रांची उपलब्धता महत्वाची असते.

पुणे जिल्ह्यातील मांग गारुडी समाजाच्या लोकांशी गट चर्चा करण्यात आली, त्यामध्ये असे सांगण्यात आले शासकीय योजनाबाबत वेगवेगळे विचार मांडले आहेत. थेऊर येथील लोकांच्या मते, काही वर्षांपूर्वी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे महामंडळाच्या वतीने प्रत्येकी १ लाख असे मांग गारुडी समाजास ५ कोटी रुपयांचे वाटप केले .राज्यात एकूण ५०० लोकांना व्यवसाय करण्यासाठी हे आर्थिक सहाय्य केले गेले .पूर्वी घरकुल मिळाली पण आता आम्हाला घरे मिळत नाही .लोणी काळभोर येथे मांग गारुडी समाजाच्या या वस्तीत राहणाऱ्या ४०-५० लोकांना १९८४-८५ ला घरकुल योजने अंतर्गत खोल्या दिल्या आहेत .पण आज या घरांची अवस्था दयनीय आहे .या घरात रात्री झोपलेला माणूस सकाळी जिवंत उठेल की नाही अशी खात्री नाही या शब्दांमध्ये आपले मत उपस्थित लोकांनी व्यक्त केले. लोणी काळभोर येथील वस्तीमधील कोणत्याच कुटुंबाला शासकीय योजनेचा लाभ मिळाला नाही . १९८४-८५ मध्ये मात्र या लोकांना शासनाने म्हशी पालन

करण्यासाठी दिल्या होत्या. लोहगावातील या समजापर्यंत आजही शासकीय योजना पोहोचल्या नाहीत .जातीच्या दाखल्या अभावी शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही .१९५० चा पुरावा नसल्याने जातीचा दाखला मिळत नाही .आमचे पूर्वापार भटके स्वरूप असल्याने शिक्षण नाही तर मग जातीचा दाखला कसा मिळेल असा त्यांनी प्रश्न केला.

याचे प्रमुख कारण म्हणजे 'माहितीचा अभाव आणि आवश्यक ते कागदपत्रांची उपलब्धता नसणे' हे होय. या सर्वेक्षणातून असेही दिसून येते की, फक्त १३% कुटुंबाकडेच जात प्रमाणपत्र उपलब्ध आहे. सुमारे ८७% कुटुंबाकडे जात प्रमाणपत्र उपलब्ध नाही. साधारणपणे ४४% कुटुंबाकडे ओळखीसाठी आवश्यक असणारी कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. या समाजातील उरलेल्या काही लोकांकडे मतदान कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, शाळा सोडण्याचा दाखला, पॅन कार्ड, रहिवाशी दाखला, मृत्यू दाखला, वीज बिल, टॅक्स पावती, जुने महसूल पुरावे यापैकी एक तरी पुरावा उपलब्ध आहे. जात प्रमाणपत्र मिळविताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. उदा. वडिलांच्या जातीचा व शाळेचा दाखला नसणे, जुने महसुली पुरावे नसणे, शासकीय पुरावे नसणे, १९५० चा कोणताही पुरावा उपलब्ध नसणे इ. अडचणी भेडसावतात. त्यामुळे शैक्षणिक सवलती पासून वंचित राहावे लागते. वेळेवर प्रमाणपत्र मिळत नसल्याने जास्त खर्च करावा लागतो. काहीवेळा प्रसंगी कागदपत्रे विकत घ्यावी लागतात. अशी परिस्थिती असल्याने शासकीय योजनेचा लाभ घेता येत नाही. जातीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करण्याचे या समाजातील संघटना प्रयत्न करतात. असे संघटन एकत्र येऊन शासकीय योजना लोकांपर्यंत पोहचवतात. शिवाय, लोकांचे प्रबोधन करून त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी झटतात. संघटनेकडून शक्य ती कागदपत्रे मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो. संघटनांकडून समाज कार्ये करण्यासाठी लोकांकडून वर्गणी जमा केली जाते. काही वेळा अशी कामे निःशुल्क सुद्धा केली जातात.

प्रकरण ४:

# निष्कर्ष, शिफारशी व मागण्या

## अ) निष्कर्ष

अन्त्रोंलीकर आयोग, थाडे आयोग यांनी मांग गारुडी समाज भटक्या स्वरूपाचा आणि हा समाज स्वातंत्र्य पूर्व काळात गुन्हेगार जमात म्हणून ओळखला जात असल्याचे नोंदविले असले तरीसुद्धा, त्याची नोंद ही महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जातीत झालेली आहे. कारण त्यांना अस्पृश्यतेची वागणूक दिली जात होती. आणि सामाजिक अस्पृश्यतेच्या निकषाच्या आधारावर अनुसुचित जातींत समावेश होतो. या जातीचा व्यवसाय, रोटी-बेटी व्यवहार पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातींशी साम्य दाखवतो . रामनाथ चव्हाण (२००४) यांनी भटक्या-विमुक्त जातींच्या जात पंचायतींचा अभ्यास केला आहे, त्यात त्यांनी मांग गारुडी समाजाचे मांग जातीशी साधर्म्य असल्याचे दाखविले आहे. परंतु वस्तूस्थिती तशी नाही. मांग-गारुडी ही मांग जातीतीलच एक पोट-जात नसावी. कारण, नावावरून साम्य वाटत असले तरी या दोन्ही जाती भिन्न असल्याने अनुसूचित जातीच्या यादीत भिन्न क्रमांकावर (उदा. मांग अनु. क्र. ४६ तर मांग गारोडी अनु. क्र. ४७) आहेत. मांग गारुडी ही गुन्हेगार जमात म्हणून ओळखली जात. मांग जातीबरोबर तिचा नामातील सांधर्म्यामुळे संबंध दिसत असला तरीही त्यांच्यात सामाजिक सांस्कृतिकदृष्ट्या भिन्नता आहे. तसेच, 'म्हशी भादरणे' हा त्यांचा पारंपारिक व्यवसाय आहे. तसेच, वेळोवेळी घेतलेल्या शासकीय निर्णयानुसार, मागासवर्गीय वर्गवारी करताना मांग गारुडी या जातीची यादीमधील नोंद भिन्न क्रमांकावर करण्यात आली आहे. उदा. दि. २९ मे १९३३ च्या शासकीय निर्णयानुसार, यादीमधील नोंद भिन्न क्रमांक (उदा. अनु. क्र. ३०), दि. १ नोव्हेंबर १९५० रोजीच्या शासकीय निर्णयानुसार भिन्न क्रमांक (उदा. अनु. क्र. २४) आणि दि. २९ ऑक्टोबर १९५६ रोजी भिन्न क्रमांकावर (उदा. अनु. क्र. १७) यांवर करण्यात आली आहे. इदाते अभ्यास समिती (१९९९) यांनी मांग गारुडी जात ही भटक्या जमातीमध्ये समाविष्ट नसल्याने त्यांचा अभ्यासात समावेश केला नव्हता. या समाजाचे पूर्वीचे भटके स्वरूप राहिले नसून मागील ६० वर्षापेक्षा जास्त कालावधीमध्ये ते स्थायिक झालेले आहेत, त्याचे प्रमाण वाढलेले आहे. हा समाज हिंदू धर्मीय असून 'पारोशी' किंवा 'शिबारी' ह्या त्यांच्या बोलीभाषा आहेत. परंतु त्यांचे ग्रामीण भागात बोलण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यांच्यामध्ये, सकट, लोंढे, कांबळे, राखपसरे, उफाडे, देडे, भाले, कसबे, हातागळे, फासगे,

नाडे, शेंडे, गायकवाड, सोनावणे, पाथरकर, अवचर (अवचट), अल्हाट, सोनावणे, लांडगे, उपाध्ये, काळे, खलसे, बोडखे, राक्षे, भिसे, झेंडे, साने, उमप, खंदारे, माले, चव्हाण, घोडगे, ढालवाले, अवचरे, शिंदे, थोरात इ. आडनावे आहेत. मांग गारुडी समाजात १२ कुळे महत्वाची मानली जातात. प्रत्येक कुळाचे समाजात विशिष्ट स्थान आहे. वर नोंदविलेली आडनावे नामसदृश स्वरुपात इतर जातींमध्ये सुद्धा अस्तित्वात आहेत तेव्हा, ते मांग गारुडी म्हणून फायदा घेण्याचे नाकारता येत नाही.

त्यामुळे, मांग गारुडी समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक वैशिष्ट्ये आणि वेगळेपण नोंदविणे आवश्यक आहे. मांग गारुडी कुटुंबाचे कुलदैवत म्हणून म्हसोबा, महालक्ष्मी, खंडोबा, मरीआई, काळूआई, तुळजापूरची लक्ष्मीआई, खंडोबा, मरीआई, काळूआई, महालक्ष्मीआई, फिरस्तीआई, वर्खेडाचीआई, नरसोबा, येडूआई, नवदुर्गा, यलाम्मा इ. आहेत. त्याचबरोबर, समाजात बाळ जन्माला आल्यानंतर पाचवी व बारावी हे विधी केले जातात. बाळाच्या जन्माआधी केले जाणारे विधी कमी प्रमाणात आहेत. पूर्वी मृत शरीराचा अंत्य विधी हा दफन केला जात असे. अलीकडे, हा विधी दहन पद्धतीने केला जातो. दशक्रिया विधी हा सातव्या दिवशी केला जातो. शिवाय, त्यांच्या सर्व कुटुंबांमध्ये मांसाहार करण्याचे प्रमाण दिसून येते. जोगवा मागण्याची आणि परडी मिरविण्याची प्रथा या समाजात काही प्रमाणात आहे आणि बाबा-बुआ, भगत यांना मानण्याचे प्रमाण सुद्धा विशेष उल्लेखनीय आहे. हे दोन्ही प्रमाण ग्रामीण भागात शहरी भागापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर, ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात धार्मिक विधी पूर्ण कण्यासाठी पशूबळी देण्याचे प्रमाण सुद्धा जास्त आहे. तसेच, जादूटोणा करणे, अंगात येणे, यासारख्या अंधश्रद्धा काही प्रमाणात आजही समाजात दिसून येतात. सूर्य आणि चंद्र ग्रहणाच्या वेळी ग्रहण मागण्याचे प्रमाण ग्रामीण भागात ५० टक्के आहे. मांग-गारुडी समाजातील पुरुष भारदस्त देहाचे असल्याने कच्छा, चड्डी आणि खांद्यावर उपरणे असा पेहराव असायचा. परंतु, हा पोशाख आधुनिक काळात कालबाह्य झालेला दिसत आहे. मांग गारुडी समाजात वधूला वराने हुंडा देण्याची प्रथा होती. ती आजही ग्रामीण आणि शहारी भागात थोड्याधिक प्रमाणात कायम असल्याचे दिसते. पण, मुलींचा विवाह हा वयाच्या १८ व्या वर्षांच्या आतच केला जातो. त्यासाठी पत्रिका जुळविण्याचे प्रमाण सुद्धा जास्त असल्याचे दिसत आहे. घटस्फोटीत, विधवांना पुर्नविवाहाची परवानगी नसण्याचे प्रमाण ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात जास्त आहे. शिवाय, महिलांना घटस्फोटानंतर कुटुंबामध्ये पोटगी न देण्याचे प्रमाण ग्रामीण भागात ९८% व

शहरी भागात ९१% आहे. देवदासी किंवा मुरलीची प्रथा समाजात कमी प्रमाणत दिसून आली. त्याउलट, महिलांना जटा असण्याचे प्रमाण ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात (५३% आणि ४१%) दिसून आले. प्रथम मासिक पाळी आल्यानंतर धार्मिक विधी साजरा करण्याचे प्रमाण शहरी आणि ग्रामीण भागात सारख्याच (सुमारे ८३ टक्के) प्रमाणात दिसून आले. घरातील बायकांना मासिक पाळी आल्यावर बाजूला बसविण्याचे प्रमाण ग्रामीण आणि शहरी भागात अधिक (९३% आणि ८४%) दिसून येते. शिवाय, महिला बाळंत झाल्यावर काही काळासाठी त्यांना दूर ठेवण्यात येते, याचे प्रमाण ग्रामीण आणि शहरी भागात सारखेच असल्याचे दिसत आहे.

सर्वेक्षणातून असे दिसले की, मांग गारुडी समाजाचे लोक इतर समाजाच्या समारंभात सहभागी होत असतात, परंतु, त्यांना भेदभावाचा सामना करावा लागतो. त्याचे प्रमाण ग्रामीण भागात अधिक आहे. तसेच, जात पंचायतींमार्फत पितृसत्ताकता पद्धती पाळली जाते. घटस्फोट, जातींचे तंटे-बखेडे हे जात पंचायातीमार्फत सोडविले जातात. तसेच, जात पंचायतीमार्फत शिक्षाही केली जाते. शहरी भागात सुमारे ४६.२० टक्के कुटुंबाचे कौटुंबिक तंटा जात पंचायतीकडून सोडविण्याचे प्रमाण आहे. तसेच, ग्रामीण भागात कुटुंबांच्या विवाहासंबधीच्या अडचणी सोडविण्याचे प्रमाण ७१.३० टक्के आहे. त्यासाठी जातीतील लोकांना शिक्षा देण्यासाठी जास्तीत जास्त ‘समज देणे’ ह्या प्रकारचा अवलंब जात पंचायत करत असल्याचे दिसते.

अलीकडील काळात या समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढत असल्याचे जाणवते. शहरी भागातील कुटुंबांमध्ये अशिक्षितांचे प्रमाण सुमारे १३ टक्के असून ग्रामीण भागात हे प्रमाण १० टक्के आहे. ग्रामीण भागामध्ये सुमारे २४ टक्के कुटुंबांकडे शैक्षणिक कागदपत्रांची उपलब्धता असते. याउलट, शहरी भागात हे प्रमाण सुमारे १६ टक्के आहे. त्यामुळे त्याचा परिणाम  त्यांच्या विकासावर साहजिकच होत आहे, असे म्हणावे लागेल. जात प्रमाणपत्र आणि त्याची पडताळणी नसणे ह्या प्रमुख समस्या या समाजापुढे आहेत. ग्रामीण भागातील सुमारे ६९.२० टक्के कुटुंबाकडे जातीचे प्रमाणपत्र उपलब्ध नाही. तर हेच प्रमाण शहरी भागासाठी ४४.८० टक्के आहे. मात्र, जात प्रमाणपत्र पडताळणी केलेल्या कुटुंबांचे प्रमाण ग्रामीण भागासाठी ९६.९०% तर शहरी भागासाठी ९३.८० % आहे. शासकीय कामकाजासाठी अशा कागदपत्रांची आवश्यकता लक्षात घेऊन या समाजातील काही संघटना असे दस्तावेज लोकांना कसे उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न करतात. परंतु, असे प्रयत्न करण्याचे प्रमाण ग्रामीण आणि शहरी भागात अत्यल्प आहे.

आरोग्याच्या बाबतीत ग्रामीण भागात ६९.९०% तर शहरी भागात ९१.८० % मांग गारुडी कुटुंबे आजारी पडल्यावर दवाखान्यात उपचार घेतात. ग्रामीण भागात अजूनही २८.३०% कुटुंबे आजारपणात बाबा भगत जाताना दिसत आहे. या समाजातील कुटुंबांमध्ये ग्रामीण आणि शहरी भागातील कुटुंबांमधील सदस्यांमध्ये दीर्घकालीन आजार असण्याचे प्रमाण जवळजवळ सारखेच (१०%) आहे. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात पाण्याच्या सुविधेचा अभाव दिसून येत आहे. ग्रामीण भागातील ५१.१०% कुटुंबांना पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. तर शहरी भागात २२.१० % कुटुंबाना पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. तसेच, त्यांना अस्वच्छतेचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागात ६८.५०% कुटुंबांना सांडपाण्याची सुविधा उपलब्ध नाही. तर हेच प्रमाण शहरी भागात सुमारे ५० % असल्याचे दिसते. ग्रामीण भागात अजूनही ६६.९० % कुटुंबे उघड्यावर शौचालयास जातात. शहरी भागात ४६.१०% कुटुंबांना ही सुविधा उपलब्ध नाही. शहरी भागातील ७६.५० % कुटुंबांकडे वीज सुविधा आहे. तर ग्रामीण भागातील ५६.७०% कुटुंबांकडे विजेची सुविधा आहे. शहरी भागातील ७१.४०% कुटुंबांना वाहतूक व्यवस्था उपलब्ध आहे. तर ग्रामीण भागातील ५१.१० % कुटुंबांना ही सुविधा आहे. ग्रामीण भागात निम्म्या पेक्षा जास्त म्हणजे ५८.८०% कुटुंबे पक्क्या रस्त्याच्या सुविधे पासून वंचित आहेत. ग्रामीण भागातील ८३.५०% कुटुंबांना तर शहरी भागातील ८४.९०% कुटुंबांना घराजवळ दवाखाना उपलब्ध आहे. शहरी भागात मांग गारुडी कुटुंबांकडे आधार कार्ड असण्याचे प्रमाण सुमारे ९१ टक्के असून ग्रामीण भागात तेच प्रमाण ८९ टक्के आहे.

आजही काही प्रमाणात मांग गारुडी समाजातील काही कुटुंब 'म्हशी भादरणे' हा व्यवसाय करत आहेत असे दिसले. अल्प उत्पन्न गटातील कुटुंबामध्ये इतर उत्पन्न गटातील कुटुंबांपेक्षा हे प्रमाण तुलनेने अधिक आहे. तसेच, साधनसंपत्तीवर मालकी सुद्धा या गटाची कमी प्रमाणात दिसून आली. थोड्या प्रमाणात ग्रामीण भागातील कुटुंबांना घरकुल योजनेचे लाभ मिळालेले दिसून आले आणि शहरी भागातील कुटुंबांना रोजगार आणि उपजीविकेचे लाभ मिळालेचे दिसले. अनुसूचित जातींसाठी असणाऱ्या कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ न घेण्याचे प्रमाण ग्रामीण व शहरी भागातील कुटुंबासाठी सारखेच दिसून आले. योजनेची माहिती नसल्याने लाभ घेता येत नाही अशी परिस्थिती आहे.

## ब) शिफारशी

यावरून मांग गारुडी समाजाच्या जात प्रमाणपत्र व प्रमाणपत्र पडताळणी यांतील अडचणी दूर होण्याकरिता आणि या समाजाच्या सामाजिक-आर्थिक उन्नती आणि विकासासाठी पुढील शिफारशी प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१. धार्मिक विधीसाठी पशुबळी देणे, पोतराज प्रथा, जोगवा मागणे, समजातील स्त्रीयांना मुरळी, देवदासी म्हणून देवाला सोडणे इ. प्रथेला प्रतिबंध करणे आणि त्यापासून या समाजाला परावृत्त करण्यासाठी या समाजाचे रचनात्मक व प्रबोधानात्मक कार्यक्रम घेणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात या प्रथा-परंपरा यांचे पालन करण्याचे प्रमाण अधिक असल्याने त्या परिक्षेत्रात अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

२. वीज, पाणी, आरोग्य इ. सारख्या मुलभूत सोयी-सुविधा या समाजातील कुटुंबांना मिळणे गरजेचे आहे. पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात शौचालया व सांडपाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने त्याचे आरोग्यास हानी पोहचण्याची शक्यता आहे, असे निदर्शनास आले. तेव्हा, वीज, रस्ते, पाणी, सांडपाण्याची सुविधा, शौचालय इ. प्राधान्याने उपलब्ध कारण देण्यासाठी शासकीय स्तरावरून प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यासाठी पंचायत राज संस्थांनी संबधित क्षेत्रात अशा योजना राबविल्या पाहिजेत.

३. मांग गारुडी समाजातील कुटुंबांना जातीचे दाखले आणि जात प्रमाणपत्र पडताळणीचे दाखले मिळविताना अनेक अडचणी येत असल्याने उदा. १० ऑगस्ट १९५० सालाचा पूर्वीचा राह्वाशी पुरावा सदर करणे. परंतु, शैक्षणिक व इतर मागासलेपणामुळे अशाप्रकारचे पुरावे उपलब्ध करून देण्यात या समाजाला अडचणी उद्भवतात. दक्षता पथकाला क्षेत्रीय भेटी देऊन अहवाल सादर करताना खरे मांग गारुडी ओळखण्यासाठी या अहवालातील त्यांच्या जात वैशिष्ट्यांचा आधार घेता येऊ शकतो. तेव्हा, असे जात प्रमाणपत्र पडताळणी दाखले अदा करण्यासाठी काही अटी शिथिल करण्यास हरकत नसावी.

४. अनुसूचित जातींसाठी असणाऱ्या कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ न घेतल्यामुळे या समाजाच्या मागासलेपणात भर पडलेली असल्या कारणाने या समाजातील लोकांना अनुसूचित जातीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेमध्ये उदा. घरकुल योजना, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळच्या विविध योजना, उपजीविकेसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्य विकासाच्या विविध

योजना इ. मध्ये प्राधन्याने लाभ देण्यात यावेत. शिवाय, अशा योजनांची माहिती या समाजापर्यंत पोहचवण्यासाठी विस्तृत प्रचार आणि प्रसाराचा कार्यक्रम बार्टीच्या वतीने तयार करून राबविण्यात यावा. त्यासाठी काही संघटना व स्वयंसेवी संस्थांची आणि सामाजिक जबाबदारीतून काम करणारे उद्योग समूह (उदा. CSR) यांची सुद्धा मदत घेणे शक्य आहे. तसेच, बार्टीमार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकासाच्या कार्यक्रमात व स्पर्धा परीक्षा या समाजातील लोकांना प्राधान्याने निवडण्यात यावे. जेणे करून या समाजाला अधिकाधिक रोजगार आणि उपजीविकेच्या संधी उपलब्ध होतील.

५. मांग गारुडी हे राज्याच्या अनुसूचित जातींच्या यादी क्र. ४७ वर देण्यात आली असून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये या समाजाच्या विकासासाठी तरतुदी करण्यात येतात. तेव्हा या समाजाच्या विकासासाठी लोकसंखेच्या प्रमाणात तरतुदी करून त्यांना लाभ देण्यात यावेत.

६. या समाजातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला शैक्षणिक अडीअडचणीं येऊ नयेत यासाठी त्यांना शासकीय वस्तीगृहात आणि शैक्षणिक संस्थामध्ये प्राधन्याने प्रवेश, विद्यावेतन आणि आवश्यक शैक्षणिक सहाय्य दिले जावेत.

७. संबंधित शासकीय विभागातील विविध स्तरावरील अधिकारी आणि कर्मचारी जे अंमलबजावणी साठी जबाबदार आहेत, असे अधिकारी व कर्मचारी यांना वेळोवेळी योग्य प्रशिक्षण देऊन त्यांचे क्षमतावर्धन करण्याचा कार्यक्रम आखण्यात यावा.

८. या समाजाच्या कालबद्ध उन्नती आणि विकासासाठी परिपूर्ण आराखडा तयार करून त्याचे संनियंत्रण, अंमलबजावणी आणि मूल्यमापन व्यवस्था निर्माण करून त्यांचा सातत्याने आढावा घेण्यात यावा.

९. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर मांग गारुडी समाजाचा किमान एक प्रतिनिधीची नेमणूक करण्यात यावी.

१०. शासनाच्या स्तरावर मांग गारुडी समाजाला योग्य प्रमाणात लाभ पोहचवण्यासाठी क्रांतिवीर लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या धर्तीवर या समाजासाठी आयोग नेमण्यात यावा.

११. जात प्रमाणपत्र सबळ पुराव्याअभावी देण्यात येत नाही त्यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी, विभागीय अधिकारी आणि उप-विभागीय अधिकारी यांची संयुक्त समिती स्थापून शिबिराद्वारे जातीचे दाखले देण्यात यावेत.

१२. सामाजिक न्याय विभागामार्फत वैयक्तिक लाभाच्या योजनेचा उदा. घरकुल, प्रशिक्षण, रोजगारासाठी अर्थसहाय्य इ. प्राधान्याने मांग गारुडी समाजाला मिळाव्यात.

१३. मांग गारुडी समाजाचे वास्तव्य असणाऱ्या अतिक्रमित जमिनीवर शासकीय नियमाप्रमाणे घरकुल योजना राबविण्यास प्राधान्य देण्यात यावे.

१४.बार्टी मार्फत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमात सुद्धा या समाजातील लोकांना प्राधान्य देण्यात यावे.

**क) मागण्या:**

मांग गारुडी समाजाच्या प्रतिनिधींसोबत एकदिवसीय-चर्चासत्र घेण्यात आले होते. त्यामध्ये झालेल्या चर्चेनंतर मांग गारुडी समाज युवक संघ, महाराष्ट्र राज्य, या संघटनेने प्रारूप अहवालामध्ये सुधारणा करून आणखीन काही शिफारशींचा समावेश अहवालात करावा अशी मागणी केली आहे. त्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. मांग गारुडी ही जात अनुसूचित जातीतील अतिशय मागासलेली जात आहे. शिवाय ती भटकी जमात आहे. आणि पारंपरिक व गुन्हेगारीच्या प्रवृत्तीच्या व्यवसायात असल्याने ह्या समाजाची प्रगती होऊ शकली नाही. म्हणून त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी शासकीय, निमशासकीय, रेल्वे आणि खाजगी कारखाण्यांमध्ये नोकरी देण्यासाठी आरक्षणाचे प्रमाण देण्यात यावे.

२. या समाजातील लोकांच्या निवास व्यवस्थेसंबधी ग्रामीण भागात शेती करणा-या व्यक्तीस 3 गुंठे जागा व शेती न करणा-या कुटूंबास दीड गुंठा जागा झोपडी बांधण्यासाठी देण्यात यावी तसेच त्यांच्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापण करण्यात येऊन त्यांना जमीनी उपलब्ध करुन देण्यात यावी.

३. या समाजाच्या शैक्षणिक,अर्थिक,सामाजिक विकासासाठी या समाजातील लोकांचे योग्य ते पुनर्वसन होण्यासाठी जिल्हा स्तरावर शासकिय यंत्रणा उभारण्यात यावी. याखेरीज या समाजाच्या विकासासाठी काम करणा-या स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देण्यात यावे.

४. या जातीला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारतीय संविधानाच्या कलम १६(३), १६(४), १६ (४अ) प्रमाणे थेट पदभरती करुन घेण्यात यावी. त्यामध्ये या समाजातील लोकांना प्राधान्याने निवडण्यात यावे, जेणेकरून या समाजाला अधिकाधिक स्थिर रोजगार आणि उपजीविकेच्या समान संधी उपलब्ध होतील.

५. मांग गारुडी हा समाज आर्थिक, शैक्षणिक बाबतीत दुर्बल घटक असल्याने शिवाय ही जमात अनुसूचीत जातीमधील अतिशय मागासलेली असल्याने महाराष्ट्र राज्याच्या विधी आयोगाच्या योजनांमार्फत गाय, म्हशी, शेळ्या, मेंढ्या यांच्यासाठी व गोठा बांधण्यासाठी ७५% निधी उपलब्ध करुन दिला जातो. तो वाढवून १००% एवढा उपलब्ध करुन देण्यात यावा.

६. महाराष्ट्रामध्ये मांग गारुडी समाजाच्या दफन विधीसाठी कोठेही जागा उपलब्ध करुन दिलेली नाही व दफनभूमी नाही म्हणून सर्व मा. जिल्हाधिकारी यांना जिल्हा, तालुका, गाव येथे दफनभूमीसाठी जमीन उपलब्ध करुन देण्यात यावी.

# संदर्भ सूची


Enthoven, R. E. *The Tribes and castes of Bombay Vol.1.* New Delhi: Asian Educational Services, 1990.

L.B.Thade. *Officer on special duty for unification of list of Vimukta Jatis and Nomadic and Semi-Nomadic Tribes (Annexure 32).*

Russell R.V. and Hiralal. *The Tribes and Castes of the Central Provinces of India Vol. IV.* New Delhi: Asian Education Services, 1993.

Singh, K.S. *The Scheduled Caste Vol.II 1993 (Page No. 900).* London: Oxford University press, 1993.

*O.H.B. Starte, Report of the Depressed Classes and Aboriginal Tribes Committee, Bombay Presidency, 1930.*

*G.S. Ghurye, Caste and Race in India, Popular Prakashan, Mumbai, 2008.*

*Antrolikar, Report of The Ex-Criminal Tribes Rehabilitation Committee*

*Brochure Containing the List of Schedule Castes, Schedule Tribes, Vimukt Jati/Nomadic Tribes and other backward Classes,1986, Bombay Castle- 29th May 1933*

*Web site : Government of Maharashtra, Bombay Hight Court dated on 13the April 2016.*

भारतीय संस्कृती कोश, सातवा खंड, मराठी भाषा व साहित्य ते राजस्थान, १९९५.

महाराष्ट्र शासन, पुणे जिल्हाआर्थिक व सामाजिक समालोचन २०१३, अर्थ व सांखिकी संचालनालय २०१३.

महाराष्ट्र शासन, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-२०१५, अर्थ व सांखिकी संचालनालय २०१५.

मुटाटकर समितीच्या शिफारसीवरील अहवाल, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग.

भि. रा. इदाते, विमुक्त व भटक्या जमाती अभ्यास व संशोधन समिती, खंड १, महाराष्ट्र शासन (समाज कल्याण विभाग) १९९९.

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:- संकीर्ण-२००८/यादी /प्र.क्र. ५५३/मावक-५
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.**
फोन नं. २२०२९५२६ फॅक्स २२८३६६८८
दिनांक :- २६ सप्टेंबर , २००८.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,(महसूल) ,
सर्व जिल्हाधिकारी , सर्व जिल्हे,
सर्व उपजिल्हाधिकारी, सर्व जिल्हे,
सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व जिल्हे ,
सर्व सदस्य सचिव , विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती ,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,

**विषय :- महाराष्ट्र राज्याची अनुसूचित जाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाची यादी**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाची दिनांक २५ जुन, २००८ रोजी यादी अद्ययावत करण्यात आली असून ती जाती प्रमाणपत्र देणा-या व त्याची पडताळणी करणा-या सक्षम प्राधिका-यांना तसेच मागासवर्गीयाचे लाभ लागू करताना सदरहू यादीचा उपयोग व्हावा याकरीता सुलभ संदर्भासाठी जाती जमातींचे एकत्रित संकलन स्वरुपात यादी असून ती यादी शासनाच्या खालील नमूद संकेतस्थळावर ठेवण्यात आली आहे.

२. वरील यादी ही संकलन स्वरुपात असुन मागासवर्गीय जाती जमातीच्या निश्चितीसाठी तसेच त्या त्या मागासप्रवर्गाचे लाभ लागू करताना सदर जाती जमाती ज्या राष्ट्रपतींच्या आदेशान्वये वा शासन निर्णय वा आदेशाव्दारे त्यांचा समावेश केलेला आहे ते आदेश ग्राह्य धरण्यात यावे.

३. सदर यादी महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर टाकण्यात आली असून त्याचा संकेताक क्रमांक **२००८०९२६१४४३०५००१** असा आहे. सदर यादी सर्व जनतेसाठी खुली असून सदरहू वेबसाईट वरुन तीचे अवलोकन करावे वा प्रत प्राप्त करुन घ्यावी.

**(एन . आरुमुगम )**
सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत :-
सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ यांना विनंती की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व आस्थापनांना वरील यादी पृष्ठांकीत करावी.

# महाराष्ट्रातील मागासवर्गीयांची यादी

## अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) कायदा 1976 ( 1976 चा 108 वा ) मधील परिशिष्ट 1 मधील भाग-10 मध्ये नमूद केल्याप्रमाणे

## अनुसूचित जाती (आरक्षण 13 %)

| | |
|---|---|
| 1) अगेर | 25)हलसार, हसलार, हुलसवार, हुलसवार |
| 2) अनमुक | 26)होलार, व्हलार |
| 3) आरेमाला | 27)होलय, होलेर, होलेया, होलिया |
| 4) आरवा माला | 28) कैकाडी ( अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजूरा तालुका सोडून चंद्रपूर जिल्हा यांत ) |
| 5) बहना, बहाना | 29) कटिया, पथरिया |
| 6) बाकड, बंट | 30) खंगार, कनेरा, मिरधा |
| 7) बलाही, बलाई | 31) खाटिक, चिकवा, चिकवी |
| 8) बसोर, बुरुड, बांसोर, बांसोडी | 32) कोलूपूल-वंडलु |
| 9) बेडाजंगम, बुडगा जंगम | 33) कोरी |
| 10) बेडर | 34) लिंगडेर |
| 11) भांबी, भांभी, असादरु, असोदी, चामडिया, चमार, चमारी, चांभार, चमगार, हरळय्या, हराळी, खालपा, माचीगार, मोचीगार, मादर, मादिग, मोची, तेलगू मोची, कामाटी मोची, राणीगार, रोहिदास, नोना, रामनामी, रोहित, समगार, सतनामी, सूरज्यबंशी, सूरज्यरामनामी | 35) मादगी |
| 12) भंगी, मेहतर, ओलगाना, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, बाल्मिकी, करोर, झाडगल्ली | 36) मादिगा |
| 13) बिंदला | 37) महार, मेहरा, तराळ, धेगू-मेगू |
| 14) ब्यागारा | 38) माहयावंशी, धेड, वणकर, मारु-वणकर |
| 15) चलवादी, चन्नया | 39) माला |
| 16) चेन्नदासर, होलया दासर, होलेया दसारी | 40) माला दासरी |
| 17) डक्कल, डोक्कलवार | 41) माला हन्नाई |
| 18) ढोर, कक्कय्या, कंकय्या, डोहोर | 42) माला जंगम |
| 19) डोम, डुमार | 43) माला मस्ती |
| 20) येल्लमलवार, येल्लमलवंडलु | 44) माला साले, नेटकानी |
| 21) गंडा, गंडी | 45) माला सन्यासी |
| 22) गरोडा, गारो | 46) मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग |
| 23)घासी, घासीया | 47) मांग-गारोडी, मांग-गारुडी |
| 24)हल्लीर | 48) मन्ने |

| | |
|---|---|
| **49)मस्ती** | **55)सांसी** |
| **50)मेंघवाल, मेंघवार** | **56)शेणवा, चेणवा, सेडमा, रावत** |
| **51)मिठा, अयलवार** | **57)सिंधोल्लू, चिंदोल्लू** |
| **52)मुक्री** | **58)तिरगार, तिरबंदा** |
| **53)नाडिया, हादी** | **59)तुरी** |
| **54)पासी** | |

# विमुक्त जाती -अ (V.J.)
## आरक्षण ( 3 %)

| अ.क्र. | जाती | तत्सम |
|---|---|---|
| 1 | बेरड | 1) अ) ** , ब) नाईकवाडी , क) तलवार, ड) वाल्मिकी |
| 2 | बेस्तर | 2) संचलू वड्डार |
| 3 | भामटा | 3) अ) भामटी , ब) गिरणी वड्डार, क) कामाटी , ड) पाथरुट इ) टकारी ( मुस्लिम धर्मीयांसह) , फ) उचले, ग) घंटीचोर |
| 4 | कैकाडी ( मुंबई, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, अहमदनगर, सातारा,सांगली, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद,बीड, परभणी, उस्मानाबाद, नांदेड, जिल्हे व चंद्रपूर जिल्हयातील राजूरा तालुका यात) | 4) अ) धोंतले ब) कोरवा क) माकडवाले किंवा कोंचीकोरवा ड) पामलोर इ) कोरवी |
| 5 | कंजारभाट | 5) अ) छारा , ब) कंजार , क) नात |
| 6 | कटाबू | - |
| 7 | बंजारा | 7) अ) गोर बंजारा , ब) लंबाडा / लंबारा , क) लंभाणी ड) चरण बंजारा, इ) लभाण , फ) मथुरा लभाण ग ) कचकीवाले बंजारा , ह) लमान बंजारा इ) लमाण / लमाणी , ज) लबान , क) *** , ल) धाली / धालीया , ग) धाडी / धारी , न) सिंगारी व) नावी बंजारा, प) जोगी बंजारा , क्यु) ** , र) ** स) बंजारी |
| 8 | *** | पाल पारधी |
| 9 | राज पारधी | अ) *** , ब) गाव पारधी , क) हरण शिकारी , ड) ** |
| 10 | राजपूत भामटा | अ) परदेशी भामटा, ब) परदेशी भामटी |
| 11 | रामोशी | - |
| 12 | वडार | अ) गाडी वड्डर, ब) जाती वड्डर, क) माती वड्डर ड) पाथरवट , इ) संगतराश / दगडफोडू , ई) वड्डुर |
| 13 | वाघरी | अ) सलात , ब) सलात वाघरी |
| 14 | छप्परबंद ( मुस्लिम धर्मीयासह ) | |

## भटक्या जमाती - ब (N.T.-B)

## ( आरक्षण 2.5 %)

| अ.क्र. | जाती | तत्सम |
|---|---|---|
| 1 | गोसावी | 1) बावा 2) बैरागी 3) भारती 4) गिरी गोसावी 5) भारती गोसावी 6) सरस्वती पर्वत 7) सागर 8) बान किंवा वान 9) तीर्थ आश्रम 10) अरण्य घरभारी 11) संन्यासी 12) नाथपंथी गोसावी 13) पुरी |
| 2 | बेलदार | ओड, मुस्लीम बेलदार , बेलदार कापेवार , बेलदार मुन्नर-कापेवार, बेलदार मुन्नर कापु, बेलदार तेलंगा, बेलदार तेलगी , बेलदार-पेंटरेडडी , बेलदार बुकेकरी |
| 3 | भराडी | अ) बाळ संतोशी ब) किंगरीवाले क) नाथबावा ड) नाथ जोगी, गारपगारी इ ) नाथपंथी डवरी गोसावी ई) नाथ, जोगी, नाथपंथी उ) डवरी |
| 4 | भुते | भोपे |
| 5 | ** | ------ |
| 6 | चित्रकथी | ------ |
| 7 | गारुडी | सापगारुडी (मुस्लीम धर्मियांसह ) |
| 8 | लोहार | घिसाडी, घिसाडी लोहार किंवा गाडी लोहार किंवा चितोडी लोहार, रजपूत लोहार, पांचाळ लोहार, खाती, खातवाढी, जिनगर, चितोडीया-लोहार |
| 9 | गोल्ला | गोल्लेवार, गोलेर, गोलकर |
| 10 | गोंधळी | --- |
| 11 | गोपाल | अ) गोपाल भोरपी ब) खेळकरी |
| 12 | हेळवे | 12) हिलव |
| 13 | जोशी | अ) बुडबुडकी , ब) डमरुवाले, क) कुडमुडे, ड) मेंढगी ,इ) सरोदे, सरोदी , फ) सहदेव जोशी, म) सरवदे, ह) सरोदा |
| 14 | काशी कापडी | ---- |
| 15 | कोल्हाटी | डोंबारी |
| 16 | मैराळ | अ) दांगट , ब) वीर |
| 17 | मसनजोगी | 1) सुदगडसिध्द , 2) मपनजोशी, 3) शारदाकार /शार्दाकार/शारदाकाळ/बालासंतु |
| 18 | नंदीवाले | तिरमल |
| 19 | पांगूळ | --- |
| 20 | रावळ | राऊळ किंवा रावळयोगी |
| 21 | सिक्कलगर | कटारी, सेक्क्लगर (मुस्लीम धर्मिय), शिख-शिकलीगार, शिख-शिकलीकर, कातारी शिकलगार, मुस्लिम शिकलगार, शिकलीगार, शिकलीगर, शिकलगार, शिकीलगर, शिकलकर, शिकलीकर, शिकलकरी, सिकलकर, सिकलीकर, सिकीलगर, सिकीलकर, सिकलीघर, सिक्कलकर, सिकलीगर, सिकलगर, सिक्कलीगर, सायकलगर, सैकलकर, सैकलगर |
| 22 | वगळले | --- |
| 23 | वैदू | --- |

| | | |
|---|---|---|
| 24 | वासुदेव | ---- |
| 25 | भोई | 1) झिंगा भोई 2) परदेशी भोई 3) राजभोई 4) भोई 5) कहार 6) गोडिया कहार 7) धुरिया कहार 8) किरात 9) मछुआ 10) मांझी 11) जातिया 12) केवट 13) ढीवर 14) धीवर 15) धीमर 16) पालेवार 17) मछेंद्र 18) नावाडी ,भोई नावाडी , तारु-नावाडी 19) मल्हार 20) मल्हाव 21) बोई 22) गाढव भोई 23) खाडी भोई 24) खारे भोई 25) ढेवरा 26) भनारा, भनारी, भनारे |
| 26 | बहुरुपी | अ) बोहरशी, ब) बहुरुपिया , क) भोरपी , ड) रायरंध्र, इ) अय्यार व अय्यारी |
| 27 | ठेलारी ( धुळे, नासिक, जळगाव, व औरंगाबाद जिल्हयात ) | - |
| 28 | ओतारी | अ) ओतनकर, ब) ओतकर , क) वतारी, ड) ओझारी इ) वतकर, वतकरी, वतनकर, वतोकर, ओतकरी, ओतोकारइ) वतोकार |

**भटक्या जमाती क ( N.T.-C)**

**(आरक्षण ३.५ %)**

| | | |
|---|---|---|
| 29 | धनगर | 1) अहिर 2) डांगे 3) गटरी 4) हंडे 5) तेलवर 6) हटकर 7) हाटकर 8) शेगर , सगर ,सेगर 9) खुटेकर 10) तेलंगी 11) तेल्लारी 12) कोकणी -धनगर 13) कानडे 14) व-हाडे धनगर 15) झाडे 16) झेंडे 17) कुरमार 18) माहुरे 19) लाडसे 20) सनगर 21) धनवर 22) गडारिया 23) गड्री 24) गढरी 25) डंगेधनगर व डोंगरी धनगर |

**भटक्या जमाती ड ( N.T.- D)**

**(आरक्षण २ %)**

| | | |
|---|---|---|
| 30 | वंजारी | वंजार, वंजारा |

**भटक्या जमाती ब ( N.T.- B)( आरक्षण 2.5 %)**

| | | |
|---|---|---|
| 31 | मरीआईवाले, कडकलक्ष्मीवाले, मरगम्मावाले | ------- |
| 32 | गिहरा / गहरा | -------- |
| 33 | गुसाई / गोसाई | -------- |
| 34 | मुस्लीम मदारी, गारुडी, सापवाले व जादूगर | -------- |
| 35 | भारतीय इराणी | -------- |
| 36 | गवळी, मुस्लीम गवळी, गवलान,ग्वालवंश | -------- |
| 37 | दरवेशी, वाघवाले -शाह (मुस्लीम धर्मीय), अस्वलवाले | --------- |

**महाराष्ट्रातील सर्व इतर मागासलेल्या वर्गाची यादी(आरक्षण - 19 %)**

| | |
|---|---|
| 1) अलितकार | 38) वगळले |
| 2) बागडी | 39) गढवी |
| 3) वगळले | 40) वगळले |
| 4) बडीआ | 41) वगळले |
| 5) बजानिआ | 42) गोचाकी |
| 6) बाजीगर | 43) गुरव |
| 7) बुट्टाल | 44) वगळले, |
| 8) भांड, छप्परभांड, मुस्लीम भांड | 45) गवंडी, गुर्जर-कडीया |
| 9) भवैया किंवा तारगल | 46) हलेपैक |
| 10) भाविण | 47) वगळले |
| 11) भिस्ती किंवा पखाली, सक्का | 48) वगळले |
| 12) वगळले | 49) जगीयासी |
| 13) बारी किंवा बारई | 50) जजाक |
| 14) बेरीया | 51) जतिया |
| 15) बेसदेवा | 52) जातिगर |
| 16) भडभुंजा, भूजवा, भूंजवा, भूर्जी, भरडभूंजा, भूरंजी, भूंज | 53) जव्हेरी, परजीया सोनी |
| 17) भांटा | 54) वगळले |
| 18) भट, भाट | 55) जोगीण |
| 19) चमथा | 56) जोहारी |
| 20) चांदलगडा | 57) जुलाहा, अन्सारी |
| 21) चरण किंवा गढवी | 58) जंगम |
| 22) चारोडी | 59) वगळले, चितारी -जिनगर |
| 23) चिप्पा, छिपा | 60) जाडी |
| 24) दास किंवा दांगडीदास | 61) वगळले |
| 25) दावगर | 62) कम्मी |
| 26) देपला | 63) कापडी |
| 27) देवळी | 64) वगळले |
| 28) देवदिग, देवाडिगा | 65) खाटी |
| 29) वगळले | 66) वगळले |
| 30) ढोली, हश्मी /डफली | 67) वगळले |
| 31) वगळले | 68) वगळले |
| 32) वगळले | 69) कोंगाडी |
| 33) वगळले | 70) कोर्चर |
| 34) वगळले | 71) वगळले |
| 35) गंधारप | 72) कचोरा |
| 36) गुजराथ बोरी | 73) कादेरा |
| 37) वगळले | 74) कामाटी |

| | |
|---|---|
| 75) कसबी | 110) नोनीया, लोनिया, लुनिया, नुनिया |
| 76) वगळले | 111) नक्काशी |
| 77) वगळले | 112) नीली |
| 78) वगळले | 113) नीलकांती |
| 79) वगळले | 114) नेकार जाडा |
| 80) कुचबंध | 115) पधारिया |
| 81) कुछारिया | 116) पडीयार |
| 82)कुंभार किंवा कुम्हार, कुंबारा, कुंभारा, कुलाला, मूल्या | 117) पात्रदावरु |
| 83) कुणबी (पोटजाती-लेवा कुणबी, लेवा पाटील, | 118) फासेचरी |
| लेवा पटीदार, मराठा कुणबी व कुणबी मराठा) | 119) फुडगी |
| 84) वगळले | 120) पखाली, सक्का |
| 85) कची | 121) पांचाळ |
| 86) काठी | 122) पांका |
| 87) कासार (पोटजाती- कंचार, कचारी) | 123) पेर्की, पेरकेवाड, पेरीका, पेरीके, पेरका |
| 88) लाभा | 124) पुतली गर |
| 89) लडीया, लढीया, लरिया | 125) परीट किंवा धोबी, तेलगू मडेलवार (परीट) |
| 90) लडाफ, लइडाफ (नद्दाफ), मन्सुरी | 126) पाटकर, सोमवंशीय सहस्त्रार्जून क्षत्रिय, पटवेकरी ,पटवेगार, पटेगार, पट्टेगार,पटवी, क्षत्रिय पाटकर ,खत्री, क्षत्रिय |
| 91) लखेरीया | |
| 92) वगळले, हडाड/मिस्त्री (लुहार, लुवार ) | |
| 93) माच्ची | |
| 94)मानभाव ,महानुभाव भोपी , मानभाव भोपी | |
| 95) वगळले | |
| 96) मारवार बोरी | |
| 97) मे | |
| 98) मिना | 127) फुलारी |
| 99) महली | 128) राचेवर |
| 100) मेदार | 129) राईकरी, रायीकर |
| 101) म्हाली | 130) बंडी |
| 102) मिठा | 131) रचबंधिया |
| 103) वगळले | 132) रंगारी |
| 104) मथुरा | 133) रँग्रेझ |
| 105) नामधारी | 134) राओत, रावत, राऊतीया |
| 106) नामधारी पैक | 135) रंग्रेज (भावसार, रंगारी) |
| 107) निरशिकारी | 136) वगळले |
| 108) नावी, न्हावी (सलमानी, हजाम), वारिक, नाभिक,नापित, म्हाली, वालंद, हडपद, हज्जाम,नावीसेन,सलमानियॉ | 137) वगळले |
| 109) नेथुरा | 138) वगळले |

| | |
|---|---|
| 139) वगळले | 172) नीलगार, निली, निराळी |
| 140) संजोगी | 173) कोसकांती देवांग |
| 141) सरानिया | 174) सुतार, सुथार, वाढई, बाढी,वढई,बाढई, बढई,वाढी, वाडी,वधाई , पोटजाती : झाडे सुतार, पांचाळ सुतार |
| 142) वगळले | |
| 143) वगळले | |
| 144) वगळले | 175) फुतगुडी |
| 145) सुप्पालिंग | 176) वगळले |
| 146) सुथारिया (सिंधमधील) | 177) पिंजारा, पिंजारी, मन्सुरी |
| 147) साहिस, साईस, शिस | 178) वगळले |
| 148) सपेरा | 179) भिलाला |
| 149) शिलावट | 180) वगळले |
| 151) वगळले | 181) तेली, तिळवण तेली, मराठा तेली, तराणे तेली, देशकर तेली, एरंडेल तेली, लिंगायत तेली, एकबैल तेली, दोन बैल तेली सावतेली, एक बहिया तेली |
| 152) वगळले | |
| 153) शिंपी , इद्रिसी / दर्जी, साईसुतार, जैन शिंपी, श्रावक शिंपी, शेतवाळ, शेतवाल, सैतवाळ, सैतवाल ,मेरु शिंपी / मेरु क्षत्रिय शिंपी | |
| 154) सोनार | 182) माळी (पोटजाती-फुलमाळी, फुले, हळदे,काचा, कडू, बावने, अधप्रभू, अधशेटी, जिरे,उंडे, लिंगायत माळी इ.) बागवान(मुस्लीम धर्मीय) भारत बागवान, मरार, मराळ, कोसरे, गासे वनमाळी, सावतामाळी, चौकळशी, वाडवळ, राईन (बागवान), पाचकळशी, तत्सम जाती: सोमवंशीय-पाठारे क्षत्रिय, पाठारे-क्षत्रिय-पाचकळशी, पाठारे क्षत्रिय, सुतार, सास्टीकर, घोडेखाउ, एस.के.पी, |
| 155) तांडेल | |
| 156) वगळले | |
| 157) तारगला | |
| 158) थेटवार | |
| 159) थोरीया | |
| 160) तांबट, त्वष्टा कासार, कासार | |
| 161) थोग्ती | |
| 162) वडी | 183) लोणारी |
| 163) वगळले | 184) वगळले |
| 164) वंसफोड, हिंदू धरकार | 185) तलवार -कानडे /कानडी |
| 165) वगळले | 186) रघवी (विदर्भ जिल्हयातील) |
| 166) वर्थी | 187) भंडारी, बावर्ची/भटीयारा (मुस्लीम धर्मीय) |
| 167) वगळले | 188) गानली किंवा गांडली |
| 168) येरकुला | 189)पोवार किंवा पवार(पोवार किंवा पवारआडनावे ) भोयर, भोइर, भोयीर |
| 169) आगरी, आगळे किंवा काळण | 190) काथार,काथार वाणी,कंठहार वाणी,वैश्य वाणी , कुलवंत वाणी, नेवी , धाकड,मिटकरीवाणी,वाणी, बोरळ (लिंगायत वाणी किंवा लाडवाणी सोडून ),बोराळ, बोरुळ, बोरड, तांबोळी. |
| 170) भावसार | 191) मोमीन, अन्सारी |
| 171) कुरहीनशेट्टी | 192) फकीर बंदरवाला |

| | |
|---|---|
| 193) वगळले | 233) चिमूर |
| 194) घडशी | 234) चिंताला |
| 195) तांबोळी, ( मुस्लीम धर्मीय पानफरोश) | 235) डाकालेरु |
| 196) अनुसूचित जातीतून ख्रिश्चन धर्म स्विकारलेले | 236) दर्जी |
| 197) लंझाड , लझाड | 237) वगळले |
| 198) यादव | 238) कुरबा, कुरुबार |
| 199) लाडसी | 239) हरकांत्रा, मांगेली, मांगेले, पागे, संदुरी |
| 200) वगळले | 240) वॅटस, भडवाल, रजाक |
| 201) वगळले | 241) डोम्मारा |
| 202) अतार | 242) गाडाबा किंवा गोडबा |
| 203) औधिया | 243) गंगाणी |
| 204) बादक, बारव | 244) गारोडी |
| 205) बगळू | 245) गोल्लेर |
| 206) मारवार बाओरी, मारबार वाघरी | 246) गोदळा |
| 207) उदासी, वगळले | 247) हाबुरा |
| 208) बालसंथनम | 248) हरणी |
| 209) मथुरा बंजारा | 249) हिल-रेडिडस |
| 210) शिंगाडे बंजारा | 250) देवेरी |
| 211) लंबाडे | 251) विनकर, वन्या, बनकर |
| 212) फानडे बंजारा | 252) काछिया |
| 213) सुनार बंजारा | 253) कोराच, पाडलोर |
| 214) धालिया बंजारा<br>215) शिंगाडया बंजारा<br>216) बाओंरिया | 254) कलाल, कलार, लाड, लाडवक,<br>गौड कलाल, शिव्हारे, जैन कलार<br>(लाड ब्राम्हण वगळुन) |
| 217) कोळी बारीया | 255) कांदेल |
| 218) बथिनी | 256) कसेरा |
| 219) बेगरी | 257) कसाई, कसाब, कुरेशी |
| 220) भाम्पटा किंवा घंटीचोरे किंवा परदेशी | 258) कटीपामुला |
| 221) पोंग | 259) किरार |
| 222) दासर | 260) ख्रिश्चन कोळी |
| 223) उचिला | 261) कोराचार किंवा कोरवे |
| 224) भांडदुरा, बिल्लवा, थिया , बेलछेडा | 262) कोडकू सह कोरवा |
| 225) खारवी, धीवर भोई | 263) कोमाकपु |
| 226) भोयर | 264) कोंडू |
| 227) बिंदली | 265) लखारी |
| 228) बुरबुक | 266) लोहार-गाडा, दोडी, खतवली, पांचाळ,पंचाल |
| 229) चादर | 267) चुनारी |
| 230) चक्रवदय-दासर | 268) वगळले |
| 231) चांडाळ | 269) माहिल |
| 232) चेन्वू किंवा चेन्ववार | 270) मैदासी |

| | |
|---|---|
| 271) माझवार | 308) ओडेवार |
| 272) मतियारा, मतिहारा | 309)मण्यार ( बांगडीवाला), मण्यार, मणियार व मणेरी |
| 273) मानकर खालु | 310) जातगार |
| 274) मोंडीवार, मोंडीवारा | 311) कराडी |
| 275) मुंडा | 312) कुंकूवाले |
| 276)हजाम, कालसेरु, नावलिगा, कान्शी, नाभिक,नाई, वालंद | 313) वगळले /वगळले/खातवाढई |
| 277) पाचभोटला, पाचबोटला | 314) वगळले |
| 278) पदमपारि | 315) कोहळी |
| 279) भिस्ती | 316) खाटिक , कुरेशी खाटिक, कसाई |
| 280) पामूला | 317) डांगरी |
| 281) पंचमा | 318) वेडू ( वाघरी) |
| 282) पंडा | 319) धावड |
| 283) फर | 320) निऱ्हाळी (निराळी) |
| 284) पिंजारी | 321) चित्रकथी हरदास |
| 285) पुरवाली | 322) बेस्ता, बेस्ती, बेस्तल्लू |
| 286) राचभोया | 323) परिवार |
| 287) राउतिया | 324) सावकलार |
| 288) संगारी | 325) हणबर |
| 289) संताल | 326) दोडे गुजर, गुजर, लेवे गुजर, रेवे गुजर, रेवा गुजर, सुर्यवंशी गुजर, बडगुजर , तत्सम जाती :- लोंढारी/ पेंढारी |
| 290) साऊन्ता किंवा सोन्ता | |
| 291) सावतेली | |
| 292) सारे | 327) पहाड/पहाडी |
| 293) भावगर, शिव शिंपी, नामदेव | 328) गडरिया |
| 294) शिंगडाव किंवा शिंगाडया | 329) मच्छिमार ( दाल्दी) |
| 295) सिंधूर | 330) भालदार |
| 296) सोरें | 331) अलकरी |
| 297) सुन्रा | 332) पेंढारी |
| 298) सुन्राई | 333) यलम/येलम/यल्लम |
| 299) भडाई | 334) महात / माहूत, महावत |
| 300) गंणिगा, गांची | 335) फकीर |
| 301) थोटेवाडू | 336) लोध, लोधा, लोधी |
| 302) तिमाली | 337) नालबंद |
| 303) वालवाई | 338) कुलेकडगी, कुल्लेकडगी, कुलाकडगी, कुल्लाकडगी |
| 304) वडडेर (कालावडेर किंवा पाथरोड) | 339) मुजावर |
| 305) वनाडी | 340) मुलाणा, मुलाणी, मुलाणे |
| 306) येनाडिवाड्स | 341) ईस्ट इंडियन, ईस्ट इंडियन ख्रिश्चन, ईस्ट इंडियन कॅथॉलिक |
| 307) येरगोलावाड किंवा थेल्ला पामालवाडस | 342) नेवेवाणी |

| | |
|---|---|
| **343) लाडशाखीय वाणी** | **345) दोरीक** |
| **344) मुस्लीमधर्मीय काकर** | **346) पटवा** |

# विशेष मागास प्रवर्ग (S.B.C.)
# (आरक्षण 2 %)

| अ.क्र. | जातीचे नांव |
|---|---|
| **1)** | **गोवारी, गवारी** |
| **2)** | **वगळले,** |
| **3)** | **1) कोष्टी, 2) हलबा कोष्टी, 3) वगळले, 4) साळी, स्वकुळ साळी 5) लाडकोष्टी, 6) गढेवाल कोष्टी, 7) देशकर, 8) वगळले , 9) पद्म शाली, तत्सम जात: सालेवार , चेनेवार, चनेवार, चेन्नेवार 10) देवांग, 11) काची बंधे, 12) पटवीस, 13) सतसाले, 14) साडे, 15) जैनकोष्टी** |
| **4)** | **1) कोळी, तत्सम जाती, 2) मच्छिमार कोळी, 3) अहीर कोळी, 4) खानदेशी कोळी, 5) पानकोळी, 6) ख्रिश्चन कोळी, 7) चुंबळे कोळी, 8) पानभरे कोळी, 9) कोळी सुर्यवंशी, 10) मांगेला, 11) सोनकोळी, 12) वैती, 13) खारवा किंवा खारवी, 14) अनुसूचित जमातीमध्ये समावेश नसलेले कोळी** |
| **5)** | **1) मुन्नेरवार, 2) मुन्नुरवार, 3) मुन्नुर, 4) तेलगु मुन्नुर, 5) मुन्नुरवार तेलगु, 6)वगळले 7)वगळले ,8) तेलगु कापेवार, 9) मुन्नरवाड, 10) तेलगु फुलमाळी,** |
| **6)** | **गाबीत** |
| **7)** | **मुस्लीम धर्मीय भंगी / मेहतर / लालबेग/ हलालखोर / खाकरोब** |

*(फक्त संशोधन हेतूसाठी, गोपनीय)*

*मुलाखत अनुसूची क्रमांक :* ☐

# पुणे जिल्ह्यातील मांगगारुडी समाजाच्या सामाजिक-आर्थिक, शैक्षणिक व मागासलेल्या स्थितीचे सर्वेक्षण

## मुलाखत अनुसूची

मुलाखतीचा दिनांक: ________ गावाचे नाव: _____________ तालुक्याचे नाव :________________ जिल्हा:________________

| प्र. क्र. | प्रश्न | संकेतांक |
|---|---|---|
| १. | उत्तरदात्याचे नांव:<br>(इच्छा असल्यास नमूद करा)------------------------------------ | |
| २. | वय: | |
| ३. | लिंग: १. स्त्री<br>२. पुरुष<br>३. तृतीय पंथी | ☐ |
| ४. | वैवाहिक स्थिती :<br>१. विवाहित<br>२. अविवाहित<br>३. घटस्फोटित<br>४. विधवा<br>५. परित्यक्ता<br>६. विधूर | ☐ |
| ५. | जात : | |
| ६. | धर्म : | |
| ७. | पोटजात :<br>१. मिनी मादिंग, २. दखखनी मांग,<br>३. मांग महाशी, ४. मदारी,<br>५. गारुडी, ६. राधे मांग, ७. तेलंगी मांग, ८. कऱ्या मांग ,<br>९. ढाल्या मांग, १०. दासरू मांग,<br>११. बिलोरी मांग, १२. पोटजात नाही | ☐ |
| ८. | मोबाइल क्रमांक : | |
| ९. | उत्तरदात्याचे शिक्षण:<br>१. प्राथमिक<br>२. माध्यमिक<br>३. उच्च माध्यमिक<br>४. पदवीधर<br>५. पदव्युत्तर<br>६. उच्च शिक्षित<br>७. अशिक्षित | ☐ |
| १०. | कुटूंबाचा मुख्य व्यवसाय<br>१. शेती<br>२. शेत मजूरी<br>३. इतर मजूरी<br>४. शेती संलग्न व्यवसाय<br>५. खाजगी नोकरी<br>६. सरकारी नोकरी<br>७. व्यवसायिक<br>८. इतर | ☐ |
| ११. | कुटुंबातील व्यक्तींची संख्या:<br>१. प्रौढ पुरुष<br>२. प्रौढ स्त्रिया<br>३. मुले<br>४. मुली | |
| १२. | कुटुंबाचा प्रकार:<br>१. विभक्त कुटुंब<br>२. विस्तारित कुटुंब<br>३. एकत्रित कुटुंब | ☐ |
| १३. | तुमच्या कुटुंबातील कमवत्या व्यक्तींची संख्या | |
| १४. | कुटुंबातील कमवत्या व्यक्तींचे एकत्रित मासिक उत्पन्न (रु.)<br>१. ५००० रु. पेक्षा कमी<br>२. ५००० रु. ते १०००० रु.<br>३. १०००० रु. ते १५००० रु.<br>४. १५००० रु. ते २०००० रु.<br>५. २०००० रु. ते पेक्षा जास्त<br>६. प्रतिक्रिया नाही | ☐ |
| १५. | घराची मालकी :<br>१. स्वत:चे<br>२. भाड्याचे<br>३. अतिक्रमित | ☐ |

| | | |
|---|---|---|
| १६. | तुमच्या कुटूंबाला कोणकोणत्या सोई सुविधा उपलब्ध आहेत? योग्य पर्यायासमोर ✓ अशी खूण करा. | |
| | १. पाणीपुरवठा | |
| | २. वीज | |
| | ३. वाहतूक व्यवस्था | |
| | ४. पक्के रस्ते | |
| | ५. दवाखाना | |
| | ६. सांडपाणी व्यवस्था | |
| | ७. शौचालय | |
| | ८. प्राथमिक शाळा | |
| | ९. इतर (नमूद करा) | |
| १७. | तुमचे घर कसे आहे?<br>१. पक्के २. कच्चे | ☐ |
| १८. | तुमच्या निवासस्थानी तुम्ही किती वर्षापासून राहत आहात?<br>१. जन्मापासून<br>२. ५ वर्षापेक्षा कमी<br>३. ५ ते १० वर्षे<br>४. १० ते १५ वर्षे<br>५. १५ पेक्षा जास्त वर्षे | ☐ |
| १९. | तुमच्या कडे कोणत्या रंगाचे रेशन कार्ड आहे?<br>१. पिवळा<br>२. केशरी<br>३. पांढरा<br>४. रेशनकार्ड नाही | ☐ |
| २०. | तुमच्याकडे आधार कार्ड आहे का?<br>१. होय २. नाही | ☐ |
| २१. | तुमचे मतदान कार्ड आहे का?<br>१. होय २. नाही | ☐ |
| २२. | तुमच्या मालकीची जमीन आहे का?<br>१. होय २. नाही | ☐ |
| २३. | असल्यास किती एकर? | |
| २४. | तुमच्याकडे जनावरे आहेत का?<br>१. होय २. नाही | ☐ |
| २५. | होय, असल्यास, जनावरांची एकूण संख्या: | ☐ |
| २६. | तुम्हाला शिक्षणासाठी आवश्यक कागदपत्रे (उदा. जन्म दाखला, रह्वाशी दाखला, इ.) सहज उपलब्ध होतात का?<br>१. होय २. नाही | ☐ |

| | | |
|---|---|---|
| २७. | तुमच्या कुटुंबातील अशिक्षित लोकांची संख्या सांगा. | ☐ |
| २८. | तुमच्या कुटुंबातील शिक्षित व्यक्तींची संख्या सांगा. | ☐ |

| २९. | **शिक्षणाच्या स्थितीचा तक्ता (१ ली ते १२ वी वयोगट)** | | | |
|---|---|---|---|---|
| | **कुटुंबातील शिक्षण घेणाऱ्यांची संख्या** | | **शिक्षणातून गळती झालेल्यांची संख्या** | |
| | **मुले** | **मुली** | **मुले** | **मुली** |
| २९.१ प्राथमिक शिक्षण | | | | |
| २९.२ माध्यामिक शिक्षण | | | | |
| २९.३ उच्च माध्यमिक शिक्षण | | | | |

| | | |
|---|---|---|
| ३०. | तुमचे पूर्वज कोणता व्यवसाय करीत होते? योग्य पर्यायासमोर ✓ अशी खूण करा. | |
| | १. म्हशी भादारने | |
| | २. गावगुंडीचा खेळ | |
| | ३. भिक मागणे | |
| | ४. चोरी करणे | |
| | ५. सापाचा खेळ दाखविणे | |
| | ६. शिवणकाम | |
| | ७. सुतार काम | |
| | ८. लघु उद्योग | |
| | ९. कानातील मळ काढणे | |
| | १०. इतर(नमूद करा) | |
| ३१. | अजूनही तुम्ही पारंपारिक व्यवसाय करत आहात का?<br>१. होय २. नाही | ☐ |
| ३२. | तुमच्या पूर्वजांचे राहण्याचे स्वरूप कसे होते?<br>१.भटके २. स्थायिक | ☐ |
| ३३. | तुमचे कुटूंब स्थायिक झाले असल्यास, किती वर्षापूर्वी स्थायिक झाले आहे?<br>१. ३० वर्षापूर्वी<br>२. ३० ते ६० वर्षापूर्वी<br>३. ६० वर्षापेक्षा जास्त<br>४. लागू नाही<br>५. माहित नाही | ☐ |

| | | |
|---|---|---|
| ३४. | बाळ जन्मल्यानंतर तुम्ही पाचवी बारावी व इतर कोणतीही विधी करता का?<br>१. होय २.नाही | |
| ३५. | बाळाच्या जन्माआधी काही विधी केले जातात का?<br>१. होय २. नाही | |
| ३६. | होय असल्यास कोणत्या? | |
| ३७. | तुमच्या जातीत देवदासीची/ मुरळीची प्रथा अवलंबतात का?<br>१. होय २. नाही | |
| ३८. | मागासलेल्या समाजातील महिलांना उदरनिर्वाहासाठी देहविक्रीच्या व्यवसायात उतरावे लागते , तुमच्या समाजात अशी परिस्थिती आहे का?<br>१. होय २. नाही | |
| ३९. | मुलींना प्रथम मासिक पाळी आल्यावर धार्मिक विधी केला जातो का?<br>१. होय २. नाही | |
| ४०. | तुमच्या समाजातील पोटजातीमध्ये विवाह केला जातो का?<br>१. होय २. नाही | |
| ४१. | तुमच्या समाजात घटस्पोटीत/विधवा महिला पुन्हा विवाह करू शकते का?<br>१. होय २. नाही | |
| ४२. | महिलांना घटस्पोटानंतर पोटगी मिळते का?<br>१. होय २. नाही | |
| ४३. | मृत शरीराला कोणत्या पद्धतीने अंत्य संस्कार केले जातात?<br>१. पुरणे<br>२.जाळणे | |
| ४४. | व्यक्ती मृत झाल्यावर दशक्रिया विधी कोणत्या दिवशी केला जातो<br>१.तिसऱ्या<br>२.सातव्या<br>३.दहाव्या<br>४.तेराव्या | |

| | | |
|---|---|---|
| ४५. | तुमच्या समाजाची बोलीभाषा कोणती आहे?<br>१. मराठी<br>२. पारोशी<br>३. शिबारी<br>४. इतर (नमूद करा) | |
| ४६. | तुम्ही मांसाहार करता का?<br>१. होय<br>२. नाही | |
| ४७. | करत असल्यास कोणते मांस खाता? योग्य पर्यासमोर ✓ अशी खूण करा. | |
| | १. मटन (मेंढी, बकरी) | |
| | २. चिकन (कोंबडी) | |
| | ३ .पोर्क (डुक्कर) | |
| | ४. बीफ ( गाय, म्हैस, बैल) | |
| | ५. इतर (नमूद करा) | |
| ४८. | तुमचे कुटुंबाचे प्रमुख कुलदैवत कोणते आहे?<br>१.खंडोबा<br>२ मरीआई<br>३ लक्ष्मी आई<br>४ वरखेडची माता<br>५ तुळजाभवानी आई<br>६ इतर (नमुद करा) | |
| ४९. | इतर समाजातील लोकांच्या समारंभात तुम्ही सहभागी होता का? (लग्न, भोजन वगैरे)<br>१. होय २. नाही | |
| ५०. | तुम्हाला इतर समाजातील लोकांकडून कशी वागणूक मिळते?<br>१. समानतेची<br>२. भेदभावाची | |
| ५१. | तुमच्या समाजात मुलाने मुलीस हुंडा देण्याची पद्धत आहे का?<br>१. होय २. नाही | |
| ५२. | तुमच्या समाजात जात पंचायत आहे का?<br>१. होय २. नाही | |
| ५३. | होय असल्यास, जात पंचायतीचे नाव सांगा. | |

| | | |
|---|---|---|
| ५४. | होय, असल्यास जात पंचायतीकडून कोणत्या समस्या सोडविल्या जातात?<br>१. कौटुंबिक तंटा<br>२. इतर तंटा निवारण<br>३. विवाह संबधित<br>४. स्त्रियांवरील अत्याचार<br>५. इतर (नमूद करा) | ☐ |
| ५५. | जात पंचायतीकडून दिलेल्या शिक्षेचे स्वरूप काय असते?<br>१. वाळीत टाकणे<br>२. दंड<br>३. शारीरिक शिक्षा<br>४. समज देणे<br>५. दंड व वाळी टाकणे दोन्ही<br>६. माहित नाही | ☐ |
| ५६. | आपणास अनुसुचित जातीसाठी असणा-या शासकीय योजना माहित आहेत का?<br>१. होय २. नाही | ☐ |
| ५७. | यापैकी कोणत्या शासकीय योजनांचा लाभ आतापर्यंत तुम्ही घेतला? | |
| ५८. | कोणत्या कारणासाठी या योजनांचा लाभ तुम्ही घेतला आहे?<br>१. रोजगार व उपजीविका<br>२. शिक्षण<br>३. प्रशिक्षण<br>४. घरकुल<br>५. कोणत्याही योजनेचा लाभ घेतला नाही | ☐ |
| ५९. | कोणत्याही योजनेचा लाभ घेतला नसल्यास त्याचे प्रमुख कारण:<br>१. योजनांची माहिती नव्हती<br>२. कागदपत्रांची पूर्तता करण्यास असमर्थता<br>३. अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून उदासीनता<br>४. योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारी रक्कम न भरता येणे<br>५. योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक पात्रता नसणे<br>६. योजनेचा लाभ मिळण्यासाठी होणारी दिरंगाई<br>७. इतर (उदा. स्पर्धा, बहिष्कार इ.)<br>८. लागू नाही | ☐ |
| ६०. | तुमच्याकडे जातीचे प्रमाणपत्र आहे का?<br>१. होय २. नाही | ☐ |
| ६१. | तुमच्याकडे जात पडताळणी प्रमाणपत्र आहे का?<br>१. होय २. नाही | ☐ |
| ६२. | तुमच्या समाजाच्या संघटना आहेत का?<br>१. होय २. नाही | ☐ |
| ६३. | होय असल्यास संघटनेचे नाव सांगा. | |
| ६४. | तुम्हाला त्यांची कोणती मदत होते?<br>१. जातीचे प्रमाणपत्र मिळवून देणे<br>२. शासकीय योजना लोकांपर्यंत पोहचवणे<br>३. लोक प्रबोधन करणे<br>४. शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी प्रयत्न<br>५. कोणतीही मदत नाही | ☐ |
| ६५. | या संघटना मदतीसाठी तुमच्या कडून कोणती मागणी करतात?<br>१. लोक वर्गणी<br>२. वस्तू स्वरूपात मागणी<br>३. कोणतीही मागणी नाही | ☐ |
| ६६. | तुमच्या कुटुंबामध्ये जोगवा/परडीची प्रथा आहे का?<br>१. होय २. नाही | ☐ |
| ६७. | तुमच्या कुटुंबात बाबा-बुवा यांना मानतात का?<br>१. होय २. नाही | ☐ |
| ६८. | कुटुंबामध्ये धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी कोंबडा, बकरी इ. बळी दिल्या जातात का?<br>१. होय २. नाही | ☐ |

| | | |
|---|---|---|
| ६९. | तुमच्या कुटुंबात पत्रिका जुळवून विवाह करतात का?<br>१. होय २. नाही | |
| ७०. | तुमच्यावर कधी कुणी जादूटोणा केला आहे का?<br>१. होय २. नाही | |
| ७१. | तुमच्या घरात कोणाच्या अंगात येते का?<br>१. होय २. नाही | |
| ७२. | तुमच्यात घरात बायकांना मासिक पाळी आली असता बाजूला बसवतात का?<br>१. होय २. नाही | |
| ७३. | तुमच्या समाजात बायकांना जटा असतात का?<br>१. होय २. नाही | |
| ७४. | तुमच्या घरात मुलींचे लग्न कोणत्या वयात करतात?<br>१. १० वर्षापेक्षा कमी<br>२. १० वर्ष ते १८ वर्ष<br>३. १८ वर्षापेक्षा जास्त | |
| ७५. | तुमच्या कुटुंबात कोणी पोतराज आहे का?<br>१. होय २. नाही | |
| ७६. | तुमच्या कुटुंबात महिला,बाळंत झाल्यावर कुटुंबातून दूर ठेवतात का?<br>१. होय २. नाही | |

**अन्वेषकाचे निरीक्षण:**

| | | |
|---|---|---|
| ७७. | तुमच्या कुटुंबात कुणी सूर्य ग्रहण/चंद्र ग्रहण मागतात का ?<br>१. होय २. नाही | |
| ७८. | तुमच्या कुटुंबात मूल जन्माच्या ५ व्या दिवशी सटवाईचे पूजा करता का? १. होय २. नाही | |
| ७९. | कुटुंबात कोणी आजारी पडल्यास तुम्ही कोणाकडे उपचार करता?<br>१. घरगुती उपचार<br>२. भगत<br>३. पारंपारिक वैद्य<br>४. दवाखाना | |
| ८०. | कुटुंबात कोणाला खालीलपैकी दीर्घकालीन आजार आहेत का?<br>[क्षयरोग,कर्करोग (कॅन्सर), हत्तीरोग, कुष्ठरोग, गलगंड, दमा (अस्थमा), मधुमेह, हृदयरोग, इ.]<br>१. होय २. नाही | |

**अन्वेषकाचे नाव व सही**

________________________

# मांग गारोडी समाजाच्या सामाजिक,आर्थिक, शैक्षणिक व मागासलेल्या स्थितीचा अभ्यास

# गट चर्चा सूची

१.  तुमच्या जातीच्या उगमाविषयीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमी विषयी सांगा.

२.  तुमच्या जातीतीचे लोक महाराष्ट्रात सर्वात जास्त संख्येने कुठे राहातात.

३.  तुमच्या जातीत कोणकोणते आडनावे असतात?

४.  तुमच्या खाण्या पिण्याच्या सवयींविषयी सांगा. (अन्न पदार्थ)

५.  तुमचा पूर्वापारचा व आत्ताचा  पोषाख कसा आहे?

६.  बाळ जन्मल्या नंतर कोणत्या दिवशी कोणत्या विधी केल्या जातात?

७.  तुम्ही कोणकोणते सण समारंभ कशाप्रकारे साजरे करतात?

८.  लग्न कार्याची पद्धती कशा स्वरूपाच्या असतात?

(लग्नाचे वय, जोडीदाराची निवड, हुंडा पद्धती, घटस्पोट, पोडगी  प्रथा)

९.  तुमच्या समाजाच्या कुलदैवतांची नावे सांगा.

१०. देव पूजा, नवस, जत्रा, उपवास, बळी अशा प्रथा मानण्याचे काय प्रमाण आहे?

११. मृताच्या कोणत्या व कशा प्रकारे विधी केल्या जातात?

१२. तुमच्या वस्तीत कोणकोणत्या सुविधा आहेत?

१३. तुमच्या जातीत स्त्री ला काय स्थान आहे?

१४. शिक्षण पूर्ण करताना तुमच्या समाजातील लोकांना कोणत्या अडचणी येतात?

१५. स्त्री पुरुषांच्या बाबतीत तुमच्या समाजात शिक्षणाची काय परिस्थिती आहे?

१६. महिलांना शिक्षणसाठी प्रोत्साहन दिले जाते का?

१७. सद्य स्थितीत कोण कोणत्या व्यवसायात (अर्थार्जनाची साधने) तुमचा समाज मोठ्या प्रमाणात दिसतो?

१८. नोकरी मिळविण्याकरिता तुम्हाला काय अडचणी येतात?

१९. विविध  कागदपत्रे (उदा. जातीचा दाखला, रहिवासी दाखला, रेशन कार्ड) मिळवण्यासाठी कोण कोणत्या अडचणी येतात? त्या तुम्ही कशा सोडवितात?

२०. तुमच्या समाजाने कोण कोणत्या शासकीय योजनांचा लाभ आज पर्यंत घेतला आहे?

२१. तुमच्या समाजातील कोणत्या अडचणी प्रश्न/समस्या जात पंचायत सोडवते?

२२. लग्नकार्यात जात पंचायतीची काय भूमिका असते?

२३. जात पंचायती कडून दिल्या जाणाऱ्या शिक्षेचे स्वरूप काय असते?

२४.रिकाम्या वेळात तुमच्या समाजाची लोक काय करतात? (करमणुकीची साधने, स्त्री-पुरुष नुसार)

२५. इतर समाजाशी तुमचे कशाप्रकारचे संबंध आहे असे तुम्हाला वाटते?

२६. तुमच्या समाजात काय बदल किवा विकास होत आहे या विषयी सांगा.

२७. या विकासात शासनाची, संस्था व संघटनांची भूमिका कशा प्रकारे आहे?

# महाराष्ट्रातील मांग गारोडी समाजाच्या सामाजिक-आर्थिक, शैक्षणिक व मागासलेल्या स्थितीचा अभ्यास

निरीक्षण सूची

१) घरे:
- घरांची रचना
- घरातील सोई सुविधा

२) मांग गारोडी समाजातील लोक
- मांग गारोडी समाजातील लोकांचा पेहराव/पोशाख
- आरोग्याची स्थिती
- शिक्षणाची स्थिती
- मांग गारोडी समाजातील लोकांची बोलीभाषा

३) संस्कृती
- देवदेवता
- सण- उत्सव
- चालीरीती

४) लोकवस्ती
- वस्ती मधील सोयी सुविधा:
  आरोग्य, पाणी, वीज, शौचालय,रस्ते, समाजमंदिर इतर

५) व्यवसाय
६) साधन संपत्ती
७) या लोकांमध्ये असलेली जाणीव जागृती

## परिशिष्ट क्र. ३:

## पुणे जिल्ह्यातील सर्वेक्षण करण्यात आलेल्या गावांची नावे

| गावाचे नाव | कुटुंब संख्या |
|---|---|
| आमराई (बारामती) | ९७ |
| बाणेर | २० |
| वेदू वाडी | १८ |
| यावत | १६ |
| व्हालेकर वाडी | २ |
| वाघोली | ९ |
| वाडू | ६ |
| वाघेश्वरी | २५ |
| वरवंट | २ |
| वारजे माळवाडी | १ |
| उरली कांचन | १३२ |
| थेऊर | ४० |
| तरवाडे वस्ती(फुरसुंगी) | ४ |
| तालेराम वाडी | २ |
| सुतारवाडी | १ |
| सोमेश्वर वाडी | १७ |
| शिवाजी नगर | ८ |
| शिरूर (शांती नगर) | ३१ |
| सांगवी | १ |
| साडेसतरा नळी | २० |
| राजे वाडी | १ |
| राहू | ४ |
| पिंपरी | ३० |
| फुरसुंगी (जनवाडी) | ४४ |
| फुले  नगर | २१ |
| पेरणे फाटा | ८ |
| पौंड | ४ |
| पाटस | ३ |
| पाषाण | ३६ |
| निमगाव भोगी | १ |
| निगडी | २ |
| नीरा | ५३ |
| नासिक फाटा | १२ |
| नायगाव | २७ |
| मोशी | १० |
| म्हसोबा वस्ती(मांजरी ) | ५ |
| धानोरी | १५ |
| मालुंगी | १७ |

| गावाचे नाव | कुटुंब संख्या |
|---|---|
| मांजरी बुद्रुक न खुर्द | २२ |
| माळवाडी | २२ |
| मगरपट्टा | १५ |
| लोणीकंद | २४ |
| लोणीकाळभोर | २९ |
| लोणावळा | १५ |
| लोहगाव | ५२ |
| कुंजीर वाडी | ३० |
| कोरेगाव भीमा | २१ |
| खांडस | २६ |
| केसनद | ४ |
| कवटी माळ | २ |
| कात्रज | १ |
| काटेवाडी | २५ |
| कासारवाडी | १७ |
| कळस | 16 |
| जाते गाव | १४ |
| घुले वस्ती | ४३ |
| कोथरूड | ३ |
| कर्वेनगर | ३ |
| देहू | १ |
| दत्त वाडी | २० |
| चिंचवड गाव | ८ |
| चिकली | ७ |
| चौफुला | ३८ |
| चंदवाडी | १० |
| भवानी नगर | ५ |
| बेट वस्ती | २१ |
| बारामती | १६ |
| बालेवाडी | १३ |
| खेड गाव | ५ |
| **एकूण** | **१२७३** |

## महाराष्ट्रातील मांगगारुडी समाजाच्या सामाजिक-आर्थिक, शैक्षणिक व मागासलेल्या स्थितीचा अभ्यास, पुणे

## (संशोधन गट)

| अनु. क्र. | अन्वेषकाचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | राजू अडागळे | सहायक प्राध्यापक |
| २ | प्रमोदिनी नाईक | संशोधन अधिकारी |
| ३ | मोना दिनकर फासगे | संशोधन अधिकारी |
| ४ | तुलसीदास सुळे | संशोधन अधिकारी |
| ५ | लोंढे मुकुंदा अर्जुन | अन्वेषक |
| ६ | सांगळे कल्पना अण्णासाहेब | अन्वेषक |
| ७ | भुजबळ रुपाली अरुण | अन्वेषक |
| ८ | निकम सोनाली अर्जुन | अन्वेषक |
| ९ | आखाडे कीर्ती श्रीधर | अन्वेषक |
| १० | कदम केदार उत्तम | अन्वेषक |
| ११ | डॉ. पवार नितीन आबा | अन्वेषक |
| १२ | जोगदंड विठ्ठल वसंत | अन्वेषक |
| १३ | आव्हाड श्रीकांत भागचंद | अन्वेषक |
| १४ | खंडाळे शुभांगी शिवाजी | अन्वेषक |
| १५ | पवार अंकिता अनिल | अन्वेषक |
| १६ | शहाडे संगीता  विनायकराव | अन्वेषक |
| १७ | कांबळे शिल्पा अशोक | अन्वेषक |
| १८ | हिवाळे रुपाली | अन्वेषक |
| १९ | नरके अनिल | अन्वेषक |

barti

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

दि.२२ डिसेंबर १९७८ रोजी मुंबई येथे 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता विचारपीठ'या नामाभिधानाने स्थापित. सन २००८ या वर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या नावाने स्वायत्त दर्जा प्राप्त झाला.

### संस्थेची प्रमुख उद्दिष्टे (संक्षिप्त)

- सदर समता विचारपीठाला संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणून विकसित करणे.
- सामाजिक नियोजनाच्या व मूल्यमापनाच्या क्षेत्रात, विशेषतः अनुसूचित जाती व दुर्बल घटकांतील समाजासाठी काम करणे.
- समता व सामाजिक न्याय विषयी विविध पैलूंवर संशोधन करणे.
- युवकांना समता, सामाजिक न्याय व सामाजिक शास्त्राविषयी प्रशिक्षित करणे तसेच या विषयक विचारांच्या आदान-प्रदानासाठी व त्यांचे प्राविण्य वाढविण्यासाठी प्रशिक्षित करणे.
- सामाजिक न्याय विभागातील विविध संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांच्या क्षमतावृद्धीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.
- समाजाच्या विविध घटकांमध्ये बंधुत्व व राष्ट्रीय एकात्मता वाढविणे.
- समता, सामाजिक न्याय, बंधुत्व, राष्ट्रीय एकात्मता, समाजामध्ये परस्पर सद्भावनावृद्धी, जातीय विद्वेषाचे उच्चाटण, वैज्ञानिक जाणीव इत्यादी उद्देशाने प्रशिक्षण, संमेलने, व्याख्याने, चर्चासत्र, परिसंवाद, इत्यादी कार्यक्रम आयोजित करणे. तसेच या विषयी वाचन साहित्य, संशोधनात्मक अहवाल, प्रबन्ध, नियतकालिके इत्यादी प्रकाशित करणे.
- सामाजिक, राजकीय, आर्थिक व न्याय समानतेसाठी तसेच समाज सुधारकांनी याविषयी केलेल्या कार्याविषयी विविध कार्यक्रम घेणे.
- उपरोक्त उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अभिछात्रवृत्ती (फेलोशिप) पारितोषिके, बक्षिसे, पुरस्कार, शिष्यवृत्ती, विद्यावेतन, इत्यादी कार्यक्रम सुरू करणे व प्रदान करणे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

# पुणे जिल्ह्यातील मांग गारुडी समाजाच्या सामाजिक-आर्थिक व शैक्षणिक मागासलेल्या स्थितीचा अभ्यास

# अहवाल




प्रमुख मार्गदर्शक

**श्री. राजेश ढाबरे, IRS**

महासंचालक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

संशोधन विभाग

सप्टेंबर २०१६